Imaginaire Nord
Pour fins de recherche
privée seulement

www.universitypress.com

# शिकारी का हार्पून



मारकुसी पात्साउक

# शिकाऱ्याचा भाला

## ᐊᖑᓇᓯᑦᑎᐅᑉ ᓇᐅᒃᑯᑎᖓ

Le harpon du chasseur



# आभार-प्रदर्शन

मार्कूझी या क्वेबेक (कॅनडा) मधील इन्विट लेखकाच्या Le Harpon du chasseur या कादंबरीच्या मराठीतील भाषांतराचे प्रकाशन, मुंबई विद्यापीठातील प्राध्यापिका विद्या वेंकटेशन आणि मोरेआलच्या क्वेबेक विद्यापीठातील प्राध्यापक दान्येल शार्त्ये यांनी निदेशित केलेल्या, 'क्वेबेकची उत्तरप्रदेशीयता, थंड प्रदेशाची सांस्कृतिकता आणि क्वेबेकमधील 'इन्विट संस्कृति' La Nordicité quebecoise,hivernité culturelle et culture inuite du Quebec या प्रकल्पाचा भाग आहे. त्याला क्वेबेकच्या आंतरराष्ट्रीय संबंध आणि फ्रांकोफोनीच्या मंत्रालयाचे आर्थिक सहकार्य आणि 'उत्तरीय, थंड प्रदेशातील आणि आर्क्टिकचे कल्पनाविश्व संशोधन अध्यासन', क्वेबेक विद्यापीठ प्रकाशन, आणि आवाताक सांस्कृतिक संस्थान यांचे सहकार्य लाभले.

ह्या प्रकाशनासाठी, आम्ही Le Harpon du chasseur चे लेखक, मार्कूझी, तसेच मुखपृष्ठावरील छायाचित्रांसाठी छायाचित्रकार रॉबर्ट फ्रेशेत्त आणि मिशेल पात्री यांचे आभारी आहोत. त्याचप्रमाणे मराठीतील भाषांतरासाठी आम्ही जयंत शिवराम धुपकर यांचे आभारी आहोत.

मार्कूझी, Le Harpon du chasseur, दान्येल शार्त्ये यांच्या प्रस्तावनेसह (मराठीत भाषांतरित), मुंबई, मुंबई विद्यापीठ,२०१५, पाने १०६ .

ISBN : 978-2-923385-20-4

La publication de cette traduction en marathi du roman de Markoosie, Le harpon du chasseur, s'inscrit dans le cadre d'un projet intitulé « La nordicité québécoise: hivernité culturelle et culture inuite du Québec », financé par le Ministère des Relations internationales et de la Francophonie du Québec et dirigé par Vidya Vencatesan, professeure à l'Université de Mumbai, et Daniel Chartier, professeur à l'Université du Québec à Montréal. Ce projet est soutenu par la Chaire de recherche sur l'imaginaire du Nord, de l'hiver et de l'Arctique, les Presses de l'Université du Québec et l'Institut culturel Avataq.

Pour cette publication, nous remercions l'auteur, Markoosie, ainsi que les photographes Robert Fréchette et Michel Patry, de leur aimable collaboration. Nous sommes également reconnaissants envers monsieur Jayant Shivram Dhupkar, pour sa traduction en marathi.

Markoosie, Le harpon du chasseur, précédé d'une introduction de Daniel Chartier [traduction en marathi], Mumbai, Université de Mumbai, 2015, x p.

ISBN : 978-2-923385-20-4

# मार्कूझी

# ᒫᑯᓯ

Markoosie

# शिकाऱ्याचा भाला

## ᐊᖑᓇᓱᑦᑏᐅᑉ ᓇᐅᒃᑯᑎᖓ

१९६९

दान्येल शार्त्ये यांनी लिहिलेल्या प्रस्तावना आणि कालसूचि आणि मार्कूझी यांनी २०१० मध्ये लिहिलेल्या अद्यापि अप्रकाशित मनोगतांसहित.

फ्रेंचमधून मराठीत भाषांतर - जयंत शिवराम धुपकर.

ह्या प्रकल्पाचे निदेशन माँट्रियल येथील क्वेबेक विद्यापीठातील प्राध्यापक दान्येल शार्त्ये आणि मुंबई विद्यापीठातील प्राध्यापिका डॉक्टर विद्या वेंकटेशन यांनी केले.

२०१५

मुंबई विद्यापीठ प्रकाशन

TABLE DES MATIÈRES

INTRODUCTION 1
Les enjeux d'une littérature inuite 5
Le problème de l'« authenticité » 6
Réception et importance historique du roman 8
Un auteur exceptionnel : Markoosie Patsauq 13
La construction narrative de l'œuvre 15
Un univers violent et hostile 19
Un roman de la survie et de la solidarité 20
Hors des stéréotypes : l'idée de l'égalité 23
La symbolique du harpon 25
L'étrangeté du suicide 30

AVANT-PROPOS DE L'AUTEUR

LE HARPON DU CHASSEUR (1969) 31

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रस्तावना | |
| इन्विट साहित्यासमोरील प्रश्न | १ |
| ‘अधिकृतते’चा प्रश्न | ५ |
| कादंबरीचे स्वागत आणि तिचे ऐतिहासिक महत्त्व | ६ |
| मार्कूझी पास्तोक : एक असाधारण लेखक | ८ |
| कादंबरीची निवेदनात्मक संरचना | १३ |
| हिंसा आणि वैराच्या भावनेने भरलेले विश्व | १५ |
| मृत्यूवरची मात आणि बांधिलकी या विषयीची कादंबरी | १९ |
| पूर्वग्रहांपलिकडे : समतेची कल्पना | २० |
| भाल्याची सांकेतिकता | २३ |
| कामिकची अनपेक्षित आत्महत्त्या | २५ |
| लेखकाचे मनोगत | ३० |
| शिकाऱ्याचा भाला (१९६९) | ३१ |
| कालसूची | १०८ |

# *प्रस्तावना*

*प्रकाशित झालेली पहिली इन्विट कादंबरी ! साहित्यिक आणि सामाजिक क्षेत्रातील एक पहिलं महत्त्वाचं पाऊल!*



एक तरुण इन्विट, नूनाविक (क्वेबेक) इथे, बर्फाला पडलेल्या भोकातून मासे मारतो आहे - रॉबर्ट फ्रेशेत्त



नूनाविक क्वेबेक इथे इन्विट खेड्यातील आधुनिक घरासमोर वाळत घातलेली पांढऱ्या अस्वलाची कातडी
- रॉबर्ट फ्रेशेत्त

‘शिकाऱ्याचा भाला’ ही कॅनडातल्या इन्विट लोकांतील पहिली कादंबरी आहे आणि तिचे लेखक मार्कूझी हे अशी नावीन्यपूर्ण कादंबरी लिहिणारे पहिले लेखक आहेत.

–जेम्स एच. मॅक्नील,१९७५

## इन्विट साहित्यासमोरील प्रश्न..

साहित्याचे प्रयोजन काय याबद्दल आपली भूमिका मार्कूझी पात्सोक यांनी अप्रत्यक्ष रित्या,‘शिकाऱ्याचा भाला’ या कादंबरीच्या शेवटी एका प्रसंगात व्यक्त केली आहे. त्या प्रसंगात कादंबरीतील प्रमुख पात्र कामिक आपल्याला मदत करणाऱ्या प्रत्येक पात्राची काय अवस्था झाली हे सांगत असतो. ते सांगून झाल्यावर, कामिक अतिशय दमतो आणि त्याला सर्वांपासून दूर जावं असं वाटत असतं. त्याची आई उरामिक हिला त्याची काळजी वाटते. ‘त्याला काय झालंय?’ ती विचारते. दुसरं पात्र, आंगुतिक उत्तर देतो: आपल्याला वर्णन करून सांगताना जे जे काही त्यानं पूर्वी भोगलं होतं, त्या सगळ्या अनुभवांतून तो पुन्हा एकदा गेला’ अशा रीतीने कथा, निवेदन, नंतर

दंतकथा आणि लोककथा, हे वास्तवातील घटनांना स्मृतीच्या साहाय्याने सतत जिवंत राहायला आणि अजरामर होण्याला मदत करतात: ही एका माणसाच्या आणि एका संस्कृतीच्या मृत्यूवर मात करण्याची कथा आहे.

'शिकाऱ्याचा भाला!' ह्या कादंबरीला १९७० मध्ये लिहिलेल्या प्रस्तावनेत जेम्स एच.मॅक्नील आपल्याला परत एकदा सांगतात की ही पहिली इन्विट कादंबरी प्रकाशित होत असल्याबद्दल जरी आपल्याला आनंद होणं योग्य असलं तरी ही कादंबरी एका वेगळ्या निकडीच्या गरजेच्या संदर्भात प्रकाशित होत होती हे विसरून चालणार नाही. ती निकड होती ती इन्विट लोकांच्या दैनंदिन जीवनातील घटना,आणि त्यांचं वागणं, त्यांच्या श्रद्धा आणि त्यांची विचारसरणी यांच्या निवेदनामार्फत, भूतकाळाला पुर्नजीवन मिळत आहे ना याची खात्री करून घेण्याची होती. ' इंग्रजी किंवा इतर साहित्यांप्रमाणेच एस्किमो साहित्यही मौखिकी परंपरेतून निर्माण होऊ शकेल, पण आपण झपाट्यानं काम करणं आवश्यक आहे.' चाळीस वर्षांनंतरही मार्कूझी पात्झोकांना हा भूतकाळ जिवंत ठेवण्याबद्दल सातत्याने वाटणारी काळजी संपलेली नाही असे दिसते. 'आपल्या मौखिकी भूतकाळाचे प्रदीर्घ खंड कालाबरोबर नष्ट झाले आहेत, किंवा आपल्या भूतकालाचे ज्ञान असलेल्या स्त्री-पुरुषांनी ते इतरांच्या हवाली केलेलं नाहीत.'

कॅनेडातील आदिवासी लोकांच्या साहित्यकृती लेखी स्वरूप धारण करून प्रकट होण्यापर्यंत त्यांना खूपच अडचणीतून जावे लागते. एकतर कॅनडातील केंद्रीय सरकारने अमेर-इंडियन आणि इन्विटांसाठी केलेल्या कायद्यामुळे इंडियनांवर झालेले, परावलंबिततेच्या काळाचे परिणाम वेगळे करता येणार नाहीत. या कायद्यांमुळे त्यांची अवस्था परकीयांनी घेतलेल्या निर्णयांवर अवलंबून राहाण्याऱ्यांसारखीच राहिली. आणि ही परिस्थिती १९७५ मध्ये बे-जेम्स आणि उत्तर क्वेबेकच्या करारावर सह्या होईस्तोवर आणि १९९९ मध्ये नुनावुतची निर्मिती होईस्तोवर चालू राहिली. हार्टमूट लूट्झनी लिहिल्याप्रमाणे ''१९५१मध्ये पुन्हा नव्या स्वरूपात मांडल्या गेलेल्या १८७६च्या कायद्यानुसार अमेर -इंडियनांवर जी बंधने घातली गेली त्यात पुढील बंधनेही घालण्यात आली: 'विद्यापीठाची पदवी प्राप्त केल्याने कोणाही इंडियन माणसाला त्याची मूल स्थिती आपोआपच गमवावी लागेल.' अशा

रीतीने शिक्षण मिळवण्याच्या अडचणीत अमेर-इंडियनांना त्यांची मूलस्थिती गमावण्याच्या धमकीची जशी भर पडली तशीच त्यामुळे त्यांच्या साक्षरता आणि साहित्यकृतींच्या निर्मितीवरही मर्यादा पडली.

फारच थोड्या इन्विटेतर आदिवासी लोकांना इन्विट साहित्याचे भाषांतर करून त्याला जागतिक साहित्यात समावेश करणे जमले आहे, अशी जेम्स एच, मॅक्नील यांची भूमिका आहे. मानववंशशास्त्रज्ञांनी केलेल्या कामामार्फत ही निवेदने सुंदर वस्तू म्हणून नव्हे तर समाजाविषयाची माहिती मिळविण्याच्या वस्तू म्हणून प्रसारित केली असल्याने इन्विट साहित्यातील बराचसा मोठा भाग अज्ञातच राहिला आहे. मार्गारिट हॅरींनी म्हटल्याप्रमाणे, नृविज्ञान आणि नृवंशविज्ञानाच्या संशोधकांच्या भूमिकांमुळे इन्विट साहित्याकडे ज्या एका वेगळाच दृष्टीकोणाने पाहिलं जाते त्यामुळे साहित्यातील मूलभूत गुणांची अभिव्यक्ती होतेच असे नाही. त्याशिवाय, त्या दृष्टिकोणामुळे कथा, दंतकथा वगैरे पारंपारिक आकृतिबंधांना महत्त्व दिले जाते आणि आधुनिक निवेदनतंत्राकडे दुर्लक्ष केले जाते.

तथापि, फ्रेड ब्रूएन्मेरनी म्हटल्याप्रमाणे, इन्विट लोकांवर झालेल्या लिखाणाची कमतरता नाही : 'साऱ्या जगात जर कुणावर सगळ्यात जास्त लिहिलं गेलं असेल तर ते एस्किमो लोक होत.' इन्विट लोकांचा आवाज फारच थोड्या प्रमाणात लोकांच्या कानावर पडला आहे. ह्या अभावाचा परिणाम केवळ इन्विट लोकांबद्दल इन्विटेतर लोकांत असलेल्या मतावरच होतो, असे नाही, तर इन्विट लोक स्वत:बद्दल काय विचार करतात यावरही त्याचा परिणाम होतो, असे विक्टोरिया फ्रीमनने लेखकांना मदत करण्याच्या उद्देशाने सुरू केलेल्या बाफिन रायटर्स प्रोजेक्ट या अतिशय मनभावी संकल्पात म्हटलं आहे.

'आर्किक्ट किंवा इन्विट लोकांबद्दल जरी बरीचशी पुस्तकं लिहिली गेली असली तरी जे काही लिहिलं गेलं आहे त्यापैकी फारच थोड्या लिखाणातून इन्विट लोकांचा दृष्टिकोण प्रकट झाला आहे. इन्विट संस्कृति ही इन्विट आणि इन्विटेतर दोन्ही जमातींनी दाक्षिणात्य नजरेतूनच पाहिली आहे.'

ह्या सर्व प्रतिकूल परिस्थितीला तोंड देतदेतच इन्विट लेखक गेल्या पन्नास-एक वर्षांपासून लिहित आहेत. अगदी लिहिण्यापासून ते पुस्तकाचे स्वागत कसे होते इथपर्यंत आपल्या कलाकृतीच्या निर्मितीप्रक्रियेत त्यांना मोठमोठाल्या संकटांना तोंड द्यावं लागत असते. हे लेखक प्रदीर्घ काळ अज्ञात आणि दुर्लक्षित राहिले होते. १९८५ साली मार्गारिट हॅरीनी पुढील प्रश्न विचारला होता : 'इंडियन किंवा इन्विट लेखक आहेतच कुठे? कितीतरी श्वेतवर्णी कॅनेडियन (आणि त्यांच्यापैकी कितीतरी जण स्वत:ला वाचनप्रेमी समजतात), एकाही इंडियन किंवा इन्विट लेखकाचं नाव सांगू शकत नाहीत.' आज, पाव शतक उलटून गेल्यावरही, जरी काही मोजकेच अपवाद सोडले तरी, त्या प्रश्नाची प्रासंगिकता कमी झालेली नाही हे मान्य करावेच लागते.

हे सांगत असतानाच, या क्षेत्रात झालेल्या काही प्रगतीची नोंद घ्यावीच लागेल. १९७० मध्ये प्रकाशित झालेल्या आणि अतिशय मोठ्या प्रमाणात यशस्वी ठरलेल्या आणि कॅनडातील पहिली इन्विट कादंबरी मानल्या जाणाऱ्या 'शिकाऱ्याचा भाला' या कादंबरीने इतिहास घडवला. तिने एक नवीन मार्गही दाखवून दिला. मंत्रालयाने प्रसिद्ध होणाऱ्या 'इनुत्तितूत' या नियतकालिकानेही हा मार्ग थोडाफार साफ करून ठेवला होता. हळूहळू प्रकाशनांची संख्या वाढायला लागली, बऱ्याचदा ती प्रकाशित पुस्तकं दोन किंवा तीन भाषांत असत. त्यात कित्येकदा वृद्ध लोकांची निवेदने किंवा काही आत्मचरित्रे असत. त्याच बरोबर, साहित्यिकतेची कल्पनाही इन्विट लेखकांच्या मनात मुळे धरू लागली. १९८४ मध्ये, रॉबिन मॅक्ग्राथ यांनी तरूण लेखकात काल्पनिक कृती लिहायची कल्पना जागी व्हायला लागली आहे ह्याची नोंद घेतली. 'सध्याच्या लेखकांना आणि कथाकारांना आपण जे काही लिहित आहोत त्यातील काही भाग जाणूनबुजून काल्पनिक आहेत ह्याची जाणीव आहे.' आज सांस्कृतिक नियतकालिक आणि प्रकाशनगृहांचे प्रकल्प काही साहित्याचा पाया घालत आहेत, त्याचे संस्थापन, जरी काही प्रमाणात विस्कळित आणि निर्देशात्मक असले तरी, शेवटी काही प्रमाणात मूर्त स्वरूप घेत आहेच. ह्यामुळे लेखकांना तोंड द्यावे लागते त्या धोक्यांची संख्या कमी होत नाही. झेबीदी नुन्गाकने म्हटल्याप्रमाणे, 'इन्विट माणसांना साहित्याच्या क्षेत्रात निश्चिंत वाटण्यासाठी अजून बरेच मार्गक्रमण करणे आवश्यक आहे.'

## अधिकृततेचा प्रश्न...

इन्विटेतर लोकांच्या अस्तित्त्वाने इन्विट लोकांवर झालेले राजकीय, सैनिकी, किंवा सांस्कृतिक परिणाम अमान्य करणे अशक्यच आहे: आजही सांस्कृतिक पातळीवर बिकट परिस्थितीतही तग धरून राहाण्याचे आणि विकास घडवण्याचे प्रयत्न करत असतानाच, आपली भाषा इनुक्टिटुट शिकवली जावी आणि वापरात राहावी यासाठी, त्याचप्रमाणे आपल्या मूल्यांचे संरक्षण व्हावे यासाठी रेडिओ, टेलिविजन किंवा वेब, (गीते, बोली भाषा, इत्यादी) याचबरोबर मौखिकी उपयोग आणि अर्थातच लिखित साहित्य यासारख्या आधुनिक विविध आकृतिबंधांचा वापर व्हावा यासाठी इन्विट लोक इनुक्टिटुटच्या अभ्यासासाठी लोकांना प्रोत्साहन देत असतात आणि तो अभ्यास सार्थक ठरत असल्याचे दाखवत असतात.

शिकाऱ्याचा भाला ही ज्यापैकी एक संपन्न उदाहरण आहे, अशा सुरवातीसुरवातीच्या लिखित इन्विट साहित्याच्या कृतींत त्याकाळी अस्तित्वात असलेल्या इन्विट मौखिकी परंपरा त्याचप्रमाणे पाश्चात्य लिखित साहित्याच्या परंपरा यांच्या मिश्रणातून निघालेल्या साहित्यिक आकृतिबंधांचा मेळ आहे. अशा रीतीने त्या कृति दुसऱ्या संस्कृतीत निर्माण झालेल्या आणि काहीशा प्रमाणात परकीय संस्कृतीतून आणलेल्या आकृतिबंधात केलेल्या कथाविषयक, नैतिकतेच्या, आकृतिबंधाच्या आणि मूल्यपरंपरेच्या संकेतनाला आव्हान देतात.

काही टीकाकारांच्या दृष्टिने, हा मेळ कथानकाच्या 'अधिकृततेची किंमत कमी करतो. पीअर्सन एच. गँडी यानी १९७१ मध्ये क्वीन्स क्वार्टर्लीमध्ये मार्कूझींच्या कादंबरीबद्दल लिहिले की 'पाश्चात्य आकृतिबंधांचा स्वीकार करण्याने लोकतत्व विरूप केले जाते आणि मूलत: कठोर आणि निर्दयी वातावरणात जिवंत राहाण्यासाठी केलेल्या संघर्षाच्या धैर्य आणि संकटांवर मात करण्याच्या ह्या सुंदर कथेतील अधिकृतता लुप्त होते. ही कादंबरी आकृतिबंधाच्या नाविन्यात आणि साहित्यिकतेत जे काही प्राप्त करील तेच अधिकृत संस्कृतिच्या प्रातिनिधिकत्त्वात गमावेल. ह्या पर्याप्ततेतून सुटका करवण्यासाठी, इन्विट लेखकासमोर नृवंशशास्त्राच्या दृष्टिकोणापासून आपली

मुक्तता झालेली दाखवणे आणि इतर संस्कृतींतील समकालीन लेखकांप्रमाणेच आपण आणि परके यांच्यातील मिश्रणामार्फत, कलाकृति निर्माण करण्याचे आपले अधिकार ठासून सांगण्याशिवाय कोणताही मार्ग नाही.

## कादंबरीला मिळालेला प्रतिसाद आणि कादंबरीचे ऐतिहासिक महत्त्व

शिकाऱ्याचा भाला ही कॅनडात लिहिलेली पहिली इन्विट कादंबरी होती, तिचे लवकरच इंग्रजी आणि फ्रेंचमध्ये भाषांतर झाले आणि ती भाषांतरे ख्यातनाम प्रकाशकांनी प्रकाशित केली हे लक्षात घेतलं तर या कलाकृतिकडे फारच थोड्या टीकाकारांनी लक्ष दिले, ह्याचे आश्चर्यच वाटते. तरूण लोकांसाठी लिहिलेली कादंबरी म्हणून तिच्या केलेल्या वर्णनामुळे कदाचित तिच्या साहित्यिक गुणांकडे दुर्लक्ष झाले असावे किंवा टीकाकारांकडे ह्या कलाकृतीची मूल्ये तपासण्यासाठी आवश्यक ती संदर्भसाधने नसल्याने असे झाले असावे. ते काहीही असले, तरी त्या कादंबरीकडे लोकांचे लक्ष गेलेच नाही किंवा अगदी थोडेच गेले. कारण १९७० च्या आसपास जेव्हा कादंबरी पुस्तकस्वरूपात प्रकाशात आली, तेव्हा त्या विषयाला वाहून घेतलेल्या फारच थोड्या नियतकालिकांतून अगदी मोजकेच असे अभ्यासात्मक लेख त्या कादंबरीवर लिहिले गेले. ह्या कादंबरीवर लिहिलेले टीकालेख तिच्याबद्दल स्तुतिपरच असले तरी त्यांच्यात काहीसा अनुग्रह केल्याचा भाव होताच. त्यामुळेच रोबँ मॅक्ग्राथने १९८४ मध्ये लिहिले आहे की :

'ह्या कादंबरीचे सर्वसाधारणपणे टीकाकारांनी अतिशय उत्साहानेच स्वागत केले. 'शिकाऱ्याचा भाला' ही वेगवान कथा, काहीशा प्रमाणात सोप्या शब्दांत सांगितलेली आहे आणि तिचा शेवट अतिशय आश्चर्यकारक रित्या होतो आणि अशा रीतीने त्या कादंबरीने एक सुंदर पुस्तक अशी ख्याति प्राप्त केली आहे. नकारात्मक टीकेपेक्षा मौनाला, विश्लेषणापेक्षा स्तुतिला जास्त महत्त्व देणारी टीका ही कॅनडातील सगळ्या आदिवासी साहित्याला, मग ते अमेर-इंडियन असो किंवा इन्विट असो, हानिकारक ठरते, असे मार्गारिट हॅरींचे मत आहे.

'स्थानिक लेखकांच्या कलाकृतींच्या संदर्भातील प्रकाशक आणि वाचकांतील बांधिलकीचा अभाव हा कॅनडातील टीकाकारांत साधारणपणे सांपडणाऱ्या नकारात्मक भूमिकेने अधिकच बळकट केला जातो. कदाचित 'भूमिकेचा अभावच' म्हणणे अधिक योग्य ठरेल, कारण बहुतेक इंडियन आणि इन्विट कलाकृतींवर नकारात्मक टीका होत नाही, असं नसून त्यांच्याबद्दल टीकाच होत नाही. इतकेच नव्हे तर ज्या काही तुरळक वेळा काही सकारात्मक टीका केली जाते तेव्हाही ती अनुग्रह केल्याच्या भूमिकेतून केल्यासारखी असते.

जेव्हा 'शिकाऱ्याचा भाला' ही कादंबरी प्रकाशित झाली तेव्हा इन्विट संदर्भांच्या अभावापोटी तिच्यातील कथानकात प्रकट झालेल्या दैवावर विसंबून राहाण्याच्या प्रवृत्तिमुळे आणि काही दृशांतील हिंसकतेमुळे फ्रेड ब्रूएन्मेर यांनी कॅनेडियन जिओग्राफिकल जर्नल मध्ये तिची तुलना ग्रीक शोकांतिकांशी केली: ही कादंबरी म्हणजे चांगल्या रीतीने सांगितलेली एक कठोर, अघोर कथा आहे. कादंबरीतील निष्ठुर दैवाचा विषय ग्रीक शोकांतिकांतही सापडतो. फक्त आर्किक्ट प्रदेशातच दैव आणि निसर्ग हे एकच एक निर्दय आणि ताकतवान बनू शकतात.

मौखिकी साहित्याचे लिखित साहित्यात झालेले रूपांतर हेच काय ते या कलाकृतीचे योगदान असे साहित्यिक इतिहासाने नोंदले आहे. अर्थातच, याही पूर्वी इन्विट कथानकांचे लिप्यंतरण झालेले होते, पण त्यांच्या संकलनाच्या, निवडीच्या आणि एकत्र करण्याच्या वेळी आलेल्या नृवंशशास्त्राच्या दृष्टिकोणामुळे ती कथानके थेट लिखित स्वरूपात आलेल्या कलाकृतींपासून वेगळी ठरत होती. या पहिल्या कलाकृतिच्या संपादनासाठी मूलभूत काम करणाऱ्या जेम्स एच, मॅक्नील यांनी 'शिकाऱ्याचा भाल्या'च्या लेखकाला हे काम करायला उद्युक्त केले, एक प्रकाशक शोधायला मदत केली. 'शिकाऱ्याचा भाल्या'चे प्रकाशन हे एका नव्या युगाची सुरवात ठरते.

'मग एस्किमो भाषेत लिहिली गेलेली पहिली नवी कोरी कथा आली. जेव्हा 'शिकाऱ्याचा भाला' प्रकाशित झाली तेव्हा आम्हाला आमच्या उत्साहावर काबू ठेवणं कठिण झाले, आम्ही ती कथा इनुटिटुटमध्ये धारावाही

स्वरूपात म्हणून प्रकाशित केली आणि मार्कूझींना ती इंग्रजीत प्रकाशित करायला प्रोत्साहित केलं. जुन्या काळातील जीवनपद्धतीवर आधारित ही पहिली कथा होती, दाक्षिणात्यांना ती जीवनपद्धती कशी दिसते, यावर ती आधारित नव्हती तर एस्किमोंच्या स्वत:च्याच स्मृतीत ती जीवनपद्धती कशी राहिली आहे, हे त्या कथेतून दिसत होतं.'

मॅक्नील यांच्या मते या कलाकृतीचे मुख्य योगदान इन्विट साहित्याला मौखिकी पातळीवरून लिखित पातळीवर आणलं, ह्याबरोबरच कोणत्याही माध्यमातून न जाता केवळ साहित्यामार्फतच इन्विट स्मृतीला थेट पोहोचवलं ह्यात आहे. त्याचप्रमाणे इतरांच्या मते, इन्विट साहित्यातही निर्मिती होईल अशी आशा ह्या कादंबरीमुळे बळकावली. भौगोलिक दृष्टीकोणातून विचार करून फ्रेड ब्रूएम्मेर म्हणतात: 'एस्किमोंनी त्यांच्या लोकांविषयी आणि प्रथांविषयी लिहिण्याच्या नव्या युगात ह्या कलाकृतीने प्रवेश करविला आहे अशी अपेक्षा करावीशी वाटते.' 'आर्क्टिक्ट हे एक सांस्कृतिक वैराण आहे' ह्या वापरून वापरून बेचव आणि अर्थहीन' बनलेल्या वाक्यप्रयोगाचा वापर करून आर्. डब्ल्यू. नोबल यांनी कॉमनवेल्थ लिटरेचर जर्नलमध्ये म्हटलं आहे की 'मार्कूझींसारखी प्रतिभा असलेल्या कलाकाराने आपल्याकडे लक्ष वेधून घेतल्याने आर्किक्टवर सदैव पसरलेल्या शून्याच्या अंधकाराला थोडंफार मागे हटावं लागेल.' जरी मौखिकी मार्गाने केलेल्या संक्रमणाच्या मूल्यांशी परिचित असले तरी टीकाकारांच्या ह्या मतांवर युरोपीय संस्कृतीत लिखिताला दिल्या जाणाऱ्या सांकेतिक मूल्याची फार मोठ्या प्रमाणात पकड आहे. त्यांच्या मते मौखिकत्त्वापासून लिखितत्त्वाकडे जाण्यात इन्विट सांस्कृतिक उत्क्रांतीची एक सुरवात आहे.

## मार्कूझी पात्सोक : एक असाधारण लेखक...

*मा*र्कूझी पात्सोक यांचा जन्म १९४१ मध्ये ज्याला आज क्वेबेकमधील नुनाविक प्रदेश म्हणतात त्या उंगावा खाडीच्या पश्चिम किनाऱ्यावर झाला. इतर इन्विट लेखकांप्रमाणेच 'नूवो क्वेबेकमधून देशोधडीला लावलेल्या' लोकांमध्ये त्यांची गणना केली जाते. उत्तरेकडच्या प्रांतात आपले सार्वभौमत्त्व सिद्ध

करण्यासाठी १९५० च्या आसपास, कॅनडाच्या केंद्र सरकारने, पूर्वी ज्याला पोर्ट हॅरिसन म्हणत त्या इनुक्जुआक खेड्यातून नूवो क्वेबेकमधील, पार थेट आर्किक्टकडे विस्थापित केलेल्या लोकांना 'नूवो क्वेबेकचे देशोधडीला लावलेले लोक' असं म्हणतात. म्हणूनच मार्कूझींनी आपल्या आयुष्यातील काही काळ रेझोल्यूट बे मध्ये, कोर्नवालिस बेटावर घालवला आणि कित्येक वर्षांनी त्यांना आपल्या गावात पाय ठेवता आला. त्या नाट्यमय घटना त्यांनी रांकोंत्र या नियतकालिकात १९९१ साली प्रकाशित झालेल्या 'मेम्वार' या लेखात निवेदन केल्या आहेत.

मार्कूझी पात्सोक यांच्या वैयक्तिक जीवनाबद्दल फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. त्यांचे चरित्रलेखक आणि त्यांच्या साहित्यिक प्रवासात अतिशय मोठा सहभाग असलेले जेम्स एच. मॅक्नील १९७५ मध्ये म्हणतात की मार्कूझींनी प्रदीर्घ काळापर्यंत आपले नाव मार्कूझी हेच पारंपारिकरित्या आपला निर्देश करायला म्हणून वापरले. सध्या ते आपले पूर्ण नाव, मार्कूझी पात्सोक असे वापरतात. आपल्या पाच भावंडांपैकी ते दुसऱ्या स्थानावर होते आणि त्यांच्या वडिलांचे नाव आलियेकायुट होते तर त्यांच्या आईचे नाव ईटा होते अशी अधिक माहिती मॅक्नील यांनी दिली आहे. तसेच सरकारने दिलेल्या ई ९-७२५ हा बिल्ल्याने त्यांचा निर्देश केला जात होता. सर्व इन्विट लोकांना असा बिल्ला वापरणे भाग होते.



**मार्कूझी पात्सोक : एक असाधारण लेखक**

१९६९मधील ‘शिकाऱ्याचा भाला’ या कादंबरीशिवाय, मार्कूझींनी १९७२ मध्ये आणखी एक कादंबरी इंग्रजीत प्रकाशित केली. ‘विंग्ज ऑफ मर्सी’ ही ती कादंबरी इनुट्टिटूट या नियतकालिकात पाच भागात प्रकाशित झाली. पहिल्या कादंबरीपेक्षा ही कादंबरी खूपच वेगळी आहे आणि ती पारंपारिक जीवनापासून खूपच वेगळे जीवन दाखवते. विमानाचा कप्तान एका तरूण मुलाला वाचवताना कोणकोणत्या संकटांतून जातो हे त्या कादंबरीत वर्णन केले आहे. इन्विट आणि इन्विटेतर जगांत समन्वय घडवून आणण्याची इच्छा या कादंबरीतून दिसते, असा तिचा अर्थ लावला गेला होता. कॅनेडियन इन्विट साहित्यावर लिहिलेल्या आपल्या प्रबंधात रॉबिन मॅक्ग्राथ म्हणतात: ‘इन्विट आणि तद्भिन्न लोकांत सहकार्य असावे यावर या कादंबरीत भर दिला गेला आहे आणि त्यातील पात्रावर आलेल्या संकटांतून सुटका होताना पारंपारिक कौशल्य आणि नवीन अद्ययावत तंत्रांचा वापर केला गेला आहे.’ ते काही असले तरी १९७० सालाच्या आसपास इन्विट साहित्याकडून असलेल्या अपेक्षांच्या विशिष्ट क्षितिजापासून ह्या कलाकृतीचा विषय दूर गेल्याने त्या कलाकृतीला पुस्तकाचे स्वरूप कधीही मिळाले नाही. देशत्याग करून उच्च आर्किक्टच्या दिशेने आपण कसे गेलो हे निवेदन करण्याशिवाय, मार्कूझींनी वेगवेगळ्या नियतकालिकांतून बरेचसे लेख प्रकाशित केले ,पण ते मुख्यत:, ‘शिकाऱ्याचा भाला’ त्यांच्या पहिल्याच कादंबरीमुळे ओळखले जातात आणि त्यावरच त्यांची प्रसिद्धी अवलंबून आहे.

(इन्विट आणि तद्भिन्न, पारंपारिक आणि समकालीन ह्या दोन जगांच्या दरम्यान वसणारे ) थोडेसे भिडस्त पण कित्येक अंगांनी असाधारण लेखक म्हणनू मार्कूझी यांची प्रतिमा निर्माण करण्यात जेम्स एच, मॅक्नील यांचे मोठे योगदान आहे. लिखित अशा पहिल्या इन्विट कादंबरीचे लेखक म्हणून त्यांच्या निर्देशापलिकडे मार्कूझी हे पहिले इन्विट वैमानिक झाले असेही मॅक्नील सांगतात. एखाद्या साहसी लेखकाप्रमाणे, वैमानिक आणि लेखक अशी ही कार्ये ते सुसंवादीपणे एकत्रित करत असत. ‘जेव्हा हवामानाच्या परिस्थितीमुळे प्रदीर्घ काळ मार्कूझींना विमान उडवणे शक्य नसायचे तेव्हा ते लिहित असत.’ मॅक्नील मार्कूझी यांचे शारीरिक वर्णन पुढीलप्रमाणे करतात. ‘मार्कूझी एक लहानखोर, लाजाळू व्यक्ती आहेत. ते संथपणे आणि प्रयत्नपूर्वक

हलक्या आवाजात बोलतात. वैमानिक आणि रेडिओ ऑपरेटर वापरतात ती, वेळ वाचवणारी वाक्ये त्यांच्या बोलण्यात वारंवार येतात.'

आर. डब्ल्यू. नोबेल सारख्या काही टीकाकारांना मार्कूझींच्या कृतींमध्ये रस असायचं कारण म्हणजे त्याद्वारे ते एकदम थेट इन्विट संस्कृतीत जाऊन पोहोचतात. 'मार्कूझी हे आपल्या परंपरेच्या गाभ्यातच वसतात' मॅक्नीलच्या मते मार्कूझींना हे जमण्याचे कारण 'हा लेखक दोन विश्वांत राहात असतो.' 'मार्कूझींकडे एकच गोष्ट स्वतःच्या आणि आमच्या अशा दोन्ही भाषांत सांगण्याची दुर्लभ खुबी आहे. ते संपूर्णपणे एस्किमो आहेत, पण इंग्रजीचं चांगलं ज्ञान असल्याने त्यांचा एक पाय दाक्षिणात्य जगातही आहे' असं मॅक्नील यांचं मत आहे. आपली संस्कृती उत्तम रित्या संक्रमण करू शकणारे इन्विट, त्यांचं विश्व आणि त्याहून विभिन्न विश्व यांच्या दरम्यान राहातात, ही कल्पना अगदी आजही वारंवार मांडली जाते, ह्याचंच उदाहरण म्हणजे इंग्रजी, फ्रेंच आणि इनुक्तिटुटमध्ये गाणाऱ्या, नुनाविकमध्ये साल्विटला जन्माला आलेल्या एलिसापी इसाक ह्या गायिकेचे यश होय. अर्थातच ह्या कल्पनेला थोडासा मोड घातला पाहिजे : तामुसी क्युमाक सारखे इतर कलाकार केवळ एकाच भाषेत काम करतात आणि तरीही त्यांच्या कृतींतील बौद्धिक मौलिकता आणि उपयुक्तता यासाठी त्यांची प्रसिद्धी आहे.

जेम्स एच मॅक्नील यांचे मार्कूझींच्या कारकीर्दीतील सहकार्य केवळ त्यांनी 'शिकाऱ्याचा भाला' या पुस्तकाच्या इंग्रजी भाषांतराला लिहिलेल्या प्रस्तावनेपुरते आणि नंतर त्यांनी लिहिलेल्या मार्कूझींच्या छोट्याशा चरित्रापुरतेच मर्यादित नाही. १९२५ साली आल्बर्टा येथे एड्मोंटोंनला जन्माला आलेल्या, व्यवसायाने सैनिक आणि सरकारी नोकर असलेल्या मॅक्नील यांनी १९६७ पासून केंद्रीय मंत्रालयात उत्तरेकडील आणि इंडियनांचे विषय या विभागात 'साहित्य विकासाचे तज्ञ' हे पद हाताळलं होतं. ह्या आगळ्यावेगळ्या विभागाचा उद्देश इन्विट लोकांना लिखित संस्कृतीकडे वळवणं हा आहे. हा विचार त्याच दशकामध्ये सर्वत्र लागू केलेल्या आणि इन्विट लोकांवर लादलेल्या स्थानबद्धतेच्या चळवळीचीच पुढची पायरी होता. जरी या चळवळीमागचे उद्देश चांगले होते, तिचा परिणाम भटकेपणापासून एकाच जागी स्थिर होण्यात आणि निदान मॅक्नीलांच्या मते तरी, मौखिकतेचा

बदल लिखित संस्कृतीत होण्यात झाला.

मेरिली मॅक्क्युलोचनी म्हटले आहे की मॅक्नील यांचे योगदान 'एस्किमो लोकांना वैयक्तिक पातळीवर स्वत:च्या भाषेत आणि इंग्रजीमध्ये सर्जनशील लेखन करायला शिकवण्यात' होते. ते साध्य करण्यासाठी त्यांनी प्रथम मॅकेन्झी नदीकाठच्या कहाण्या गोळा केल्या आणि मॅक्क्युलोचच्या मते, 'एस्किमोंच्या भाषेतले, मनोरंजनात्मक वाचनासाठी उपयुक्त पहिले पुस्तक' प्रकाशित केले. १२३ पानांचे हे पुस्तक उच्चारानुसार लिहायच्या लिपीमध्ये आहे आणि त्याचे शीर्षक *जॉन अयारूआकची आत्मकथा* असे आहे. या पुस्तकाची एक प्रत प्रत्येक इन्विट कुटुंबाला दिली गेली होती आणि अशा रितीने त्या कुटुंबातील प्रत्येक घटकव्यक्तीला लेखनाला आणि त्याचबरोबर मंत्रालयाने प्रस्थापित केलेल्या इनुटिटूट नियतकालिकाची पाने भरायला उद्युक्त केले गेले होते.

मार्कूझींनी हे आत्मचरित्र वाचलं होतं आणि त्यामुळे त्यांना स्वत: लिहिण्यासाठी आवश्यक ते प्रोत्साहन मिळाले होते असे निदान मॅक्नील तरी सांगतात :

'जॉन अयारूआक मार्कूझींनी वाचलं होतं आणि लिहायला सुरवात केली होती. मी लवकरच त्यांच्याशी संपर्क साधला. त्यांचं उत्तर होकाराचं होतं 'आणि ते पूर्ण झाल्यावर मला त्यात रस असेल का?' अशीही त्यात पृच्छा होती. अर्थातच उत्तरेकडून कुणी प्रवासी यायला आणि माझ्या हातात कागदांनी भरलेलं एक पाकीट ठेवेस्तोवर बराच काळ गेला. अनेक एस्किमो मित्रांच्या मदतीने, त्यातील हस्तलिखित मोठ्या काळजीपूर्वक वाचलं गेलं. आम्ही ज्याची वाट पाहात होतो ते, नवयुगाची घोषणा करणारे ते लिखाण होतं. इनुटिटूटमध्ये आम्ही मार्कूझींची कादंबरी एस्किमो भाषेतच क्रमश: प्रकाशित केली आणि त्याचबरोबर आम्ही तिच्यासाठी इंग्रजी प्रकाशकाचाही शोध घेत राहिलो. हा प्रकाशक म्हणजे मॅक्गिल-क्वीन्स च्या युनिवर्सिटी प्रेसचे रॉबिन स्त्राखन होते आणि त्या पुस्तकाचे त्यांनी जे चीज केलं ते आपण पाहातोच आहोत, अर्थात ते तरूणांसाठी लिहिलेल्या कादंबरीच्या स्वरूपात होते. या इंग्रजी आवृत्तीतूनच फ्रेंच भाषांतर(१९७०), जर्मन (१९७४) आणि डॅनिश

भाषेत (१९९५) भाषांतरे झाली. तथापि ही आवृत्ती प्रकाशित होईस्तोवर कोणीही ही कादंबरी इनुक्टिटूट भाषेत पुस्तकाच्या स्वरूपात प्रकाशित केली नव्हती.

## कादंबरीची निवेदनात्मक संरचना...

*ह्या* आवृत्तीसाठी खास करून लिहिलेल्या प्रस्तावनेत, मार्कूझी पात्सोक म्हणतात की, ह्या कादंबरीचं कथानक त्यांना त्यांच्या लहानपणी सांगितलं गेलं होतं आणि ते कथानक इन्विट लोकांच्या मौखिकी संस्कृतीचा हिस्सा आहे. मौखिकतेचे काही अंश जरी त्यांनी घेतले असले तरी त्यांनी साहित्यिक रचनेची निर्मिती केली आहे आणि तिच्या विश्लेषणात वैविध्य सापडते. सेथ बोवींनी म्हटल्याप्रमाणे 'मार्कूझींची लघुकादंबरी ही एक चांगल्यापैकी गुंतागंतीची काल्पनिक कलाकृती आहे आणि ज्या वरकरणी साध्या आणि पारंपारिक सामानापासून निर्माण केलेली आहे त्याच्याही ती पलिकडे जाते.'

कादंबरीतील तरूण नायक विविध टप्पे ओलांडत वेगवेगळ्या आव्हानांना तोंड देत देत जातो, त्यामुळे त्याच्यात परिवर्तन होत जाते आणि तो शेवटी शिकारी म्हणजे इन्विट म्हणतात तसा 'पुरूषांतील एक पुरूष बनतो', म्हणून ही कादंबरी जीवनाध्ययनाचा परिचय करून देणारी आहे असं काही टीकाकारांनी तिचा अर्थ लावताना म्हटले तर काही टीकाकारांनी ही कादंबरी तिचा नायक प्राथमिक गरजांचे समाधान करत, शत्रूपासून संरक्षण करून घेत आणि मूलभूत मूल्यांचा शोध घेत संकटांवर मात करत जाताना दाखवते आहे, असा तिचा अर्थ केला आहे. या दृष्टिकोणातून असो किंवा त्या दृष्टिकोणातून असो, कथानकातील पात्रांनी ज्या संकटांशी सामना दिला ती संकटे कथानकाच्या प्रवाहाचे वेगवेगळे भाग पाडतात आणि त्यांचे संवर्धन करतात.

जॉन सी. स्कॉट यांच्या मतानुसार, कामिकला स्वत:चं अस्तित्त्व तीन प्रकारे सिद्ध करून दाखवावं लागते : एकतर त्याला त्याच्या वडिलांच्या मृत्यूचा सूड घ्यावा लागतो,आपल्या गावाचे संरक्षण करण्यासाठी पुढे सरसावे लागते, आणि आपल्या शत्रूंसमोर काळजीपूर्वक आणि सावधगिरीने हालचाल करावी लागते. ह्यात यशस्वी होण्यासाठी, त्याला शक्तीचा,बुद्धिचा आणि

कल्पकतेचाही वापर करावा लागतो आणि त्याचबरोबर हताशपणा या अंतर्गत शत्रूबरोबर झगडा करावा लागतो. शिकारीमार्फतच त्याला आपली परिपक्वता सिद्ध करून दाखवता येते. प्रथम तो सील माश्यांवर हल्ला करतो, नंतर तो अस्वलाबरोबर दोन हात करतो आणि सरतेशेवटी तो सुगंधी बैलाबरोबर झुंज देतो.

कथानकाचा धागा अशाप्रकारे सपाट पद्धतीने ओळीओळीने जात नाही तर लेखक अतिशय काळजीपूर्वक निवेदनात्मक घोषणा प्रस्थापित करत जातो, आणि येणाऱ्या संकटांची चिन्हे म्हणून त्यांचा वाचकावर परिणाम होत राहातो. आपल्या कलाकृतीच्या अगदी पहिल्या शब्दांपासून, मार्कूझी येऊ घातलेल्या कथानकातील खेळीतील विविध तत्त्वांची प्रतिस्थापना करतात, मग ते वातावरण असो,संकटांवर करायची मात असो, शिकार आणि भाला असो किंवा कामिकच्या शिक्षणाचा प्रारंभ असो. 'आपण लवकरच शिकारीला जाणार आहोत, त्यासाठी आपण आपल्या भाल्यांना धार लावायला लागावं, हे सगळ्यात उत्तम. कामिक, तू मला मदत करायची हं!' नायकाचे वडिल त्याला म्हणाले.

निवेदनाचे लक्ष सतत तीन बिंदूंमध्येच फिरत राहाते : कामिक आणि शिकारीला निघालेले शिकारी, त्याची आई आणि वस्तीवर राहिलेले इतर रहिवासी, आणि कामिक आणि त्याच्या मित्रांच्या मदतीला निघालेला शेजारच्या गावातील शिकाऱ्यांचा घोळका. या परिवर्तनांमुळेच कथानकाला एक सजीवपणा येतो, कारण कथानकाच्या नाट्यमयतेच्या तीव्रतेनुसार लेखक या बदलांतील कोणत्या बिंदूपासून कोणत्या बिंदूकडे जायचं याचा वेगही जुळवत राहातो.

साऱ्या कलाकृतीभर पात्रांवर कोसळणाऱ्या संकटांच्या पूर्वसूचना येत राहातात: अगदी सुरवातीला उरामिक गावच्या पुरूषांना जाताना पाहाते, 'जणू काही तिला ते आता पुन्हा कधीच दिसणार नव्हते... शिकारीची ही मोहीम रक्ताने थबथबणाऱ्या शोकांतिका बनणार आहे याचं पूर्वज्ञान तिला होत होतं.' नंतर, गावातील वयाने सर्वात मोठा असलेला सूना धोक्याची सूचना देतो की शेजारच्या गावापासून आपल्या वस्तीला वेगळा करणारा नाला म्हणजे एक

धोकाच आहे आणि त्याच्याशी झुंज न घेणंच बरं : 'जो कोणी तो पार करून जायचा प्रयत्न करतो त्याला बर्फाबरोबर पार समुद्रापर्यंत वाहून जाण्याचा धोका आहे.' आणि सरते शेवटी, उरामिकला एक भीतिदायक स्वप्न पडतं आणि सारे शिकारी मारले गेले आहेत असं ती त्यात पाहाते. अशा प्रकारची विविध चिन्हे साऱ्या कथानकाच्या संरचनेत वारंवार येत राहातात आणि कादंबरीच्या शेवटी कथानकाच्या घटनांचा वेग वाढवतात. तसं केलं नसतं तर कादंबरीचा शेवट इन्विटेतर संस्कृतीच्या वाचकांच्या नजरेला कृत्रिम वाटला असता जरी इन्विट कथांशी परिचित असलेल्या व्यक्तीला तो अगदी स्वाभाविक वाटला असता.

निवेदनाच्या शेवटी एकामागून एक, वेगानं पात्रांचे मृत्यू होत जातात, त्याच प्रमाणे कामिक आणि पुतुक्तींमधील भावनांमध्ये वेग आलेला दिसतो, हे नाट्यमयतेच्या वास्तविकतेबद्दल किंवा इन्विट लोकांच्या वास्तवाबद्दलच्या कथानकातील अधिकृततेबद्दलचे दोष काही टीकाकारांनी दाखवले आहेत. फ्रेड ब्रूएन्मेर यांच्या मते 'पुस्तकात अधूनमधून असंभव किंवा अगदी चुका दिसतात.' उदा. सुगंधी बैलांनी कादंबरीत दाखवलेली अतिरेकी आक्रमकता तसेच प्राण्याच्या शरीरातून बाहेर काढता येत नसतानाही पांढऱ्या अस्वलावर हल्ला करायला एकापाठोपाठ भाल्याचा वापर केला जाणं आणि इसा आणि मित्तिकच्या मदतीला येणारे शेकडो गावकरी उपस्थित व्यक्तींच्या संख्येबद्दलची अतिशयोक्ती. थोडक्यात म्हणजे, नाट्यमयता अधिक नजरेत भरावी म्हणून मार्कूझी कथा अधिक भडक करून सांगत होते,आणि कादंबरीत ते करायला परवानगी मिळाली नसती.

## हिंसा आणि वैराच्या भावनेने भरलेले विश्व...

इन्विट साहित्याशी पहिल्यांदाच संपर्कात येणाऱ्या वाचकाला त्या कादंबरीत संकटांवर मात करण्याला , अगदी असंस्कृत वर्णनांना आणि पात्रे आणि निसर्ग यांच्यातील शक्तीनिष्ठ संबंधांना दिले जाणारे महत्त्व पाहून दचकायलाच होते. मृत्यूवर मात कशी करायची आणि त्या विश्वात अत्यावश्यक गोष्टी काय हे सांगणाऱ्या साहित्याच्या मूल्यांचा शिकाऱ्याचा भाला ह्या कादंबरीने नि:संशय स्वीकार केला असतानादेखील मार्कूझी तिच्या

कथानकात ज्यांच्यामुळे आर्किक्टच्या प्रस्तुतिकरणाबद्दलच्या काही जुन्या कल्पनांना बाजूला सारणं शक्य होईल अशा काही गोष्टी घालू शकले आहेत.

टीकाकार ह्या कलाकृतीची ओळख तिच्या वेगळेपणासाठी न करून देता, तिच्यातील प्रातिनिधिकत्वासाठी करून देतात. इन्विट लोकांबद्दलची जुनी मतं आणि ध्रुवप्रदेशातील जगातील क्रूरता हे विचार पुन्हा एकदा पक्के होतील असे घटक तिच्यात शोधण्याचा ते प्रयत्न करतात आणि अशा रीतीने, त्या 'अधिकृतते'त या कादंबरीचे स्थान पक्के करतात. ह्याबद्दल आपण अगोदरच चर्चा केली आहे. हे सारं घडत असताना कलाकृतीच्या अर्थाला मोड घातल्याशिवाय राहात नाही. अशा रीतीने, जुनी कल्पना पुन्हा एकदा उचलून घेत, जेम्स एच. मॅक्नील त्यांच्या प्रस्तावनेत म्हणतात, 'हिवाळा हा गोष्टी सांगायला नेहमीच अनुकूल ऋतू असतो कारण 'जेव्हा बर्फ खिडकीच्या काचांवर आपटत असतं आणि वारा घोंघावत घरांभोवती धावत असतो तेव्हा गोष्टी सांगण्याची वेळ असते.' तथापि, वाचकाने कितीही प्रयत्न केला तरी मार्कूझींच्या कादंबरीत घरं, खिडक्या आणि घरातील आसरे त्याला सापडणार नाहीत. कारण आपल्या कादंबरीत, पात्रांच्या जीवनातील घडामोडी सादर करण्यासाठी, मार्कूझी आसऱ्यांपेक्षा हिवाळाच सादर करणे पसंत करतात. आर्.डब्ल्यू. नोबेल यांच्या मते, मार्कूझींच्या कथेत इन्विट विश्वाशी निगडित पूर्वग्रहनिष्ठित मते, उदा. नैसर्गिक तत्त्वांच्या तुलनेने शिकाऱ्यांना उपलब्ध साधनांचा अपुरेपणा, क्रूर थंडी, अन्नाचा तुटवडा आणि बर्फाने निर्माण केलेले धोके, इ. नक्कीच येतात.

हिंसेने भरलेली दृश्ये, दैवावरची निष्ठा, पात्रांचं एकामागून एक मृत्युमुखी पडणं आणि अर्थातच कथेच्या शेवटी तरूण नायकाने आत्महत्त्या करणं यांमुळे ही कादंबरी तरूण वाचकांसाठी लिहिलेल्या पुस्तकांत आढळणाऱ्या कथानकांच्या आकृतिबंधांपेक्षा खूपच वेगळी दिसते, तरीही ती प्रकाशित झाली तेव्हा तिच्या इंग्रजी प्रकाशकाने तिचे वर्गीकरण याच गटात केले होते. सेठ बोर्वींच्या मते, 'शिकाऱ्याचा भाला' ही कादंबरी तरूणांसाठी लिहिलेली कादंबरी मानली जाणं हे मूर्खपणाचं ठरेल आणि हे वर्गीकरण कादंबरीचं सौंदर्यविषयक आणि ऐतिहासिक महत्त्व घटवतं. इतकंच नव्हे तर मार्कूझींची कादंबरी तरूणांसाठी लिहिलेल्या कादंबरीशी जोडणं म्हणजे वीसाव्या

शतकाच्या सुरवातीला सुरू झालेल्या आणि तत्सम संस्कृतीतील कित्येक कलाकृतीत दिसणाऱ्या इन्विट संस्कृतीजगताला बालिशपणे वागवण्याच्या भूमिकेसारखंच आहे.

मार्कूझींचे कादंबरीविश्व एका मागून येणाऱ्या मृत्यूंनी, हिंसेने आणि सूडाच्या भावनेने घडत जाते. कादंबरी उघडल्यापासून, निसर्गाशी असलेला संबंध झगड्याच्या शब्दांतच मांडला जातो. ते लिहितात : कित्येकदा, निसर्गच त्यांचा नाश करायला टपून बसल्यासारखा दिसतो. कथानकाची घडण म्हणजे वेगवेगळ्या माणसांचा मृत्यूच आहे : अगोदर कामिकचे वडिल मरतात, नंतर अस्वलाने हल्ला केलेल्या शिकाऱ्यांच्या घोळक्याचा मृत्यू होता, नंतर कामिकचे जवळचे नातेवाईक बर्फाळ पाण्यात बुडून मरतात, आणि सरते शेवटी कामिक स्वत: मरतो. संपूर्ण कथेवर नैसर्गिक ताकतींसमोरच्या हतबलतेची, दैववादाच्या अतिशय जवळची वाटावी अशा पराभूततेच्या भूमिकेची छाप दिसते. तिचे उदाहरण कामिकची आई उरामिक आणि तिची मैत्रिण, तुगाक यांच्यातील पुढच्या संभाषणात दिसते.

'आयुष्य इतकं कठिण का आहे?' उरामिकने दमलेल्या आवाजात विचारले. 'जिवंत राहाण्यासाठी आपण सतत झगडतच राहिलं पाहिजे काय?'

'असं नको बोलूस, उरामिक. कोण जाणे? कदाचित एके दिवशी साऱ्या गोष्टी बदलतील देखील.'

'नुसती स्वप्नं पाहातेयस.'

'काही स्वप्नं साकार होतातही.'

'माझ्याबाबतीत तरी तसं घडलं नाही.'

आर्किक्टच्या प्रदेशात ताकत, क्रौर्य आणि धोक्याचा प्रतिनिधी असलेल्या अस्वलाबद्दलच्या सूडाच्या भावनेनं कथेला आणि तिच्यातील घटनांना आधार दिला आहे. अशा रितीने कामिक त्याने मारलेल्या अस्वलाच्या मुडद्यावर तुटून पडतो. 'ते अस्वल फार लवकर मरण पावलं, जणू काही त्याला फार वेळ हाल सोसावे लागले नाहीत, हळू हळू ,संथपणे मरताना

त्याला पाहायला कामिकला आवडलं असतं. त्याने आपला बर्फाचा चाकू घेतला आणि त्या अस्वलाच्या केसाळ कातडीत भोसकला.'

मृत्यू हा एक रक्ताने लडबडलेली कृती आहे, असं वास्तववादी वर्णने दाखवतात, मग तो मृत्यू कथेच्या सुरवातीला कुणा अस्वलाने खच्ची केलेल्या कुत्र्यांचा असो (' काहींची पोटं चिरलेली होती, इतर काही कुत्र्यांचे पाय खेचून काढून टाकले होते. ह्या एका कुत्र्याचा गळा कापला होता, त्या दुसऱ्याची सारी आतडी त्याच्या पोटातून बाहेर काढली होती.') किंवा मोहीमेवर गेलेल्या त्या श्वापदाने चिंध्या केलेल्या शिकाऱ्यांचा मृत्यू असो.

'आपल्या धारदार नख्यांनी, त्या प्राण्याने त्यांच्या पोटांची पार या टोकापासून त्या टोकापर्यंत चिरफाड केली होती. नूलाकची आतडी बर्फाला रक्तलांछित करत होती....हा सारा रक्तपात पाहून येणाऱ्या ओकारीवर कामिकला ताबा मिळवता आला नाही.'

मार्कूझींच्या वाचकाला क्रूरतेच्या दृशांना सामोरे जावेच लागते आणि आर्किक्टच्या विश्वातील क्रूरतेसमोर पूर्णपणे हतबल असलेल्या मानव आणि श्वापद यांच्यातील समानतेचे संबंध ती दृश्ये सूचित करतात.

जेम्स एच, मॅक्नील यांना ह्या कथेत पारंपारिकरित्या सादर केल्या जाणाऱ्या अति-उत्तरेसंबंधींच्या जीवनशून्य, दु:खी आणि विराण जगाच्या दृढ कल्पनांची विरचना करण्याचा उद्देश दिसतो. मार्कूझींनी निर्माण केलेल्या पात्रांच्या जिवंत राहाण्याच्या प्रयत्नामार्फत काही जीवनशक्ती आपल्या अस्तित्त्वाचे संरक्षण करण्यासाठी प्रखरपणे धडपडत आहेत, असे दिसते. काही प्रस्थापित कल्पनांना बाजूला सारून, मार्कूझी आपल्या पात्रांना, ज्याला त्यांच्या वास्तवाचे पर्यावरण म्हणता येईल, त्यात प्रस्थापित करतात किंवा ते त्यांच्या पात्रांना त्यांचे स्वत:चे विश्व देण्याचा प्रयत्न करतात. अशा रीतीने सर्वस्व गमावल्यामुळे हताश झालेला नायक थंडीलाच आवाहन करतो. कारण तीच आता त्याची सहकारी बनली आहे, हे पाहून वाचक अचंबितच होतो 'आता जोरदार थंडी पडावी असं कामिकला वाटतं, कारण त्यामुळे तो अधिक आरामाने,अधिक वेगाने पुढे जाऊ शकेल.' त्याचप्रमाणे त्या तरूण माणसाला एका रात्री अचानक आकाश उत्तर ध्रुवावरील विविध रंगी-बेरंगी किरणांच्या

पहाटेने उजळून निघताना दिसते. 'ती पहाट किती सुंदर होती! हे जग इतकं सुंदर आणि तरीही इतकं क्रूर कसं असू शकेल?' सरतेशेवटी, मार्कूझी मृत्यूवर मिळवायच्या विजयाबद्दलच्या या कादंबरीत पात्रांचे वास्तवाशी असलेले संबंध व्यक्त करणारे काही विनोदाचे क्षण प्रस्तुत करतात : पार थकून गेलेला कामिक जेव्हा आपला चेहरा बर्फाने पुसतो तेव्हा पुढील विलक्षण विचार त्याच्या मनात येऊन जातो : 'जेव्हा एखाद्याला बर्फाबद्दल प्रेम वाटत असतं तेव्हा त्याला त्याची निदान इथं तरी कमतरता भासत नाही.'

## मृत्यूवरची मात आणि बांधिलकी याविषयीची कादंबरी...

अत्यावश्यक आणि मूलगामी तत्त्वे पार मुळापासून भिनलेले इन्विट साहित्य एका नाविन्यपूर्ण पद्धतीनं आगळावेगळा संदेश घेऊन येते, तो संदेश आहे सुप्रयुक्ततेचा आणि कठिणात कठिण परिस्थितींवर मात करून तग धरून राहाण्याच्या मानवाच्या ताकतीचा. ह्या अर्थाने वैश्विक सांस्कृतिक वारशात ह्या साहित्याला पूर्ण अधिकाराचे स्थान मिळते. मृत्यूवर मात करायची ही ताकत आणि तिच्यातून जन्माला आलेल्या कथा, दंतकथा आणि लोककथा ह्या पारंपारिक जीवन दाखवणाऱ्या संहितांना पुरेपूर लागू पडताना दिसतात आणि ही त्यांची उपयुक्तता आपण अभ्यासित असलेल्या पुस्तकात काहीशा प्रमाणात दिसते.

अत्यंत कठोर जीवनपरिस्थितीमुळे, मृत्यूवर मात करण्याच्या ताकतीवरच्या कथानकाचे स्थान बनायला आर्किक्ट प्रदेशातील तो प्रदेश आदर्श आाहे हे टीकाकारांनी फारच लवकर उद्घोषित केले. 'तेथील खडतर वातावरण, धोकादायक प्राणी आणि विस्तृत, विराण आणि वस्तीहीन प्रदेश हे ह्या लेखनप्रकाराला आदर्श ठरावेत असे दिसते. 'आपल्या कलाकृतीत पात्रांना भेडसावणाऱ्या ह्या धोक्यांवर मार्कूझी भर देतात.' जिवंत राहाण्यासाठी इथे मनानं खूप खंबीर असावं लागतं.' किसिक उद्गारतो. जिवंत राहाण्यासाठी मानवाला सुप्रयुक्तता आणि धैर्य दाखवावं लागतं. आपल्या आवाक्यात असलेल्या आणि आपल्या भोवताली असलेल्या प्रत्येक गोष्टीचा उपयोग करायला कामिक लवकरच शिकतो : फोक माशाच्या कातडीची पिशवी, त्याची दोरी, अगदी त्याचे कपडेही. उपासमारीचा प्रसंग ओढवला तर त्याला अन्न म्हणून उपयोगी

पडू शकतात.

मरणावर मात करण्याच्या ह्या झगड्यात, मानव कधीच एकटा नसतो. इतर सगळ्या जिवंत प्राण्यांबरोबर, विशेषत: सुगंधी बैल, लांडगा आणि पांढरे अस्वल, यांच्याबरोबर त्याची चढाओढ चालते. मार्कूझींची कादंबरी जनावराचा एक गुंतागुंतीचा आकृतीबंध सादर करते. मानवाच्या संदर्भात ते जनावर अर्थातच क्रूरपणे वागते हे खरेच, पण एका धोरणाने आणि कठोर आणि निर्दय इच्छाशक्तीने प्रचरित होऊन ते आपला बचाव करते. निसर्गाच्या आणि भोवतालच्या परिस्थितीच्या या क्रौर्याशी मानव आणि प्राणी एकसारखे संघर्ष करत असतात. संकटांतून वाचण्यासाठी मानव जी सामूहिक आणि एकमेकांना मदत करण्याची मूल्ये बनवत असतो त्यांमुळे त्याची सामूहिकतेतील भूमिका निश्चित केली जाते आणि त्या सामूहिकतेपासून माणसाला कधीही अंग काढून घेता येत नाही. आर.डब्ल्यू. नोबल यांच्या मते ही मूल्येच सुरवातीच्या ज्या लेखकांच्या कलाकृतींबरोबर मार्कूझींच्या इन्विट कादंबरीची तुलना केली जाऊ शकत होती तिचे वेगळेपण प्रस्थापित करतात. 'त्या कथनामध्येच सामूहिक मूल्यांची एक वीण गृहीत धरली आहे जिच्यामुळे ती कथा सुरवातीच्या इतर उत्तर अमेरिकन साहित्यापेक्षा उठून दिसते.'

## पूर्वग्रहांच्या पलिकडे: समतेची कल्पना

आपल्या कालखंडाची साक्षीदार असलेली मार्कूझींची कादंबरी अनपेक्षित रित्या स्त्री-पुरूषांतील समतेची मूल्ये सादर करते. इव तेरिओ यांच्या आगागुक (१९५८) या क्वेबेकी कादंबरीत ज्याप्रमाणे एक इन्विट स्त्री, थेट पुरूषांच्या समक्षच आपला अधिकार प्रस्थापित करते, त्याप्रमाणे 'शिकाऱ्याचा भाला' ही कादंबरीदेखील, सबल, धैर्यशाली आणि आपली भूमिका इतरांसमोर स्पष्ट सांगायला न बिचकणाऱ्या इन्विट स्त्रीची एक सद्यकालीन प्रतिमा सादर करते. मार्कूझींच्या कथाविश्वात, तीन प्रमुख घटना स्त्री-पुरूषांतील समतेची कल्पना ठळकपणे मांडतात. सर्वप्रथम, जेव्हा शिकारी चवताळलेल्या अस्वलाच्या

Much of our oral history
has been lost or no longer
told by those who possess
such knowledge of our past.
It is my hope that story of
Kamik will live on for many
generation to come as it
is part of our history.
This is small part of our
past.
This is a story of my people.

Markoosie Patsauq.
INUKJUAK, QUEBEC.
September 15, 2010.

**मार्कूझीनी लिहिलेल्या प्रस्तावनेचे हस्तलिखित**

शोधात बऱ्याच वेळापासून गेलेले असतात तेव्हा उरामिक आणि तूगाक गावच्या सर्वात वृद्ध अशा सूनाच्या वाट पाहाण्याच्या भूमिकेला विरोध करतात. अधिक कुमक पाठवण्या अगोदर आणखी वाट पाहाणं अधिक योग्य अशी सूनाची भूमिका असते. उरामिक त्याला आव्हान देते आणि म्हणते : ‘शिकारी कुठेही गेले तरी, प्रत्येक दिवशी, अधिकाधिक धोक्यात आहेत हे समजण्याइतका तू म्हातारा आहेस.’ आणि आपणहून शिकाऱ्यांच्या शोधाला जाण्याऐवजी गप्प राहाणाऱ्या पुरूषांना उद्देशून उरामिक म्हणते ‘असंच असेल तर मीच जाईन’. दुसऱ्या दिवशी आपली मैत्रिण तुगाक हिच्याबरोबर ती जायला निघते तेव्हा मात्र पुरूषांनी आपलं मत बदलले आहे आणि तिच्या धाष्ट्यार्ने शरमिंदा होऊन ते तिच्या अगोदरच निघून गेले आहेत हे तिच्या लक्षात येते. ‘त्यांना शरम वाटली असावी,असं मला वाटतं.’

याशिवाय, पुतुक्की ह्या किकिताजोआक ह्या शेजारच्या गावाच्या

मुखियाच्या मुलीचे वर्णन तिचा दृढनिश्चय अतिशय चांगल्या रीतीने नजरेत आणून देते.

'माझं नाव पुतुक्की...मला एक भाऊ आणि एक बहीण आहे आणि मी सगळ्यात लहान आहे. अगदी लहान असतानादेखील मी एका जागी बसून राहू शकत नसे. बायकांच्या कामापेक्षा मला पुरूषांचीच कामं किती तरी पट अधिक आवडायची. मी माझ्या वडिलांबरोबर प्रवास करायला सुरवात केली आणि पुरूष आणि त्यांच्या कामाबद्दल खूप मला शिकायला मिळालं. मी नेहमीच प्रवास करत राहाणार आहे असं मला वाटतं. एखाद्या जागी स्थिर राहिलेली अशी मी मलाच दिसत नाही. मला साहसाबद्दल फारच आकर्षण आहे.'

जेव्हा 'ह्या प्रकारच्या मोहीमेत स्त्रियांना जागा नाही' असं इसा तिला सुचवतो तेव्हा 'अगदी चारचौघांसारखीच मीही अगणित संकटांना सामोरी गेले आहे,' असं ती त्याला सरळ उत्तर देते. धाष्टर्यामुळे तिला इसाचे कौतुक तर कामिकचे प्रेम प्राप्त होते आणि कामिक तिच्याबरोबर लग्न करू इच्छितो.

याहिपलिकडे गावप्रमुख आणि पुतुक्कीचे वडिल, आंगुतिक याच्या स्त्रियांकडे पाहाण्याच्या दृष्टिकोणात एक वेगळा मोकळेपणा आढळतो. एकतर आपल्याबरोबर कुणी यावं हे ठरवताना तो कोणतीही अट घालत नाही. 'या मोहिमेत माझ्याबरोबर ज्याला कुणाला यायचं असेल त्याचं स्वागतच आहे.' तो म्हणतो. त्यामुळे उरामिक आणि तुगाकना शिकाऱ्यांच्या शोधाला पुरूषांसमवेत जायची संधी मिळते. दुसरी गोष्ट म्हणजे, पत्नी म्हणून नेत्सियाकला पुतुक्की देणं आपल्या आवाक्याबाहेरचं आहे हे त्याला जाणवतं: 'तो निर्णय मी माझ्या मुलीच्याच हाती सोपवतो.'

स्त्री-पुरूषांना समानता देणाऱ्या समाजाच्या दिशेने त्याचा होणारा बदल हा साऱ्या कादंबरीभर प्रवाहाच्या एका बाजूच्या, कामिक ज्या वस्तीत राहात आहे त्या वस्तीतून प्रवाहाच्या पलिकडच्या बाजूला, स्त्रीपुरूषांतील ह्या समानतेला किंमत देणाऱ्या पुतुक्की आणि आंगुतिक राहात आहेत त्या, किकिताजोआक गावात जाण्यात सांकेतिकपणे दाखवला गेला आहे. कादंबरीत प्रतिबिंबित झालेल्या मूल्यांबद्दल विचार करणारे हे अंग फारच थोड्या टीकाकारांनी अधोरेखित केले आहे.

## भाल्याची सांकेतिकता

या कादंबरीचे शीर्षक शिकारी आणि त्याचा भाला असे नसून शिकाऱ्याचा भाला असे आहे, हे अधोरेखित करणं काही विनाकारण ठरणार नाही. कारण या कादंबरीचा प्रमुख विषय भाला हा आहे आणि शिकाऱ्याचे आयुध आणि साधन असलेल्या त्या भाल्यामार्फतच मानव आपल्या सभोवतालच्या जगताशी संबंध प्रस्थापित करतो. म्हणजेच भोवताली असलेल्या जगताच्या म्हणजे निसर्ग,प्राणी आणि इतर माणसे यांच्या संदर्भात तो भाला त्याच्या मर्यादित शक्तीचे तसेच मानवाच्या ताकतीचेही प्रतीक बनतो. भाला मार्कूझींच्या लिखाणात इन्विट मानवाच्या अस्तित्त्वाच्या विविध वैशिष्ट्यांचा समुच्चय करतो.



**कांदबरीच्या हस्तलिखितातील एक उतारा**

मृत्यूवरची मात आणि जीवनाध्ययनाचा परिचय चित्रित करणाऱ्या ह्या कादंबरीत, तरूण कामिकच्या मागे मागे प्रत्येक टप्प्या-टप्प्यात तो थेट 'सगळ्या पुरूषांपैकी एक पुरूष' होईस्तोवर तो भाला जातो. आपल्या भाल्याच्या मदतीनेच तो सीलमाशाची शिकार करतो आणि तशी शिकार करण्यातूनच तो चिकाटी आणि नेमका घाव कसा घालायचा ते शिकतो: 'अजून वाट पाहा' कामिक स्वत:लाच सांगत होता. 'मारायची घाई करू नकोस. योग्य वेळेची वाट पाहा.' त्याने आपल्या भाल्याचे टोक बर्फाला पाडलेल्या भोकाकडे वळवले आणि वाट पाहात राहिला.(...) सारी शक्ती एकवटून,कामिकने घाव घातला.' भाल्याच्या मदतीनेच आपल्या धैर्याच्या बळावर पहिल्या अस्वलाला काबूत आणण्यात तो यशस्वी ठरतो. आणि त्या भाल्याच्या टोकानेच अक्कलबाजपणे, प्रत्येक दिवशी संध्याकाळी, बर्फात आपला इग्लू उभारून थंडीपासून स्वत:चे संरक्षण करतो.

केवळ भालाच मानवाचे निर्दय आर्किक्ट प्रदेशात संरक्षण करू शकेल, चाकू नाही असे मार्कूझी कित्येक वेळा ठळकपणे सांगतात.

'मृत्यूची नजर आपल्यावर रोखलेली आहे ह्याकडे दुर्लक्ष करीत शिकारी मार्गक्रमण करीत होते. आपापले भाले हातात धरूनच ते अशा रीतीने आराम करण्यासाठी थोडंही न थांबता किलोमीटरच्या किलोमीटर, पादाक्रांत करीत होते.

किंवा पुढील वाक्यात : 'शिकारी चालतच होते, त्यांच्याजवळ भाले आणि धैर्य ही दोनच आयुधं होती.'

मृत्यूवरच्या विजयाचे आणि म्हणूनच मर्यादित शक्तीचे आणि त्याचबरोबर ताकतीचे प्रतीक असलेला भाला, मानवाला ज्याप्रमाणे समोरच्या बर्फाचा टणकपणा पारखायला उपयोगी पडतो, त्याचप्रमाणे सीलमाशावर, अस्वलावर किंवा अगदी गरजच पडली तर इतर माणसांवर हल्ला करायला उपयोगी पडतो. अशा रीतीने रात्रीच्या विशाल थंडीतील एकांड्या कामिकची निर्बलता त्याच्या बाजूला असलेल्या ह्या आयुधाने संपवलेली दिसते. 'मृत्यू आणि जीवनाचे साधन असलेला त्याचा भाला त्याच्याशेजारी विसावला आहे. इतका छोटासा भाला असला तरीही तो भाला किती ताकतवान आहे,.'

माणसां-माणसांमध्येही शत्रूला आपल्यापासून दूर ठेवायला भाला दाखवून धमकी देता येते किंवा आपल्याजवळ भाला आहे, हे नुसते सूचित करूनही ते शक्य होते. जेव्हा नेत्स्याक इसाला पुतुक्तीच्या जवळ जाऊ नकोस असे सांगतो. तेव्हा तो म्हणतो: 'तू जर तिच्या जवळ गेलास तर माझ्या भाल्याचे टोक तुझ्या गळ्याला गुदगुल्या करताना जाणवेल,' आणि त्याला उत्तर मिळतं :'माझ्याजवळही भाला आहेच.' इन्विट पुरूषांच्या लैंगिकतेच्या अर्थात सूचितार्थाने भर घालणारा भाला स्त्रियाही वापरू शकतात आणि ते नैतिकतेचे आयुध म्हणून! मित्राने चिडवल्यामुळे मितिक आपल्या सहकाऱ्याजवळ 'धैर्य दाखवणं आवश्यक असल्यामुळे मी मोहिमेत सामील होतो आहे,' तसं केलं नाही तर त्याची (आपली) बायको पार पृथ्वीच्या टोकापर्यंत भाला घेऊन त्याचा (आपला) पाठलाग करेल.' असं मनातील गौप्य सांगतो.

जॉन सी.स्टॉटच्या मते भाला हा सामान्यत: जीवन आणि मृत्यू यांच्यातील संघर्षाचे प्रतीक आहे. ह्यामुळेच ह्या कादंबरीच्या शेवटची कामिकची आत्महत्त्या अधिकच अर्थपूर्ण बनते. मृत्यूवरील विजय किंवा जीवनसंघर्षाचे पहिले धडे शिकवणाऱ्या कादंबरीतील हा प्रसंग अन्यथा समजावून सांगणे कठिण आहे. स्टॉटच्या मते साऱ्या कादंबरीभर कामिकने आपल्या भाल्याच्या मदतीने मोठ्या धैर्यपूर्वक निसर्गाशी सामना दिला आहे, पण निसर्गाने त्याच्या वडिलांना, त्याच्या मित्रांना,त्याच्या आईला , त्याच्या भावी पत्नीला मारून, त्याच्यावर विजय मिळवला. आपल्यावरही निसर्गाला मात करू न देण्यासाठी कामिकला एकच मार्ग उपलब्ध होता, तो म्हणजे निसर्गाने आपल्याला मरण्यास भाग पाडायच्या आधीच आपला भाला आणि आपलीच ताकत वापरून आपण आपले प्राण घ्यायचे.

## कामिकची अनपेक्षित आत्महत्त्या...

कादंबरीच्या अगदी शेवटी येणारी कामिकची आत्महत्त्या वाचकांना धक्काच देते: निदान इंग्रजीत प्रसिद्ध होणाऱ्या तरूणांसाठीच्या कादंबऱ्यांमुळे आणि एका तरूण मुलाचे वेगवेगळ्या टप्प्यांनी प्रौढ पुरूषात होणाऱ्या रूपांतरासाठी मानसिक रित्या तयार झालेला वाचक, कादंबरीच्या शेवटी अशा घटनेसमोर येऊन थोपतो जी निदान पहिल्या प्रथम तरी एक शोकात्मक

पराभव वाटते आपल्या प्रिय व्यक्ती गमावल्याने कामिक आपला संघर्ष थांबवतो आणि स्वत:चे प्राण घेतो.

कामिकच्या ह्या कृतीचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी टीकाकारांनी दिलेली स्पष्टीकरणं त्यांच्या मनातील गोंधळ स्पष्ट दाखवतात: जेम्स एच. मॅक्नीलना ' एस्किमो स्टाईल' च्या ठशाशिवाय दुसरा कोणताही अन्वयार्थ दिसत नाही आणि त्यावरही ते अधिक भाष्य करीत नाहीत. 'गोष्ट जसजशी उलगडत जाते त्याप्रमाणे कामिक, अविवाहित तरूण माणूस नायक बनतो. कथेचा शेवट हा पूर्णपणे आश्चर्यकारक आहे. दक्षिणेकडील वाचकांना तो थोडासा धक्कादायकच वाटेल पण तो पूर्णपणे एस्किमो पद्धतीचा आहे.'

सेथ बोवी त्याच प्रमाणे जोन सी.स्टॉटना, कामिकच्या अंतिम कृतीत, क्रूर आणि ताकतवान निसर्गाला आपल्यावर मात करू न देण्याचा उद्देश दिसतो: अशा रीतीने कामिकची आत्महत्त्या एका प्रकारे त्याचा विजयच दाखवते, आणि तिच्यामार्फत त्या तरूण माणसाची इच्छाशक्ती ही नैसर्गिक ताकतींपेक्षा अधिक बलवान असल्यासारखे दिसते. अशी भूमिका घेतली तर,संकटांवर मात करण्याची प्रवृत्ति ही इन्विटांच्या संदर्भात एकतर वैयक्तिक असणार नाही, तर सामूहिक असेल. निसर्गाच्या शक्तींनी एकाच व्यक्तीवर विजय मिळवलेला दाखवण्यापेक्षा, एक व्यक्ती निसर्गाच्या ताकतींवर मात करू शकेल असे समाजाला दाखवणे हे जास्त महत्त्वाचे ठरेल. आर.डब्ल्यू. नोबेल सामूहिकतेच्या स्थिरतेची भूमिका परत घेऊन पूर्व नियोजित नसलेल्या या आत्महत्त्येचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न करतात, पण तिला ते एक वेगळी दिशाही देतात. त्यांच्या मते कामिकला इतर लोकांशिवाय आयुष्य जगत राहाणे केवळ अशक्यप्राय होते. अशा रीतीने कामिक हतबलतेपायी आत्महत्त्या करत नाही तर त्याची सारी जमात मारली गेली आहे आणि आपण एकटे राहू शकत नाही असे त्याला जाणवते, म्हणून तो आत्महत्त्या करतो.

कथानकाच्या सूत्राच्या दृष्टिकोणातून कामिकची आत्महत्त्या वाचकाला अचंब्यात जरूर पाडेल पण ती कलाकृतीच्या संरचनेशी सुसंबद्ध आहे. ही घटना घडण्याअगोदर कित्येक वेळा मोठ्या काळजीपूर्वक तिची पूर्वसूचना

दिली गेली आहे. सीलची शिकार करताना नूलाक जेव्हा वेडाच्या झटक्याचा शिकार होतो आणि आत्महत्त्या करायचा प्रयत्न करतो तेव्हा वाचकाला पहिली सूचना दिली गेली होती: कामिक नूलाकला आत्महत्त्या करण्यापासून परावृत्त करतो. नूलाकला परत 'शहाणपणाच्या मार्गावर परत आणण्यात आणि हे प्रकरण मिटवून टाकण्यात शिकाऱ्यांना यश मिळाले तरी आत्महत्त्या म्हणजे कादंबरीतील नाट्यमय घटनांतील एक भाग आहे असे वेडाचा आलेला हा झटका दाखवतो.

एकमेकामागून एक तीन टप्प्यांचा विचार केला तर , आत्महत्त्या ही कामिकसाठी त्याच्या दुर्दैवांतून बाहेर पडण्याचा एक मार्ग आहे असे जाणवते: पहिल्या दोन अध:पातांना तो विरोध करू शकतो पण तिसऱ्या वेळी त्याला बळी पडतो आणि अशा रीतीने ह्या कलाकृतिच्या संरचनेतच भांबावून टाकणारा हा अंत लिहिला गेला आहे असे दाखवून त्या कलाकृतीच्या दैववादी भूमिकेला खतपाणी घालतो. पहिल्यांदाच जेव्हा हा मोहाचा क्षण सामोरा येतो तेव्हा कामिक मृत्यूने होणाऱ्या सहज सुटकेकडे पाठ फिरवतो :

'कामिक इतका दमला आहे. त्याला अतिशय भूक लागली आहे. अगदी मरून गेलेलंच बरं असं त्याला वाटतंय. नाही! असल्या गोष्टी मनात आणता कामा नये. जर त्याला वेदना होत असतील तर त्याचे कारण म्हणजे त्याला जिवंत राहायचंय. हळूहळू मरणाच्या दिशेने सरकत जाणं अगदी सोपं आहे. पण जिवंत राहाणं....' म्हणून तो आत्महत्त्येमार्फत प्राप्त झालेल्या सुलभतेपेक्षा जिवंत राहाण्याचा खडतर निर्णय निवडतो. दुसऱ्यांदा जेव्हा मोहाच्या क्षणी, भाला जवळच असल्याने मृत्यूही अगदी जवळच आहे असे मानायला त्याला मुभा मिळते. 'तो तिथेच तसाच, खूप वेळ निश्चल पडून राहातो. नंतर त्याला आपला भाला आपल्याजवळ पडलेला दिसतो.(...) एक थोडीशी हालचाल केली तरी चालण्यासारखं होतं. एक झटका द्यायचा आणि तो वेदना सोसणं थांबेल.' एक चांगला शिकारी होण्याचं त्याचं स्वप्न आणि आपल्या नातेवाईकांवर आपण किती दु:ख कोसळवू केवळ हे दोन विचारच त्याला हे प्राणघातक कृत्य करण्यापासून परावृत्त करतात. मोहाच्या तिसऱ्या वेळी,त्याने आपण चांगला शिकारी बनू शकू असे अगोदरच सिद्ध केलेले आहे

आणि त्याच्या जवळच्या नातेवाईकांची -त्याची आई, त्याची वाग्दत्त वधू, त्याचे सहकारी-त्याच्यावरची नजर विझली आहे. ज्या कृत्याचा कामिकने अगोदर दोनदा विचार केला होता ते कृत्य पूर्ण करण्यासाठी तो इतरांपासून दूर जातो. जे कृत्य करण्यापासून आपल्याला पर्याय नाही ते कृत्य पार पाडताना आपल्या सहकाऱ्यांनी आपल्याला पाहू येऊ नये, याची त्याने वाट पाहिली. (अधोरेखन मी केले आहे.) नंतर त्याला त्याच्या वडिलांच्या शब्दांची आठवण आली. सगळे जण एकमेकांना भेटतातच अशा चिरंतन शांततेचा ते उल्लेख करत होते. मग तो आपल्या भाल्याकडे पाहातो आणि आपल्याला मृत्यू नव्हे तर त्याबरोबर येणारी शांतता प्राप्त व्हावी अशी इच्छा त्याच्या मनात येते. 'शांति प्राप्त करायची, सर्व कुटुंबाला आणि त्याला प्रिय व्यक्तींना भेटायची वेळ आता आली होती.'

आणि कादंबरी एका नि:शंक आणि बेधडक कृतीने संपते: 'शिकाऱ्याच्या भाल्याने शेवटची म्हणून हत्त्या केली.'

दान्येल शार्त्ये
प्राध्यापक, मोरेआलचे क्वेबेक विद्यापीठ



नूनाविक क्वेबेक इथे कॅरिबूंचा घोळका नदी पार करताना- रॉबर्ट फ्रेशेत्त



एक इन्विट माणूस दूरवर पडलेले पाण्याने उंचावलेले बर्फाचे ढीग दाखवतो आहे- रॉबर्ट फ्रेशेत्त

## लेखकाचे मनोगत :

वडिलधाऱ्या माणसांच्या गोष्टी, खास करून कामिकची गोष्ट ऐकताना लहानपणी माझं भानच हरपून जायचं. एका संकटात त्याची सारी जमातच नष्ट झाली, उरला तो तो एकटाच आणि त्याला कितीतरी संकटांना सामना करायला लागला: खवळलेलं एक अस्वल, हिमवादळ, भूक आणि कित्येक वेळा निर्दयी बेबंद निसर्ग!

माझ्या अगदी लहान वयापासून कामिकची गोष्ट माझ्या स्मृतीत खोलवर रूजून राहिली आहे. पिढ्यान् पिढ्या, अगणित मुलांनी आणि प्रौढांनी ती कथा एकसारखी सातत्याने ऐकली आहे. ती जिवंत राहावी म्हणून मी ती लिहून काढली. बोली भाषेच्या स्वरूपात असलेल्या आमच्या इतिहासाची कितीतरी प्रकरणं कालौघात नष्ट झाली आहेत किंवा आपल्या भूतकाळाच्या जाणकार लोकांनी ते हस्तांतरित केलेली नाहीत.

ही कामिकची कथा येणाऱ्या पिढ्यांच्या हस्ते सुपूर्द केली जावी, असं मला वाटतं. आपल्या इतिहासाची ती एक अविभाज्य घटकच आहे. तीच आपल्या भूतकाळाबद्दलही साक्ष देते!

ती माझ्या लोकांचा इतिहास आहे.

# शिकाऱ्याचा भाला

# (१९६१)...

**मार्कूझी पात्सोक**
इनुकज्वाक( क्वेबेक)
१५ सप्टेंबर २०१०

वारा घोंघावत होता. बर्फाचे झोत इग्लूला झोडपत होते. असल्या वेळी, शिकार अशक्यच! तीन रात्री गेल्या, वादळ अजून शमायचं नाव घेत नव्हतं. आपल्याकडचा अन्नाचा साठा केवळ काही दिवसांचाच आहे, हे सुलुकला माहित होतं. वादळ अगदी लवकर शमलं नाही तर त्यांच्यावर भूकेची झापड पडणार होती. चार दिवसांपूर्वीच आपल्या मुलाबरोबर, कामिकबरोबर त्याने दोन सील मासे मारले होते. पण दोन सील मासे एक पुरूष, त्याचं कुटुंब आणि कुत्र्यांना पुरून पुरून किती दिवस पुरणार?

'पुढच्या शिकारीसाठी भाल्यांना धार लावायला आजच लागलेलं बरं. कामिक, मला मदत करायला लागेल तुला.'

असल्या कामांत आपल्या वडिलांना मदत करायला कामिकला खूप आवडायचं. सुलुकसारखंच आपणही मोठा शिकारी व्हायची त्याची इच्छा होती. त्याच्या नजरेत सुलुक उत्तरेकडच्या सगळ्या प्रांतातील सगळ्यात मोठा शिकारी होता. सुलुकवर एका कुटुंबाची जबाबदारी होती, पण कित्येकवेळा, जरी त्याने अथक शिकार केली, तरी त्यांची पोटं रिकामीच राहायची. ह्या दिवसांत अन्न म्हणून उपयोगी पडणारे आणि ज्यांच्या कातड्यांनी त्यांना आपलं अंग झाकता यायचं ते प्राणीच अधिकाधिक दुर्मिळ व्हायचे. खूपदा, निसर्गच जणू त्यांचा नाश करू पाहात असायचा.

'पुढच्या शिकारीच्या मोहिमेत आपण ध्रुवावरच्या एखाद्या अस्वलाचीच शिकार करावी असं मला वाटतंय, बाबा!' कामिकच्या आवाजात खूपच विश्वास भरला होता.

'मलाही तसंच वाटतंय.' सुलुकने उत्तर दिलं. 'ध्रुवावरच्या अस्वलापासून खूप मांस मिळतं आणि त्याच्या केसाळ कातडीपासून खूप चांगले कपडे बनतात.'

कामिकची आई उरामिक सील माशाची कातडी चावूनचावून नरम करत होती. सुलुक आणि कामिक त्यांच्या पुढच्या शिकारीच्या मोहिमेवर जातील तेव्हा त्यांच्यासाठी नवीन बूट बनवायचा तिचा बेत होता. आपली आई आपल्यासाठी इतक्या चांगल्या चांगल्या गोष्टी करते, त्यासाठी ती दिवसाच्या दिवस घालवते या विचारानं कामिकचा आनंद उफाळून आला. या मुलखात गरम कपडे घातल्याशिवाय कुणाचंही निभावतच नाही. पण असले कपडे घातल्यावर अगदी बर्फाळ थंडीचीदेखील त्यांना फिकीर नसायची.

कदाचित त्यांचं नशीब चांगलं फळफळेलदेखील....कदाचित ध्रुवावरच्या एखाद्या अस्वलाची ते शिकार करतीलही! पण अस्वलाची शिकार करणं सोपं नसतं. कामिकला ते माहित होतं. कित्येकदा शिकारी दिवसच्या दिवस खूप कष्ट करतात पण शेवटी रिकाम्या हातांनीच परत येतात. उत्तरेकडच्या प्रांतात, अस्वलाची शिकारच काय ती सगळ्यात कठिण गोष्ट आहे. जर त्याच्या जीवावरच बेतलं, तर ते जनावर कुत्र्यांप्रमाणेच माणसांवरही हल्ला चढवतं आणि त्यांना मारतंही. जगरहाटीच आहे तशी! या जंगली प्रदेशात, मानव आणि प्राणी दोघांनाही शिकार करूनच उदरभरण करावं लागतं. हत्त्याही करावीच लागते. इथे अधिक सबलच जिवंत राहू शकतात, दुर्बल चटदिशी मरतात.

कामिक शिकारीची कला शिकत होता. तरबेज शिकाऱ्याला माहित हवीत ती सारी तंत्रं त्याच्या वडिलांनी त्याला शिकवली होती. अचूक नेम लागावा म्हणून कामिक भाला फेकायचा सराव करत होता. तो आता सोळा वर्षाचा होता आणि त्याचा नेम एव्हानाच एखाद्या प्रौढ माणसासारखाच होता. शिकारीच्या मोहिमेत आपण पूर्णपणे सहभागी होऊ शकू असं आता त्याला वाटायला लागलं होतं. त्याच्या वडिलांनी एका हातानं अस्वलाला ठार मारलं होतं त्या दिवसाची गोष्ट कामिकने वारंवार ऐकली होती. सुलुकचं नशीब चांगलं होतं. अस्वलानं त्याला जमिनीवर पाडलं होतं पण तरीही

सुलुकने त्याच्या काळजात आपला भाला घुसवला होता. कितीतरी रात्री आणि दिवस, सुलुकला परत नीट चालता येत नव्हतं. अगदी आजही तो लंगडायचाच. तरीही कामिकच्या दृष्टीनं, तो साऱ्या उत्तरेकडच्या प्रांतातला सर्वश्रेष्ठ शिकारी होता.

आणि त्या रात्री आकाश कोसळलं. कामिक आडवा झाला होता खरा, पण त्याला झोप लागली नव्हती. अचानक कुत्र्यांच्या भुंकण्यानं सारी शांतता भंग झाली. कामिकनं त्याच्या वडिलांना गाढ झोपेतून जागं केलं. सुलुकने चटदिशी कपडे चढवले आणि कामिकचे बूट घालून व्हायच्या आतच तो बाहेर गेला. कामिकने बाहेर काय चाललंय ते पाहायला जेव्हा डोकं बाहेर काढलं तेव्हा हर हर हर! सुलुकच्या समोर एक मोठ्ठं पांढरं अस्वल उभं होतं. कामिकनं आपल्या वडिलांना आपला भाला उभारताना पाहिलं. कुत्र्यांबरोबर झगडण्यात सारं लक्ष केंद्रित झाल्यामुळे अस्वल इतर कुठेही लक्ष देत नव्हतं. सुलुकने नेम धरला आणि त्याचा भाला अस्वलाच्या मागच्या पायात जाऊन रूतला. जनावरानं एक भयानक किंकाळी फोडली. एका झेपेत त्याने कुत्र्यांकडे पाठ फिरवली आणि जितक्या वेगाने आलं होतं तितक्याच वेगानं ते दिसेनासं झालं. भीतिनं आपल्याच जागी खिळलेला कामिक अजिबात हलला नव्हता. ‘काय शरमेची गोष्ट आहे! आणि मी स्वत:ला शिकारी समजायला लागलो होतो हां....’ त्याच्या मनात विचार येत होता.

आपापले भाले घेऊन इतर सगळे धावत आले. पण आता खूप उशीर झाला होता. अस्वल तर निसटलं होतं. निराश होऊन ते शिकारी अस्वलाने मारलेल्या पाच कुत्र्यांच्या प्रेतांकडे पाहात राहिले. काही जणांचं पोट चिरलं गेलं होतं. काहीजणांचे पंजे उखडले गेले होते. या एकाचा गळाच चिरला गेला होता. त्या दुसऱ्याची आतडी बाहेर आली होती. त्यांच्या रक्तानं बर्फ लाल-लाल झालं होतं.

नंतर, कामिकच्या वडिलांनी इतर शिकाऱ्यांना ह्या अस्वलाचं वागणं विचित्रच कसं होतं ते सांगितलं. त्यांना ह्या प्राण्यांचा चांगलाच परिचय होता: त्यांच्या कुत्र्यांची हत्त्या करणाऱ्या अस्वलाचं वागणं चारचौघांसारखं नव्हतं. केवळ कुत्र्यांबरोबर झगडा करायला म्हणून कोणतंही अस्वल वस्तीजवळ येत

नाही. आजच्या रात्री त्यांच्यावर हल्ला करणाऱ्या अस्वलाला वेडंच लागलेलं होतं. या वेडाच्या आजाराबद्दल सुलुकनी बऱ्याच वेळा ऐकलं होतं. पण त्यांच्या आठवणीनुसार तो आजार केवळ कोल्हे आणि कुत्र्यांनाच होत होता. सुलुकची खात्री होती. या अस्वलाला रॅबीज झाल्या होत्या. आणि रॅबीज झालेलं अस्वल हेच काय ते या मुलुखातला सगळ्यात जास्त धोकादायक प्राणी होतं. त्याची इतर अस्वलांशी जर का झुंजाझुंजी झाली तर त्यांनाही त्याच्याकडून रॅबीजची बाधा होते आणि मग आसपासच्या साऱ्या मुलखात ना कुणी माणूस ना कुणी प्राणी त्यापासून वाचू शकतो. मग त्या रात्री साऱ्या शिकाऱ्यांनी काय वाटेल ते होवो त्या अस्वलाला ठार मारायचा निर्णय घेतला. त्याला लवकरात लवकर शोधलं आणि मारून टाकायला पाहिजे. सकाळ होता होताच ते मोहिमेवर निघणार होते.

'जमेल तितके लोक आपण बरोबर घेतले पाहिजेत.' सुलुकने आपली बाजू मांडली. 'आपली जर त्या अस्वलाशी गाठ पडली, आणि ती पडावी असंच मला वाटतंय्, तर तुमच्या आयुष्यातील ही सर्वात धोक्याची शिकारीची मोहिम ठरणार आहे. ज्यांना आमच्याबरोबर यायचं नसेल त्यांनी तसं सांगावं.'

खऱ्याखुऱ्या शिकाऱ्यात आपली गणती व्हावी या पातळीवर आपण पोहोचलो नसल्याचं स्पष्टपणे मान्य करावं असं कामिकला वाटत होतं. आपले वडिल अस्वलाबरोबर एकट्याच्या सामर्थ्यावर सामोरे गेले होते तर तो स्वत: अगदी नेभळटपणे वागला होता. पण कामिकला बोलायला जागाच नव्हती.

'ठीक आहे तर! मग वादळ शांत होवो किंवा न होवो, उद्या पहाट उगवताउगवताच आपण निघू या', सुलुकनी घोषणा केली. 'इसा आणि मित्तिक गावाचं आणि मागे राहाणाऱ्यांचं संरक्षण करतील. कदाचित आमची मोहीम खूप दीर्घ काळ चालेल... आणि आमच्यापैकी सगळेजण परत येतीलच याची खात्री देता येणार नाही.'

दुसऱ्या दिवशी वारा वाहायचा थांबला होता पण जोरदार थंडी होतीच. मित्तिक आणि इसा सोडले तर बाकीच्या सगळ्या शिकाऱ्यांनी मोहीमेवर जाण्यासाठी आपापली तयारीही केली. ते आपापल्या विचारांत हरवून गेले होते. आपण या मोहिमेतून जिवंत परत येऊ की नाही असा काहीजणांना

प्रश्न पडला होता...कामिकने आपल्या वडिलांना कुत्र्यांना जुंपायच्या कामात मदत केली. त्याची आई उरामिकनं त्यांची हत्त्यारं आणि जेवाय-खायच्या गोष्टी घसरगाडीला बांधल्या. सरतेशेवटी सगळेजण तयार झाले. चाबकाच्या फटकाऱ्यालगत, सगळे कुत्रे भुंकतभुंकत पुढे झेपावले. कामिक आणि सुलुकनी हात हलवून उरामिकचा निरोप घेतला. ती आपल्या इग्लूजवळ उभी होती आणि तिनंही त्यांना हात हलवून बाय बाय म्हटलं. आज परत एकदा तिच्या प्रिय व्यक्ती आपला जीव संकटात घालायला चालल्या होत्या. काही म्हटलं तरी शिकारीची ही मोहीम आजपर्यंतच्या सगळ्या मोहिमांपेक्षा जास्त धोकादायक ठरणार होती.

'त्या अस्वलाचा पिच्छा का नाही देत सोडून!' उरामिक स्वत:शीच म्हणत होती. पण तिला आपल्याला काय उत्तर मिळणार आहे याची कल्पना होती. त्याला मारलं नाही तर आज ना उद्या ते परत हल्ला करील आणि ते साऱ्या उत्तरेकडील मुलुखावर संकटाची सावट टाकील. उरामिक इग्लूच्या प्रवेशव्दाराकडे वळली, पण थबकली आणि शिकाऱ्यांना एकदा शेवटचं पाहायला म्हणून मागे वळली. ते आपल्याला परत कधीही दिसणार नाहीत अशा नजरेने तिनं त्यांच्याकडे पाहिलं, सगळं काही ठीकठाकच होईल अशी ती स्वत:चीच समजावणी करत होती, पण तरीही कुठेतरी खोल ह्या शिकारीच्या मोहीमेचा अंत एका रक्तलांछित शोकांकिकेतच होणार आहे अशी तिला पूर्वसूचना होत होती.

घसरगाडीवर बसल्याबसल्या कामिक अवतीभोवती पाहात होता आणि आदल्या रात्री जे काही घडलं होतं त्याची अगदी विनासायास क्रमवार पुनर्निमिती करत होता. एका कुत्र्याच्या पोटाच्या चिंध्या झाल्या होत्या, दुसऱ्याचा पंजा उखडला गेला होता. किती भयानक दृश्य होतं ते! कामिकला काही फारसा दिलासा वाटत नव्हता. आपलं धैर्य वाढवण्यासाठी, आता शिकारी त्याची आपल्यात गणना करायला लागले आहेत असं तो सतत स्वत:शी घोकत होता. आपल्या वाट्याला आलेल्या या सन्मानाला शोभेल असंच तो वागणार होता. या मोहीमेत साठ कुत्री आणि नऊ माणसं सामील

होती, सगळ्या शिकाऱ्यांनी हजारो संकटांचा सामना केला होता: रानटी जनावरं, भूक, आजार, निसर्गाचे थैमान! सगळ्यांनी मिळून जर प्रयत्न केला तर त्या अस्वलावर मात करणं त्यांना अगदी सहज शक्य आहे असा विचार कामिक करत होता. तरीही एक गोष्ट पक्की होती: जर का त्यांची त्या जनावराशी गाठ पडली तर त्यांच्या कुत्र्यांपैकी काही कुत्री आणि कदाचित धैर्यशाली सहकाऱ्यांपैकीदेखील काही जण त्या जनावराच्या प्रकोपाला बळी पडतील. कितीजण? कधी? केवळ काळच ते सांगू शकणार होता.

ते बेटावर शिकारीला सुरवात करणार होते. ते तिथे येऊन पोहोचले तेव्हा वादळानं सगळ्या खुणा एकजात पुसून टाकल्या होत्या. पण इथे अस्वलांची अनेक पिल्ले वाढत आहेत हे त्या शिकाऱ्यांना माहित होतं. ह्या ठिकाणी अनेक अस्वलं त्यांनी पाहिली होती किंवा त्यांची शिकारही केली होती. संध्याकाळ होत होती. ती रात्र तिथेच घालवायचा त्यांनी निर्णय घेतला. आपल्या वडिलांनी त्या अस्वलाच्या मागच्या पायावर जखम केली होती हे कामिकला आठवत होतं. त्याचं थोडं फार रक्त कदाचित त्यांना इथे दिसेलही आणि मग ते दिवस उजाडला की त्याच्या मागावर जाऊ शकतील. आता संध्याकाळ पडली होती. बाकीचं ते उद्या पाहायचं त्यांनी ठरवलं !

उरामिकचं मन शांत नव्हतं. कितीही प्रयत्न केले तरी शिकाऱ्यांचे विचार तिच्या मनात सारखे येतच होते. त्या अस्वलाशी गाठ पडली तर त्यांच्यावर काय संकटं कोसळतील याचा विचार सातत्याने तिच्या मनात येत होता. शेवटी ती तिच्या शेजारणीकडे - तूगाककडे गेली

‘एकटी राहिले तर माझं मन काही शांत राहात नाही. शिकारी परत येईस्तोवर मी तुझ्याबरोबर राहू का?’

‘ होऽऽऽ! जरूर! माझे धनी मोहिमेवर गेल्यापासून मलाही एकटंएकटंच वाटतं आहे. तू आलीयेस ह्याचा मला खूप आनंद वाटतोय.’

त्या संध्याकाळी, वस्तीतल्या सगळ्यात म्हाताऱ्या असलेल्या सूनाने

सगळ्यांना एकत्र बोलावले. त्याला त्यांना काहीतरी सांगायचं होतं.

'तुम्हाला मी कशासाठी बोलावलं आहे त्याची कल्पना असेलच' तो म्हणाला. 'आपल्या कुत्र्यांवर हल्ला करण्यासाठी अस्वल आपल्या वस्तीत आलं होतं. संकटाबद्दल बोलायला मला आवडत नाही आणि म्हणूनच तुम्हाला इथे बोलवायला मी इतका उशीर लावला. पण आता आपण त्याचा सामना केला पाहिजे. ती वेळ आता आली आहे. सुलुकच्या मते त्या अस्वलाला रॅबीज झाल्या होत्या. ते खरं आहे असं मी म्हणत नाही. ते खोटं आहे असंही मी म्हणत नाही. काही झालं तरी आपण काळजी घेतली पाहिजे. म्हणून आता माझ्या तुम्हाला अशा सूचना आहेत : कधीही रात्री एकटे बाहेर जाऊ नका. अगदी दिवसादेखील, वस्तीपासून दूर जाऊ नका. जर आपल्यावर हल्ला झाला तर आपण खांद्याला खांदा भिडवून त्याला तोंड दिलं पाहिजे. जर आपल्यापैकी कुणाच्याही नजरेला एखादं अस्वल पडलं तर त्यानं लगेच तसा संकेत दिला पाहिजे. जर आपल्यावर हल्ला झाला तर आपण एकजात सगळ्या आघाड्यांवर त्या अस्वलाबरोबर झुंज देऊ. आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे उगाच भेदरून जाऊ नका. झुंज द्यायची आपल्यावर पाळी येऊ नये नाही अशी माझी इच्छा असली तरी आपण त्यासाठी तयार असलं पाहिजे.'

कुत्र्यांच्या भुंकण्यानं शिकारी दचकून जागे झाले. काय घडतंय ते समजायच्या आतच इग्लू आपल्यावर कोसळताना त्यांना दिसले आणि एक भयानक गुर्रगुर्र आवाज त्यांच्या कानावर पडला. कामिकला काय घडतंय ते उमजलं. हे असं घडतं हे त्यानं खूपदा ऐकलं होतं. अशा घटना लाखो वेळा घडल्या होत्या: अस्वलाने त्यांच्यावर हल्ला चढवला होता.

आपल्या अंगावर पडलेल्या बर्फाच्या ठोकळ्यांतून बाहेर काढायला कामिकला खूपच कष्ट पडले. जेव्हा त्याला आपला भाला पकडायला आणि अस्वलाकडे वळायला जमलं, तेव्हा आपले वडिल हात उंचावून त्यांचा भाला उगारताना त्याला दिसले. पण अस्वल अधिक चपळ ठरलं आणि त्यानं त्या एकट्या माणसावर हल्ला चढवला. वडिलांना सावध करायला म्हणून कामिकने

आरोळी फोडली. पण त्याला खूप उशीर झाला होता. त्या अस्वलाने आपला ताकतवान जबडा सुलुकच्या कमरेभोवती बंद केला होता. आणखीनच जोराने आरोळ्या फोडत कामिक त्यांच्या दिशेने धावला. अस्वल आपलं डोकं सगळ्या दिशांनी हेलकावत होतं आणि सुलुक त्यांच्या जबड्याच्या घट्ट पकडीत बंदिस्त होता. मागेपुढे न पाहात, नेमही न धरता कामिकने आपला भाला फेकला. त्याचं हत्त्यार जनावराच्या शरीरात घुसलं आणि किंकाळ्या फोडत त्याने सुलुकचं निष्प्राण शरीर सोडून दिलं. कामिकवर ते हल्ला चढवणार न चढवणार तोच आणखी एक भाला त्याच्या कडेत घुसला. किसिकने त्या अस्वलावर आघात केला होता. बोजड अस्वलाचा सगळा भारच्या भार कामिकवर पडला. बाकीचे लोक धावत आले. त्यांनी त्या जनावराला चारही बाजूंनी बदडलं आणि त्याचा जीव त्याच्या वाहत्या जखमांतून निघून गेला. नंतर त्यांनी कामिकची सुटका केली, कामिक सुलुकच्या दिशेने धावायला लागला. सुलुक अजूनही बर्फावरच सताड, निपचित पसरलेले होते. कामिकच्या डोळ्यात आसू भरून आले, त्याने आपल्या वडिलांना आपल्या मांडीवर घेतले.

हलकेच सुलुकनी डोळे उघडले. त्यांचा श्वासोच्छ्वास फारच हलक्या रीतीने चालू होता.

'माझे दिवस भरले आता, कामिक. पण माझी तुला एक विनंती आहे. त्या अस्वलाला शोधून काढ. आज आयुष्यात मला पहिल्यांदा मला शांति मिळणार आहे असं मला वाटतंय्. मी अगदी शांत आहे. काळाच्या पार अंतापर्यंत, मृत लोकांना मिळणाऱ्या शांततेत, मी आता आराम करणार आहे. तुलाही कधीतरी ती मिळेलच. मी तुझी आणि आपल्या इतर प्रिय लोकांची वाट पाहीन.'

कामिकला काहीच समजत नव्हतं. तो त्याच्या वडिलांकडे पाहात राहिला. कोणत्या अस्वलासंबंधी ते बोलत होते? अचानक त्याला आठवलं की ज्या अस्वलाने त्यांच्या वस्तीवर हल्ला चढवला होता त्याच्या मागच्या पायाला जखम झाली होती. आणि आत्ताच्या या अस्वलाला ती जखम नव्हती. कामिकला आपल्या वडिलांच्या म्हणण्याचा उलगडा झाला: त्यांनी आत्ता मारलेलं हे अस्वल ते ज्या अस्वलाचा शोध करत होते ते नव्हते.

शिकार अजून संपली नव्हती.

दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांनी सुलुकना त्या बेटावरच पुरले आणि ज्या अस्वलाने त्यांना मारले होते त्याच पांढऱ्या अस्वलाच्या केसाळ कातडीनेच त्यांच्या थडग्यावर पांघरूण घातले.

'आज आपण सारा दिवसभर इथेच राहाणार आहोत. आपण उद्या इथून निघणार आहोत. जोपर्यंत आपल्या वस्तीवर हल्ला करणाऱ्या अस्वलाला आपण ठार मारत नाही तोपर्यंत आपण आपली शिकार पूर्ण थांबवायची नाही असं मनातल्या मनात मी सुलुकना वचन दिलंय्.'

त्या रात्री वारा आणि बर्फ आणखीनच जोरजोरात घोंघावत होते. दुसऱ्या दिवशी तिथून निघणे शिकाऱ्यांना शक्य झाले नाही, हिमवादळ संपेस्तोवर त्यांनी तिथे राहाणे भाग होते. अधूनमधून त्यांच्यापैकी एखादा मलमूत्रविसर्जनासाठी बाहेर जायचा. तो परत यायचा तेव्हा तो सारा बर्फाने माखलेला आणि थंडीनं कुडकुडत असायचा. दोन दिवस ते तिथून जाऊ शकले नाहीत. तिसऱ्या रात्री वारा शांत झाला. तेव्हा पुढच्या दिवशी पहाटे आपण आपल्या नशीबाची परीक्षा घेऊ शकू असं त्या शिकाऱ्यांच्या लक्षात आलं. पहाटेचा प्रकाश निघता निघताच आपण काय करायचं हे त्यांनी ठरवलं.

किसिकने स्पष्ट सांगितलं. 'आपण दिवसाचा निम्मा वेळच प्रवास करू या. दुसरा निम्मा वेळ आपण शिकार करू या. अशा रीतीने आपण आपल्या कुत्र्यांना फारसं थकवणार नाही आणि आपण आपल्यासाठी आणि त्यांच्यासाठी खाद्य शोधू शकू. इतकी कडक थंडी असताना भूक निर्दयपणे वागते हे तुम्हाला माहितच आहे.'

'आपला मासाचा साठा उद्या संपुष्टात येणार आहे,' कामिक म्हणाला. 'मग आपण काय खायचं? आणि आपली कुत्री काय खाणार?'

'त्याची चिंता सोड तू,' किसिकने त्याला उत्तर दिलं. 'तोपर्यंत आपल्याला काही सील मासे सापडतीलच. अजून दोन दिवस जरी आपल्याला ते सापडले नाहीत तरी आपल्याकडे आपल्याला आणि आपल्या गाड्यांना जुंपलेल्या कुत्र्यांना पुरतील एवढे मेलेले कुत्रे आहेत. कारण ह्या हिमवादळात

आपली बरीचशी जनावरं मारली गेली असतील याबद्दल शंकाच नाही.'

आपल्या कुत्र्यांची गणती करण्यासाठी ते शिकारी बाहेर आले. खरोखरच त्यांच्या कुत्र्यांपैकी दोघांना त्या थंडीवर मात करणं जमलं नव्हतं.

'पण...' कामिक म्हणाला, ' मी कुत्र्यांचं मास कधीच खाल्लं नाहीये.'

'मग आपलं मन घट्ट करायला शिकायला तुला सुरवात केलीच पाहिजे.' गंभीरपणे किसिकने त्याला टोलावलं. 'जिवंत राहायला खूपच बळकट इच्छाशक्ती लागते.'

'तू खाल्लंयस ते?' कामिकनं विचारलं.

'हो.'

'कसं लागतं?'

'थ्थू!'

'ही काही फारशी प्रोत्साहित करणारी प्रतिक्रिया नाहीये ...'

'माहिताये मला, कामिक आणि आपल्यावर ती पाळी येणार नाही अशी मला आशा वाटते. पण तसं करायला तुला तयार व्हायला लागेलही. चला! आपण निघायच्या तयारीला लागू या.'

त्या दिवशी त्यांनी फारसा रस्ता काटला नाही. भुसभुशीत बर्फामुळे कुत्र्यांना हवं तसं वेगानं जाता येत नव्हतं. तरीही दमछाकीवर मात करीत ते पुढे चालतच राहिले. दुपार झाली तशी शिकाऱ्यांनी वाऱ्यापासून आपला बचाव करण्यासाठी हिमाच्या एका मोठ्या शिखराच्या आडोशाला तळ ठोकला. त्यांनी एक इग्लू उभारलं आणि बर्फ खडबडीत असलेल्या भागात ते शिकार करायला गेले. त्यांना तीन आलू सापडले. आलू म्हणजे बर्फाने झाकल्या गेलेल्या पृष्ठभागावर पडलेली खबदाडं असतात ज्यातून श्वासोच्छ्वास करण्यासाठी सील मासे पाण्याच्या पृष्ठभागावर येतात. प्रत्येक आलूवर नजर ठेवायला एक माणूस बसला. शिकाऱ्यांनी खूप वेळ वाट पाहिली पण त्यांना

काही यश लाभले नाही. त्यांच्या सहनशक्तीवर बर्फाळ वाऱ्याने मात केली: स्वत:ला उबदार ठेवायला म्हणून ते इकडेतिकडे लांबच लांब चालत राहायचे. जेव्हा सूर्य अस्ताला गेला तेव्हा त्यांनी त्या तिनांपैकी दोन आलू नष्ट केली आणि तिसऱ्यावर आलटून पालटून नजर ठेवून राहिले. राखण करायची पहिली पाळी किसिकची होती, पण त्याला पायांना इतकं गार वाटायला लागलं की तो फार काळ टिकू शकला नाही. त्याच्या जागी नूलाक आला आणि त्याने मोठ्या धैर्यानं बर्फाळ वाऱ्याशी झुंज दिली. आपले पाय हलवावेत असं त्याला वाटायचं पण एका जागी तटस्थ राहाण्यासाठी तो आपलं मन मारत राहिला. शेवटी त्याला भ्रम झाल्यासारखं वाटायला लागलं.

'चल निघ तिथून, नालायक प्राण्या! तू जर बाहेर आला नाहीस, तर मी तुझा जीव घेईन.' नूलाक स्वत:शीच पुटपुटत होता.

त्याला वेड लागायची पाळी आली होती. त्यानं आपला भाल्याचे दोन तुकडे केले आणि तो मोठमोठ्यानं ओरडायला लागला. मग त्याने जमिनीवर लोळण घेतली आणि बर्फावर डोकं आपटायला सुरवात केली. तो रडायला लागला. काय घडतंय ते कामिकच्या ताबडतोब लक्षात आलं. तो नूलाकच्या दिशेनं धावला, पण अचानक, त्याचं काळीज धडधडायला लागलं. नूलाक संथपणे उठला, त्यानं आपला दोन भागात मोडलेला भाला उचलला आणि त्या भाल्याचं तीक्ष्ण टोक त्यानं आपल्या गळ्याच्या दिशेनं पुढे केलं. तो आत्महत्त्या करत होता. चटदिशी उडी मारून कामिक त्याच्याजवळ गेला.त्याने नूलाकच्या हातातून भाला हिसकावून घ्यायचा प्रयत्न केला, पण नूलाक त्याच्यापेक्षा ताकतवान होता, वयानं मोठा होता आणि त्यानं कामिकला जमिनीवर पाडलं. पडल्यापडल्याच कामिकला नूलाक उभा राहून, स्वत:ला भाल्यानं ठार मारताना दिसत होता. ज्याक्षणी नूलाकनं आपलं शस्त्र उगारलं, कामिक स्वत:भोवती चटदिशी फिरला आणि तो भाला जमिनीत, कामिकपासून काही बोटभरच अंतरावर रूतला. चटदिशी उडी मारून कामिक ऊठून उभा राहिला आणि सारी शक्ती एकवटून त्यानं नूलाकला एक जोरदार ठोसा मारला. नूलाक जमिनीवर तडपडत पडला. इतर शिकारी धावत धावत आले. त्यांनी नूलाक आणि कामिकना एकदुसऱ्यांपासून अलग केलं आणि

नूलाकची समजावणी घातली.

'एकमेकांचा जीव घेऊन आपण आपल्यावरच्या संकटांवर मात करू शकणार नाही.' कठोर आवाजात किसिक म्हणाला. 'जिवंत राहायचं असेल आणि त्या अस्वलावर मात करायची असेल तर स्वच्छ आणि दमदार पद्धतीनं आपण विचार केला पाहिजे. आता यापुढे विध्वंस होता कामा नये, नूलाक. सहन होईल त्याहून अधिक विध्वंस आपण अनुभवला आहे आणि आपल्यासमोरचे प्रश्न संपले आहेत असं म्हणता येणार नाही. आपण विध्वंसाशी झुंज दिली पाहिजे, विध्वंस पसरवणं टाळलं पाहिजे. आपण आपलं डोकं शांत ठेवलं पाहिजे, नूलाक! विसरू नकोस.'

एकही शब्द न बोलता नूलाक तिथून निघून गेला. शरमेनं त्याचं मन भरून आलं होतं. सील माशाची वाट पाहाण्यासाठी कामिक त्या आलूजवळ बैठक मारून बसला.

संध्याकाळ पडली होती. थंडीनं कामिक अगदी दगडासारखा झाला होता आणि आपण अगदी लहान, क्षुल्लक आहोत, या अंधाराच्या जगात आपलं अस्तित्व गमावून बसलो आहोत असं त्याला वाटत होतं. त्याला रडावंसं वाटत होतं. काही मोजक्या दिवसांतच इतक्या काही गोष्टी घडल्या होत्या: ते चेकाळलेलं अस्वल, त्याच्या वडिलांचा मृत्यू, नूलाकबरोबरचं त्याचं हे भांडण... तो नुलाकला दोष देत नव्हता. ते सारे ज्या परिस्थितीत होते त्यात कोणालाही कोणत्याही क्षणी वेड लागणं शक्य होतं. पण छे! तसं परत होता कामा नये ! या मुलखात जिवंत राहाण्यासाठी कमालीचं धैर्यशील असावं लागतं. कामिकच्या मनात त्याच्या आईचा विचार आला आणि त्याच्या गालांवर आसवांची धार गळली. अचानक फुटणाऱ्या बुडबुड्यांच्या आवाजाने त्याला परत जमिनीवर परत आणलं.

सील मासा !

आलूत एक सील मासा आला होता. पार छाती फुटेस्तोवर आपल्या हृदयाची धडधड होते आहे असं कामिकला वाटलं. तो मासा पाण्याच्या पृष्ठभागापर्यंत येणार का? श्वासोच्छ्वास घ्यायलाही कामिकला धीर होईना.

प्रचंड दीर्घ काळानंतर, एक हलकासा आवाज आलूपासून आपल्यापर्यंत आला आहे असं त्याला वाटलं. धीर धर थोडा! कामिकनं स्वत:लाच बजावलं. एकदम वेगानं मारायला पाहू धावू नकोस! नीट धीरानं वाग! कामिकनं आपल्या भाल्याचं टोक आलूच्या भगदाडाकडे वळवलं आणि तो वाट पाहायला लागला. सरतेशेवटी त्याला सीलच्या दमदार श्वासोच्छ्वासाचा आवाज ऐकायला आला. त्या प्राण्याला कसलाही संशय म्हणून वाटत नव्हता. सारी शक्ती एकवटून कामिकने घाव घातला.

त्याचा नेम बरोबर बसला होता. चटदिशी त्याने गारठलेल्या पाण्यात हात घालून सील माशाला पकडण्यासाठी चाचपडायला सुरवात केली. तो सील मासा मरेलच इतक्या जोरानं त्यानं मारलं होतं का? त्यानं नीट नेम धरला होता का? अचानक, त्याच्या बोटांना त्या प्राण्याचा स्पर्श जाणवला. तो मेला होता. इतर शिकाऱ्यांना साद देण्यासाठी कामिकने आरोळी फोडली. ते धावत आले आणि सील माशाला पाण्यातून बाहेर खेचून काढण्यासाठी त्यांनी आलूच्या भोवतालचं बर्फ फोडलं. आनंदाच्या किंकाळ्या फोडत ते जागच्या जागीच थयथयाट करायला लागले, नाचायला लागले. काही क्षणभर ते आपली सारी दु:खं विसरले.

'सकाळी कुत्र्याचं मास खायला लागणार नाही! दुपारी कुत्र्याचं मास खायला लागणार नाही! रात्री कुत्र्याचं मास खायला लागणार नाही.' नाचता नाचता कामिक म्हणाला.

त्या रात्री त्या शिकाऱ्यांना चांगलंचुंगलं खायला मिळालं, पण त्यांनी गरजेपेक्षा काही जास्त खाल्लं नाही. आपल्या शिकारीच्या कष्टांचं फळ त्यांना राखून ठेवायचं होतं. नंतर, रात्रीसाठी आडवा होत, कामिक त्या अस्वलाबद्दल विचार करायला लागला. कुठे हल्ला करेल ते? कोण असेल त्याचा पुढचा बळी? उत्तरेकडचे लोक, इन्विट कधी शांतपणे जीवन व्यतीत करू शकतील?

दुसऱ्या दिवशी सकाळी खूप लवकर, शिकाऱ्यांनी परत रस्ता पकडला. सूर्य उजाडायच्या अगोदरच कधीच त्यांनी आपली वाट पकडली होती. सारा दिवसभर, ते पुढेपुढे जातच राहिले पण त्यांना त्या प्राण्याचा कुठेही मागोवा लागला नाही. संध्याकाळी त्यांनी तळ टाकला. ते पार थकून गेले होते. त्या

अस्वलाने त्यांना आणखी एकदा चकवलं होतं.

'आज रात्री आपण कुत्र्यांना बांधू या नको'. किसिक म्हणाला. 'त्यामुळे जर का त्या अस्वलानं हल्ला केलाच तर निसटून जायची त्यांना फार चांगली संधी मिळेल.'

हा निर्णय अतिशय मोठी घोडचूक ठरणार होती. अगदी जीवावर बेतणारी चूक!

दुसऱ्या दिवशी पहाटे सारे शिकारी एकानंतर एक सावकाश उठले. त्यांनी थोडं थोडं मास खाल्लं. ते कुत्र्याचं मास नव्हतं याबद्दल कामिकला आनंद झाला.

'प्रवास करायला अतिशय चांगला दिवस आहे.' आपल्या इग्लूतून बाहेर येत नाउलाकनं मोठ्यानं म्हटलं.

अचानक तो घाईघाईने परत आला.

'कुत्रे नाहिसे झालेत', तो मोठ्यानं किंचाळला.

'काय?' कामिकनं विचारलं.

'कुत्रे दिसत नाहीयेत.' नाउलाकनं पुन्हा म्हटलं.

सगळेजण इग्लूतून घाईघाईनं बाहेर आले. खरोखरच कुत्रे दिसत नव्हते.

शिकाऱ्यांना जमिनीवर पावलांच्या खुणा आढळल्या आणि ते त्यांच्या मागोमाग गेले. अचानक ते थबकले. अस्वलाच्या पावलाच्या खुणा! अगदी ताज्या ताज्या! मग काय झालं होतं ते त्यांच्या लक्षात आलं. रात्री अस्वल त्यांच्या छावणीपर्यंत आलं होतं. बांधून ठेवलेलं नसल्यानं कुत्री त्याच्या मागोमाग गेली होती.

हेच काय ते व्हायचं राहिलं होतं. किसिकनं कडवटपणे म्हटलं.

'तुला वाटतं की ती परत येतील?'

'कदाचित! पण कधी? एक दिवसानं, दोन दिवसांनी, कदाचित एका

आठवड्यानं !'

'आपण काय करायचं?'

'वाट पाहायची. कुत्री जर उद्या किंवा परवा परत आली नाहीत, तर आपण पायी पायी घरी परत जायचं.'

'पायी? ते कसं शक्य आहे? आपण वस्तीपासून कितीतरी दिवस अंतरावर आहोत.'

'माहिताय मला. पण आपल्यासमोर दुसरा काही मार्ग आहे का? आपण इथे फार काळ कुत्र्यांची वाट पाहात राहू शकत नाही. आपण जितकं लवकर निघून जाऊ, तितकं चांगलं ठरेल. आपण एक दिवस वाट पाहू. जर तेवढ्यात कुत्री परत आली नाहीत, तर आपण चालायला लागू.'

'कुत्री नसतील तर अस्वलांना तोंड द्यायला आपल्याकडे काहीच साधन नाही.' कामिक खिन्नपणे म्हणाला.

'आपण आठ जण शिकारी आहोत आणि आपल्याकडे भाले आहेत.' किसिकनं ताडकन म्हटलं. 'कधीही हताश व्हायची गरज नसते.'

'आपण सात आणि एक अर्धा एवढे शिकारी आहोत.' कामिक म्हणाला. 'मी अजून काही खराखुरा शिकारी बनलेलो नाही.'

'उगाच काही तरी बरळू नकोस. एका अस्वलाला मारलं असेल तो खरा शिकारीच असतो.'

ज्या रात्री आपले वडिल वारले होते त्यावेळी अस्वलाला पहिल्यांदा मारणारे आपण होतो हे कामिकला आठवलं. शिकाऱ्यांच्या कायद्यानुसार त्या अस्वलाची शिकार त्याच्या नावे होती.

त्यांनी त्यानंतरच्या पहाटेपर्यंत वाट पाहिली. पण कुत्री परत आली नाहीत. जमेल तेवढी सामग्री वाहून घेत, त्यांनी परतीचा रस्ता पकडला. घोळक्याच्या सुरवातीला किसिक चालत होता. कामिक त्याच्याजवळ आला.

'घरी पोहोचायला आपल्याला किती वेळ लागेल?'

'दहा-एक दिवस, कदाचित जास्तच. कदाचित कमी! आपलं नशीब जोरावर असेल तर...'

'आणि जर आपलं नशीब जोरावर नसेल तर?'

'तर आपण कदाचित आपल्या वस्तीला पोहोचणारही नाही.'

'तुला काय वाटतं? आपल्या नशीबात हे असं लिहिलंय?'

'मला नाही माहित. आपण आपल्या घरापासून दूर आहोत आणि आपल्यासमोरची संकटं असंख्य आहेत.'

'आपण जर आपल्या घरी परतलो नाही तर आपल्या कुटुंबांच काय होईल?'

'त्यांना दुसरीकडे जाऊन राहावं लागेल.'

'आपल्या ते नजरेला पडतील असं तुला वाटतं?'

'हो. जर आपण योग्य मार्गावर असू आणि वाटेत जर आपल्याला अन्न मिळवता आलं तर ...'

हातातल्या भाल्याच्या आणि आपल्या धैर्याच्या बळावर शिकाऱ्यांनी मार्गक्रमण चालूच ठेवलं.

उरामिक पार शिणली होती. शिकारी गेल्यापासून तिला चांगली झोप लागली नव्हती. ती आणि तुगाक एकत्र काम करायच्या आणि राहायच्या.

'तू बनवलेले हे बूट किती छान आहेत, उरामिक !'

'तुला आवडले?'

'शिकारी लोकं लवकरच परत येऊ दे बाबा! आपल्याकडे खाद्याचा फारसा मोठा साठा नाहीये. मित्तिक आणि इसांनी आज सील मासे आणलं तर किती छान होईल !

त्या रात्री मित्तिक आणि इसांनी तीन सील मासे मारून आणले. सगळे गावकरी मित्तिकच्या घरी जमले आणि त्यांनी मेजवानी झोडली.

थकले असले तरीही शिकारी चालतच होते. बर्फाळ थंड वारा वाहात होता खरं पण त्यांच्या अंगातून घामाच्या धारा लागल्या होत्या. कामिक सगळ्यात शेवटी होता. बर्फानं आपला चेहरा पुसायला म्हणून तो काही क्षण थांबला. 'आवडत असेल तर' निदान इथे बर्फाची तरी ददात नाही, त्याच्या मनात विचार आला. ते आणखीन कितीतरी वेळ अथक चालतच राहिले. शेवटी त्यांना थांबणं भागच पडलं: त्यांचे स्नायू जणू भीक मागत होते. धापा टाकत, जडावल्याप्रमाणे ते जमिनीवर कोसळले आणि किती तरी वेळ निश्चल पडून राहिले.

'आपल्याला अजून किती रस्ता काटून जायचंय?' कामिकने शेवटी विचारलं.

'जवळजवळ १५० किलोमीटर' किसिकने उत्तर दिलं.

'पायी १५० किलोमीटर म्हणजे जवळजवळ एकहजार किलोमीटर होतात.'

'लवकरच मित्तिक आणि इसा आपल्याला शोधायला निघतील अशी मला आशा आहे,' नाउलाक म्हणाला.

'मला नाही वाटत.' किसिक म्हणाला. 'आपण इतक्या लवकर परत येऊ असं त्यांना वाटत नाहीये आणि आपण परतलो नाही तर त्यांना आश्चर्य वाटणार नाही. इतकंच नाही तर त्यांना वस्तीकडेही लक्ष द्यायचं आहे.'

त्या शिकाऱ्यांनी थोडंसं मास खाल्लं आणि परत चालायला सुरवात केली.

त्यांना जाऊन कितीतरी काळ लोटलाय्! उरामिकला ते जाणवत होतं:

त्यांच्यावर नक्कीच काहीतरी संकट कोसळलं असणार. सगळ्यांना बोलवायला सांगायला ती सूनाकडे गेली. वस्तीतील सगळे लोक त्याच्या घरी गोळा झाले.

'आपल्या शिकाऱ्यांवर काहीतरी संकट ओढवलं आहे असं मला वाटतंय्' उरामिक म्हणाली. 'आणि मला एकटीलाच तसं वाटत नाहीये. त्यांना जाऊन इतका काळ लोटला! आणखी काही अलतंभलतंच घडणार आहे असं सांगायला कुणालाच आवडत नाही, पण हा मुलुख इतका खडतर आहे आणि इथं काय वाटेल ते होऊ शकतं. बसल्याबसल्या नुसती तणतण केल्यानं आपल्या शिकाऱ्यांना मदत मिळणार नाही. काही तरी हातपाय हलवले पाहिजेत.'

'आपण काय करू शकतो?' सूनानं विचारलं.

'इसा आणि मित्तिक शिकाऱ्यांच्या शोधाला बाहेर पडतील,' उरामिक म्हणाली. 'किंवा ते किकिताजोआकवाल्यांकडे मदत मागतील.'

'किकिताजोआक आणि आपल्या वस्तीच्या दरम्यानच्या प्रवाहातलं बर्फ घट्ट नाहीये, तरंगतं आहे. हिवाळ्यांत तो प्रवाह कधीच पूर्णपणे बर्फानं भरून जात नाही आणि कुणीही जर तो पार करून जायचा प्रयत्न केला तर तो बर्फाबरोबर पार समुद्रापर्यंत वाहावत जाण्याचा धोका आहे.'

'मला माहिताय ते, पण मी जेव्हा लहान होते तेव्हा आम्ही तो पार करून जायचो. म्हणजे ते अशक्य नाही.'

'आपल्या शिकाऱ्यांवर काही संकट ओढवलं आहे ह्याची काही आपल्याला पुरेपूर खात्री नाही. कदाचित ते संकटात नसतीलही,' सूना म्हणाला.

'शिकाऱ्यांवर प्रत्येक दिवशी काही ना काही तरी संकट येतच असतं, मग ते कुठेही जावोत हे समजण्याएवढा तू म्हातारा आहेस.' उरामिकनं टोला मारला. 'कधीही काय वाटेल ते घडू शकतं. किकिताजोआकच्या लोकांची मदत मागण्यासाठी आपण मित्तिक आणि इसांना पाठवायला पाहिजे असं मला नक्की वाटतं. ते इथून तीन दिवसांच्या अंतरावरच तर आहेत. त्यांच्या

पाठबळामुळे, इसा आणि मित्तिकना आपले शिकारी शोधण्याचं आणि आपल्यासाठी काही आणखी प्राणी मारण्याची संधी मिळेल. इसा आणि मित्तिक, तुम्हाला नाही वाटत?'

त्यांच्यापैकी एकानंही तोंड उघडलं नाही.

'ठीक आहे! तसंच असेल तर मीच जाईन. मी तुमचे कुत्रे घेईन आणि स्वत: किकिताजोआकला जाईन. माझ्याबरोबर कुणी यायला तयार आहे का?'

'मी !' तूगाक म्हणाली.

'नाही,' मित्तिकनं ताडकन म्हटलं. 'दोन बायका प्रवाह कसा पार करतील? शिवाय काही म्हटलं तरी मी तुम्हाला माझे कुत्रे देणार नाही.'

'म्हणजे आपण काहीच करायचं नाही?' हुंदके देत उरामिक म्हणाली. 'पण लक्षात ठेव, जर आपल्या शिकाऱ्यांचं जर काही बरं वाईट झालं तर त्याची सारी जबाबदारी तुझ्यावर राहिल आणि पार जगाच्या शेवटच्या दिवसापर्यंत तुला त्याची खंत वाटत राहिल.'

'ठीक आहे. घे माझे कुत्रे.' कोरड्या आवाजात मित्तिक म्हणाला. 'पण एक लक्षात ठेव की तुम्हाला तुमच्या प्रयत्नात अपयश आलं तर त्याला तुमच्या नवऱ्यांसमोर मी जबाबदार राहाणार नाही.'

'पण आम्ही आमच्या प्रयत्नात अपयशी ठरू असंच तुला का वाटतंय्? आम्हाला यश मिळणारच आहे, नाही का तूगाक?'

'खरंच तुला असं वाटतं? हो, तू खरं बोलतेयस असं वाटतंय मला. आम्हाला यशच मिळणारे!'

'पहाट फुटली रे फुटली की आपण निघू या.'

'मी तयारच असेन.'

त्या दोन बायका निघाल्या. अवाक होऊन बाकीचे लोक एक शब्दही

न बोलता त्यांच्याकडे पाहात राहिले.

काही हालचाल न करता ते निपचित पडून होते. त्यांच्या श्वासोच्छ्वासाचा होणारा सूं-सू आवाजच काय तो ते जिवंत आहेत याची साक्ष देत होता. बर्फात तोंड घुसवून, ते स्तब्ध पडलेले होते, त्यांच्या स्नायूंनी हालचाल करायला नकार दिला होता. गारठवणाऱ्या बर्फाची फिकीर न करता, पडल्या जागीच कामिक झोपी गेला होता. मग ठणठणणाऱ्या स्नायूंच्या वेदनांनी त्याला जाग आली. तो लोळून पाठीवर झाला आणि त्याची नजर ताऱ्यांवर पडली. कशापासून बनतात तारे? ते इतक्या उंचावर पोहोचतात तरी कसे? आसपासचं सारं जग काळंभोर असताना ते रात्रभर कशासाठी चमचमत राहातात? अचानक कामिकच्या नजरेसमोर विविध रंगांचे किरण विखुरणारी उत्तर ध्रुवावरची ती पहाट पसरली. किती सुंदर होती ती! हे सारं जग इतकं सुंदर आणि तरीही इतकं क्रूर कसं असू शकतं?

'ऊठ,ऊठ, तुगाक ! दिवस अगदी वर आला देखील.'

कपडे घालून,निघायला तयार होऊन उरामिक तुगाकला आपली सारी शक्ती एकवटून हालवत होती.

'मित्तिककडे जाऊन त्याला मी कुत्र्यांना तयार करायला सांगते,' ती पुढे म्हणाली.

उरामिक बाहेर गेली. दिवस उजाडायचा होता. गार पण शांत वारा वाहात होता. उरामिक मित्तिकच्या इग्लूच्या दिशेनं वळली. पण त्याचे कुत्रे कुठे गेले? मित्तिकनं तिला खोटंच सांगितलं की काय? ती त्याच्या इग्लूपर्यंत धावत गेली आणि त्यात घुसली. सूना तिची वाटच पाहात होता.

'कुत्रे कुठे गेले? आणि मित्तिक?' तिनं विचारलं.

'मित्तिक आणि इसा किकिताजोआकला गेलेत.'

'पण... कशासाठी?'

'त्यांना शरम वाटली असेल माझ्या मते...'

'काल संध्याकाळी मी इतक्या कठोरपणे बोलले याचं मला वाईट वाटतंय्. मला माफ करशील अशी अपेक्षा आहे माझी.'

'तुला कधीच माफी केलीय. तू खूपच धीराची आहेस, उरामिक.'

उरामिक तुगाकच्या घरी परतली. तुगाक अजूनही झोपलीच होती. मित्तिक आणि इसा किकिताजोआकला सुखरूप पोहाचावेत अशी आस धरून बसण्यापलिकडे आणखी करायला दुसरं होतं तरी काय? काहीच नाही.

मित्तिक आणि इसा चांगल्याच वेगाने वाट काटत होते. धावायला मिळतंय म्हणून त्यांचे कुत्रेदेखील अपेक्षेपेक्षा जास्त वेगाने जात होते. निदान आजतरी रस्ता काटणं सोपं होतं... पण उद्या? नाला पार करून जाणं कदाचित धोकादायक ठरणार होतं. वाहवत इसा आणि मित्तिक पार समुद्रापर्यंत जाण्याची भीति होती. पण त्यांच्यासमोर दुसरा मार्गतरी काय होता? काही असो, संकट समोर उभं ठाकलं की त्याला ते धीरानं तोंड देणार होते.

ते धिप्पाड जनावर रमतगमत, कोणतंही ध्येय न बाळगता, सावकाश चाललं आहे. त्याचं मागचं पाऊल दुखतंय, पण कशामुळे ते त्याला उमजत नाहीये. त्याच्या डोक्यात विचार फक्त खाण्याचाच चालला आहे. खायला काहीतरी शोधून काढलं पाहिजे. त्याला नीट दिसत नाहीये आणि त्याचं डोकं दुखतंय्. आपल्या समोर काहीतरी आहे असं त्याला जाणवतं-काहीतरी भक्ष्यच असणार ते! आसपासचं दृश्य नीट दिसावं म्हणून ते अस्वल बर्फाच्या एका शिखरावर चढतं. समोर, पलिकडच्या दिशेला काहीतरी पांढरंपांढरं दिसल्यानं ते परत खाली येतं आणि त्याच्या दिशेनं जायला लागतं. ते पांढरंपांढरं म्हणजे दुसरं एक पांढरं अस्वल असतं आणि ते काहीतरी खात असतं. ते जे काही

खात आहे ते पहिल्या अस्वलाला हवं आहे. ते धावायचा प्रयत्न करतं, पण त्याचा मागचा पंजा त्याला विलक्षण वेदना देतंय्. दुसऱ्या अस्वलाच्या दिशेनं ते गुरगुरतं, ते त्याला घाबरवण्याच्या उद्देशानं असेल किंवा त्याला झुंजायला बोलावण्यासाठीं आहे म्हणून असेल! दुसऱ्या अस्वलाजवळचा अन्नाचा साठा भला नगण्य असो, पण त्याच्या संरक्षणासाठी ते मागे वळतं. दोन्ही अस्वलं एकमेकांवर झडप घालतात.

ती दोन्ही अस्वलं एकमेकांना चावतात, एकमेकांना ओरबडतात. त्यांची टोकदार नखं आणि बळकट दात एकमेकांच्या शरीरात घुसतात. ती दोघेही जमिनीवर कोसळतात, आणि त्यांच्या गरम रक्तानं बर्फ लाल होतं. ढगांच्या गडगडाटाप्रमाणे गंभीर त्यांच्या गुरगुरण्यानं हवा थरारते. ती एकमेकांना वारंवार चावे घेतात आणि प्रत्येकाच्या जीभेवर दुसऱ्याच्या रक्ताची चव जाणवते. आता त्यांच्यापैकी एकानं आपली हार मानून तिथून पळ तरी काढला पाहिजे किंवा मेलं तरी पाहिजे. ती जमिनीवर लोळण घेतात, एकमेकांना चावे घेतात, एकमेकांना ओरबडतात. संपलं आता. विजयी झाल्याची गर्जना करत त्यांच्यापैकी एकजण दुसऱ्याच्या अंगावर उभा राहातो, आणि दुसरा मेलेला निस्तब्ध पडून असतो.

ज्याच्यासाठी इतका जीव टाकला ते सील माशाचं मांस आता त्या विजयी अस्वलाच्या हाती लागलं आहे. तो सील मासा ते गिळंकृत करतं. मग ते आपल्याला झालेली जखम चाटतं. त्याचा पंजा अजूनही त्याला सतावतोच आहे. त्यानं आता आराम करणं आवश्यक आहे. मग ते खूप खूप वेळानं जागं होतं. त्याला अजून वेदना होतच आहेत. त्याला अजून भूक लागली आहे. पण आता त्याच्याकडे काहीच मास शिल्लक नाही आणि त्यानं शिकार करायला लागणं आवश्यक आहे. खूप कष्टपूर्वक ते उठतं आणि आपण कुठे जातो आहोत याचा विचार न करता परत चालायला लागतं. मागच्या पायाचा पंजा त्याला कमालीचा त्रास देतोय पण त्याच्यापुढे दुसरा मार्ग नाही: त्याला काहीतरी खायला पाहिजेय. आता अंधार पडायला लागलाय आणि तरीही त्याला अजून काहीच मिळालेलं नाही. ते दमलंय्, त्याला भूक लागलीय्. त्यानं आराम करणं आवश्यक आहे. ते इथं झोपतं. कुणीही हल्ला करेल अशी

भीति न बाळगता ते इथे झोपू शकेल. या मुलखात ते जनावरांचा राजा आहे. जेव्हा ते डोळे उघडतं तेव्हा अंधार गेलाय, त्याच्या शारीरिक वेदना संपल्या आहेत,पण त्याला अजूनही भूक लागली आहे. आज त्यानं काहीतरी खाल्लंच पाहिजे. मोठ्या कष्टानं ते उठतं आणि दिशाहीनरित्या संथपणे चालायला लागतं. आणि मग त्याला आपल्यासमोर काही तरी हलताना दिसतं: काही छोट्या छोट्या आकृती त्याच्यासमोर इकडे तिकडे होत आहेत. त्या त्याच्या दिशेने पुढे पुढे येताहेत. ते त्यांची वाट पाहातं. आता त्याला त्यांची अधिक चांगली ओळख पटते: शिकारी पायी पायी जात आहेत. जर त्यांच्याजवळ कुत्री नसतील तर शिकाऱ्यांना सहज भक्ष्य करता येतं. ते त्यांची वाट पाहात राहाणार आहे आणि अनपेक्षित रित्या त्यांच्यावर हल्ला करणार आहे.

आपल्यावर रोखलेल्या मृत्यूच्या नजरेबद्दल संपूर्णपणे अज्ञानी शिकारी आपला मार्ग काटत होते. हातात भाला धरून ते किलोमीटरच्या किलोमीटर, आराम करण्यासाठी न थांबता, एकसारखे चालतच होते. सरतेशेवटी, हात पाय थकल्यानं पार शिणून जाऊन ते जमिनीवर लोळण घेतात.

'तुला काय वाटतं आपण या संकटातून बाहेर पडू असं?' कामिकनं म्हाताऱ्या सूनाच्या नातवाला विचारलं.

'जिवंत असेपर्यंत कोणत्याही संकटातून बाहेर पडायची आपल्याला नक्कीच संधी असते,' सूनाच्या नातवानं उत्तर दिलं. 'इतकंच काय आपल्याला एक नाही दोन संधी असतात- आपण पायी घरी परतू शकतो किंवा आपल्याला शोधायला निघालेल्या इतरांना भेटू शकतो ...अर्थात जर ते आपल्याला शोधायला बाहेर निघाले असतील तरचः..'

जवळच ते प्रचंड जनावर लपून बसलं आहे . हल्ला करण्यासाठी ते योग्य संधीची वाट पाहात आहे. ती संधी येणार आहे याबद्दल शंकाच नाही. फक्त वाट पाहिली पाहिजे, धीर धरला पाहिजे. सगळ्यानी एकत्र प्रयत्न केला तर ते आठजण त्याला ठार मारू शकतील. काळजी घेतली पाहिजे. त्या अस्वलाला

जगायचं आहे, आणि आठ शिकारी त्याच्यासाठी कितीतरी दिवस मासाचा पुरवठा बनू शकतील. अनपेक्षित रित्या केलेला हल्ला हेच त्याचं सर्वात हुकुमी हत्त्यार शाबीत होऊ शकेल. ते कमालीचे हतबल असतानाच त्यांच्यावर हल्ला केला पाहिजे. काहीही चूक करता कामा नये. अजून काही किलोमीटर त्यांनी चालायला हवंय् आणि ते त्याच्या आवाक्यात येऊन पोहोचतील. मग तो त्यांना मारू शकेल.

किलोमीटरनंतर किलोमीटर हळूहळू मागेमागे पडत होते. थकून गेलेल्या शिकाऱ्यांच्या रांगेच्या शेवटी कामिक चालला होता. अचानक तो बर्फाच्या एका तुकड्याला अडखळला आणि पार आडवा पडला आणि त्याचा चेहरा जमिनीवर आपटला. आपला दम परत सांभाळत तो तसाच काही मिनिटं जमिनीवर पसरलेला राहिला. त्याची छाती जणू पार फुटणारच होती. शेवटी एकदाचा दीर्घ श्वास घेऊन त्यानं बर्फाळ थंड हवा छातीत भरली आणि आपल्या जीवात जीव आलासं त्याला वाटलं. तो सावकाश उठून उभा राहिला. इतर लोक कधीच क्षितिजावरून दिसेनासे झाले होते. त्याला कसलीही घाईगर्दी नव्हती. अचानक, एक भयानक गर्जना त्याच्या कानावर पडली आणि तो जागच्या जागी खिळला: अस्वल त्याच्या नजरेला पडलं.

कामिक झपाट्यानं एका बर्फाच्या ढिगावर चढला. भीतिनं त्याची विचारशक्तीच पार काम करेनाशी झाली होती आणि त्याने अस्वलाला शिकाऱ्यांवर हल्ला चढवताना पाहिलं. जनावराचा हल्ला अनपेक्षित असल्याने ते शिकारी झुंज देण्याच्या तयारीत नव्हते. त्यांच्या दिशेने अतिशय वेगाने धावत जाताना त्या अस्वलाला कामिकने पाहिलं. शिकाऱ्यांनी वेगानं, अतिशय वेगानं आपापले भाले त्या अस्वलाच्या दिशेने फेकले. त्यांनी नेम धरण्यात वेळ घालवला नाही आणि ही चूक त्यांच्या दृष्टीनं अतिशय महाग ठरणार होती. केवळ एक भालाच काय तो अस्वलाच्या खांद्यापर्यंत येऊन पोहोचला पण त्यानं ते अस्वल मेलं नाही. अस्वलानं आपल्या एका पंजानं सूनाच्या नातवाला उचलताना कामिकनं पाहिलं. सूनाच्या नातवानं एक मोठी किंकाळी फोडली आणि तो धाडकन जमिनीवर पडला. एव्हाना अस्वल इतरांवर हल्ला करण्यात गर्क होतं, ते त्यांना चावत होतं, ओरबाडून ते त्यांच्या देहाची लक्तरं

करीत होतं. त्याने तीन शिकाऱ्यांना ठारही मारलं.

इतर शिकाऱ्यांनी बर्फात वापरायचे आपापले चाकू बाहेर काढले. इतक्या धिप्पाड जनावरासमोर ते हत्त्यार अगदीच किरकोळ होतं. कामिकलाही त्याची जाणीव होती, आणि शिकाऱ्यांसमोर इतर कोणताही मार्ग नव्हता. त्यांच्याकडे जावं, त्यांच्या खांद्याला खांदा भिडवून झुंज द्यावी असं त्याला वाटत होतं. पण त्याचा उपयोग काय? निम्मे शिकारी मारले गेल्यानं त्यानं तसं करणं आत्मघातकीच ठरलं असतं. अजूनही जिवंत असलेल्या इतर शिकाऱ्यांवर हल्ला करायच्या पवित्र्यात अस्वल होतं. आपण त्याच्याशी झुंजू शकणार नाही हे कामिकला माहित होतं. अचानक त्याच्या वडिलांचे शब्द त्याच्या स्मृतीत जागे झाले: काय वाटेल ते करून त्या अस्वलाला ठार मारायचं होतं. काय वाटेल ते करून! बर्फाच्या ज्या ढिगाऱ्यामागून कामिक वेगानं पुढे सरसावला आणि थेट अस्वलावर जाऊन थडकला. बळकट जबड्यात धरलेलं प्राणहीन माणसाचं प्रेत सोडून देऊन अस्वल मागे वळलं. झुंज करून ते थकलं होतं, जडावल्या देहानं ते कामिकच्या दिशेनं पुढे झालं. तरूण कामिक, हातात भाला धरून, आपल्या दोन्ही पायांवर ठाम उभा होता. त्याच्या सहकाऱ्यांनी केलेली चूक तो करणार नव्हता: तो भांबावून, गोंधळून जाणार नव्हता.

कामिक आणि ते जनावर एक दुसऱ्याच्या दिशेने पुढेपुढे जात होते. या झुंजीच्या शेवटी आपल्या दोघांपैकी केवळ एकजणच जिवंत राहील हे त्या दोघांनाही माहित होतं. कामिक त्याच्या वडिलांच्या मृत्यूचा सूड घ्यायला आणि आपल्या नातेवाईकांचं रक्षण करायला झुंज करणार होता तर अस्वल आपलं पोट भरायला, जिवंत राहायला झगडणार होतं. पहिलं पाऊल उचलायला कामिक धजावत नव्हता. आपल्या शत्रूनं पहिल्यांदा आपल्यावर हल्ला करावा याची तो वाट पाहात होता. आत्ता जर त्यानं आपला भाला फेकून मारला तर तो जनावराला जखमी जरूर करेल पण तो त्याला ठार मारू शकणार नाही. केवळ एकाच भाल्यानं अस्वलाला ठार मारता येत नाही.

ते आता एकमेकांच्या खूप जवळ आले होते. कामिकने भाला आपल्या समोर धरला होता. जनावरनं झेप मारली आणि भाला थेट त्याच्या गळ्याच्या खाली घुसला. अस्वलानं किंकाळी फोडली आणि त्यानं हवेतच पंजानं एक

जोरदार थप्पड मारल्यासारखा हात हलवला. हत्त्यार गमावल्यानं, मेलेल्या कुणा शिकाऱ्याचा भाला पकडण्यासाठी कामिकनं बाजूला उडी मारली. झुंज पुढे चालू ठेवायला तो आता सज्ज झाला होता. अंगात दोन भाले रूपल्यानं अस्वलाचं रक्त भसाभसा वाहात होतं. त्यानं परत हल्ला केला,पण कामिक आपल्या दोन्ही पायांवर भक्कमपणे उभा होता. पंजांनं एक फटकारा मारून अस्वलानं त्याचा भाला हिसकावून घेतला. तो उचलण्यासाठी कामिक वेगानं पुढे झाला आणि चटदिशी उडी मारून तो अस्वलावर चढाव करायला तयार झाला. त्याच वेळी त्याचं लक्ष सूनाकडे गेलं. सारं अंग रक्तानं माखलेला सूना उठायचा प्रयत्न करत होता. त्यानं किंकाळी फोडली. अस्वल मागे फिरलं आणि ते त्याच्या दिशेनं पुढे झालं. कामिकनं ही संधी साधणं आवश्यक होतं. तो त्या जनावराच्या मागोमाग धावत गेला. अस्वल सूनापर्यंत पोहोचतच होतं की कामिकने आपला भाला त्याच्या कुशीत घुसवला. कमालीच्या वेदना होत आहेत असं दाखवणारी किंकाळी जनावरानं फोडली. ते मागे फिरू शकायच्या आतच कामिकने आपला भाला खेचून अस्वलाच्या अंगातून बाहेर काढला आणि परत त्याने त्याला मारलं. एकाच झेपेत, अस्वलानं त्याला अशी काही थप्पड मारली की कामिक जमिनीवर पडला. हातात कोणतंही हत्त्यार नसल्यानं कामिकचं आयुष्य आता त्या अस्वलाच्या हाती होतं. कामिकला ठार मारण्यासाठी त्याचा शत्रू त्याच्या दिशेनं पुढेपुढे येत होता पण सूना उठला आणि त्यानं आपला भाला त्या अस्वलाच्या शरीरात जोरानं घुसवला. जनावर जमिनीवर कोसळलं. कामिकही आता उठला,त्यानं आपला भाला उचलला आणि त्यानं त्या जनावराला पिटलं, आणखी पिटलं, त्याहीपेक्षा आणखी पिटलं. अगदी त्या अस्वलानं आपली शेवटची किंकाळी फोडेपर्यंत त्याने त्याला पिटलं.

कामिक सूनाच्या दिशेने झेपावला आणि त्यानं त्याला आपल्या मांडीवर घेतलं.

‘मीदेखील मनातल्या मनात एक शपथ घेतली होती’. सूना हलक्या आवाजात म्हणाला.’ तुझ्या वडिलांना दिलेलं वचन आपण पाळलं, कामिक. माझ्या आजोबांना सांग की मी आनंदानं मरणाला सामोरा गेलो.मी चिरंतन

शांततेकडे जातो आहे.'

'मी तुला काहीच वचन देऊ शकत नाही, सूना. या साऱ्या मोहिमेतून मीच काय तो एकटा वाचतो आहे. आणि माझ्याचप्रमाणे तुलाही माहित आहे की या मुलखात एकांडा शिकारी फार काळ तग धरून टिकू शकत नाही. सगळेजण मेले पाहा. किसिक, नाउलाक, नापाशी...सगळेजण मेले आणि थोड्याच काळात माझी पाळी येईल.'

'निराश होऊ नकोस, कामिक. किसिक काय म्हणाला होता ते आठव: कधीही हताश होता कामा नये. निदान तू प्रयत्न करून तर पाहा.'

'नक्कीच... मी प्रयत्न चालूच ठेवणार आहे. पण मला फारशी अपेक्षा उरलेली नाही.'

सूनाला कामिकचं बोलणं ऐकू येणं कधीच बंद झालं होतं. मृत्युमुखी पडलेल्या कुणा माणसाकरवी मृत्यूपासून वाचण्याची आपली ही दुसरी पाळी... कामिकच्या मनात विचार आला, कारण त्याला मदत करायला जेव्हा सूना उठला होता तेव्हा तो जिवंत होता असं म्हणण्यापेक्षा त्याची गणना मेलेल्यांतच करणं योग्य झालं असतं. 'सूना!' कामिक पुटपुटला. 'तुझ्यासारखे लोक जिवंत असेस्तोवर आपल्या जमिनी आणि आपले नातेवाईक अगदी सुखरूप राहातील. मी जर या सगळ्यातून बाहेर पडलो तर तुला मी माझा आदर्श म्हणून समोर ठेवीन. हा सगळा मुलुख इतका शत्रूत्त्वाच्या भावनेने भरलेला राहू नये म्हणून मी जास्तीत जास्त प्रयत्न करीन.' आपल्या मित्राचा निष्प्राण देह छातीशी धरून कामिक खूप खूप वेळ बसून राहिला. केवळ मृतांनाच लाभणारी शांतता सूनाला मिळाली होती.

रात्र पडत होती. उरामिक आणि तुगाक फोकमाशाचं कच्चं मास खात होत्या.

'आयुष्य इतकं खडतर का असतं?' थकलेल्या आवाजात उरामिकनं विचारलं. 'मृत्युमुखी न पडावं म्हणून आपण नेहमी असंच का झगडायला

हवं? त्यापेक्षा आपण मेलेलंच बरं असा विचार कितीतरी वेळा माझ्या मनात येतो...'

'असं काहीतरी बोलू नकोस, उरामिक. कुणी सांगावं? एखाद्या दिवशी सगळं काही बदलेल देखील...'

'नुसती स्वप्न पाहात बसलीयेस, तुगाक.'

'काही स्वप्नं खरी होतातही.'

'मला तरी तसं काही दिसलं नाही.'

इसा आणि मित्तिक बर्फाच्या ज्या टेकडीवर चढले होते तिथून त्यांना सभोवतालच्या कितीतरी किलोमीटर अंतरावरच्या गोष्टी दिसत आहेत. त्यांना खूप दूरवर क्षितिजावर असलेला प्रवाह दिसतोय. त्याच्या पलिकडे किकिताजोआक पसरलं आहे. प्रवाह पार करणं फारच धोकादायक आहे कारण हिवाळ्यात त्याला झाकून टाकणारं बर्फ कधीच कायमचं एका जागी स्थिर राहात नाही आणि तो प्रवाह पार करू पाहाणाऱ्या कुणालाही, जर तो बर्फाच्या एका ढीगापासून दुसऱ्यावर चपळपणे उड्या मारत मारत राहिला नाही तर ते बर्फ त्याला पार समुद्रापर्यंत घेऊन जाण्याचा धोका असतो.

इसा आणि मित्तिक नाल्याच्या काठाला येऊन पोहोचले. आता त्यांची खरी परीक्षा सुरू होते. चाबकाच्या फटक्यानेच इसा आपल्या कुत्र्यांना पळायला आदेश देतो. मित्तिक घसरगाडी चालवतो आहे. यानंतर ते कधीही एक क्षणभरही थांबू शकणार नाहीत. घामाघूम होत ते धावतात. बर्फाचे मोठाल्ले फाळकेच्या फाळके एकमेकांवर आदळतात. एकजरी पाऊल चुकलं तरी त्या बर्फाच्या त्या फाळक्यांवर गंमत म्हणून आलेल्या माणसाचा त्या फाळक्यांमध्ये चुराडा होऊन जातो. प्रवाहामध्येच असताना नशीब त्यांना सोडून जातं. पार दमून गेलेल्या कुत्र्यांकडून एक घोडचूक होते. एक कुत्रा त्याचा पाय बर्फाच्या अस्थिर फाळक्यावर ठेवतो आणि घसरून पाण्यात पडतो. त्याच्या गळयातल्या पट्ट्यामुळे सगळ्या कुत्र्यांची झुंडही पाण्यात

पडू नये म्हणून इसाला त्या कुत्र्याला जूला जोडलेला पट्टा कापून टाकावा लागतो. तो कुत्रा ताबडतोब पाण्यात बुडून जातो. आता त्यांच्याकडे केवळ सहाच कुत्रे राहातात.

'कुत्र्यापाठोपाठ आपणही पाण्यात पडलो नाही हे नशीब!' मित्तिक म्हणाला. 'पण म्हणून आपले कष्ट संपले असं काही म्हणता येणार नाही.'

कामिकने त्याच्या मित्रांचे मृत देह बर्फात पुरले. वसंत ऋतू आला की बर्फ विरघळेल आणि ते सगळे देह समुद्रात वाहून जातील. अर्थात त्याच्या अगोदर एखाद्या अस्वलानं ते उकरून खाल्ले नाहीत तरच! काय दुर्दैवाची गोष्ट आहे पाहा! त्या तरूण माणसासाठी किती भयानक दृश्य होतं ते! त्याचे सारे मित्र असे हे रक्तलांछित, निपचित पडलेले ! तरीही त्यांच्या आत्म्यांना आता शांति लाभली असणार असं कामिक म्हणत होता. मागे वळून, त्याने त्या अस्वलाच्या प्रेताकडे एक द्वेषानं भरलेला दृष्टिक्षेप केला. त्याच्या मित्रांचे छिन्नविच्छिन्न देह त्याला परत परत दिसत होते. आपल्या तीक्ष्ण नख्यांनी त्या जनावराने त्यांचे देह ओरबाडून काढले होते, त्यांची पोटं फाडली होती. नाऊलाकची आतडी बर्फ लाललाल करत होती...ते हत्त्याकांड पाहून आलेली ओकारी कामिकला थांबवता आली नव्हती...

तो त्या अस्वलाकडे वळला. यानेच त्या शिकाऱ्यांना मारलं होतं. तो इतक्या चटदिशी मेला, त्याला फारशा वेदना सहन कराव्या लागल्या नाहीत याचा कामिकला जणू काही खेदच होत होता. अस्वलाच्या मागच्या पायाला झालेली ती जुनी जखम कामिकला दिसली. आपल्या वडिलांना मारणारं अस्वल ते हेच! सूना जसा मेला तसा हाल हाल होत त्या अस्वलाला मरताना पाहायला कामिकला आवडलं असतं. त्यानं आपला बर्फात काम करायचा चाकू काढला आणि अस्वलाच्या केसाळ मांसल शरीरात घुसवला.

'उरामिक, जागी हो!' आपल्या मैत्रिणीला गदगदा हालवत तुगाक म्हणाली.'जागी हो. वाईट स्वप्न पडलं बघ तुला.' नखशिखान्त थरथरत,

डोळ्यातून वाहाणाऱ्या अश्रूंनी चेहरा सारा डबडबलेला...शून्य नजरेनं उरामिकनं आपल्या मैत्रिणीकडे पाहिलं.

'सॉरी हं.' हुंदके देत देत ती म्हणाली. 'पण आता मी ठीक आहे. आता खूपच चांगलं आहे.'

'तुला वाईट स्वप्न पडत होतं.'

'मला स्वप्नात शिकारी दिसले. ते सगळे मेले होते आणि ते सारं इतकं खरंखुरं वाटत होतं.'

'ते सगळे आनंदात आहेत असं मला नक्की वाटतंय. तू फार विचार करतेस, उरामिक. आणि फार काळजी करतेस.'

'त्यांना जायचीच काय गरज होती?'

'तुला माहिताय ते, उरामिक. आपलं संरक्षण करण्यासाठीच तर ते गेलेत ना? उगाच काळजी करायची बंद कर. झोप परत.'

आश्वासनानं भरलेलं असलं बोलतानादेखील तुगाकलाही काही फारशी मानसिक शांति नव्हती. मित्तिक आणि इसा या क्षणी कुठे असतील? हा प्रश्न तिच्या मनात सारखा घोळत होता.

सारी रात्रभर ते रस्ता काटतच होते. अंधारामुळे त्यांना असलेला धोका अंधारामुळे कितीतरी पट वाढला होता.

'अजून तीन तासात, कदाचित आणखी थोड्या जास्त वेळानंच आपण या सगळ्यातून बाहेर पडू.' मित्तिक म्हणाला.

'हो...' धावायचं न थांबता उच्छ्वास सोडत इसा म्हणाला.' जर आपलं नशीब ठीक असेल तरच!'

'उद्याला परत आकाश ढगाळ असेल.आज तारे नाहीयेत.'

'निदान वादळाला तोंड द्यायला लागणार नाही अशी अपेक्षा करू या.'

'एकदा का आपण दुसऱ्या तीराला येऊन पोहोचलो की आपल्याला कोणीही थांबवू शकणार नाही. अगदी वादळदेखील...'

'उरलेला रस्ता अगदी रांगत-रांगत पार करावा लागला तरीही आपण आपल्या उद्दिष्टाला जाऊन पोहोचूच असं मी स्वत:ला वचन दिलं होतं.'

जरी त्यांच्यासमोर सतराशे साठ संकटं होती तरी आसावलेले ते दोन तरूण रात्रभर वाट काटत राहिले .

लवकरच वादळ येणार आहे हे कामिकला पूर्णपणे माहित आहे. आर्क्टिकाचा बर्फाळ वारा वेगानं वाहातो आहे आणि त्याच्या चेहऱ्याला छिन्नभिन्न करून टाकतो आहे. पण तो त्याकडे लक्ष देत नाही. त्याला इतकं उकडतं आहे की वाऱ्याचे हे तडाखे त्याला शांत करणाऱ्या हलक्याशा झोतासारखेच वाटत आहेत. कामिकला पहाटेचे काही किरण नजरेला पडतात. तो सारी रात्रभर चालत होता. वादळ लवकरच आलं म्हणजे मिळवली! रानटी प्राणी वादळात बाहेर पडत नाहीत. निदान त्यांची तरी कामिकला भीति बाळगावी लागणार नाही. सूर्य अगोदरच वर आला आहे आणि बर्फ झंझावातात गोलगोल फिरत अधिकाधिक जोरानं झोडपतं आहे. बर्फापासून स्वत:चा बचाव करण्यासाठी कामिक हात आपल्या चेहऱ्यासमोर धरतो. यातून आपण वाचू याची त्याला काडीमात्र अपेक्षा नाही पर तरीही तो वाट चालतच राहातो. ह्या वेळा निदान निसर्ग तरी त्याला सहायक असल्याचं शाबीत होत आहे.

वारा त्यांच्या इग्लूला जोरजोरानं झोडपत होता आणि त्यामुळे उरामिकचं मन थरथरून उठलं होतं. पुरा तासभर त्या दोघी एक शब्द बोलल्या नव्हत्या, पण तरीही प्रत्येकीला दुसरीच्या मनात काय चाललं आहे हे चांगलं माहित होतं. उरामिकने शांततेचा भंग केला.

‘शिकारी लवकरच परत यायला हवं, नाही तर आपल्यावर भुकेनं मरायची पाळी येईल.’

‘सगळं काही ठीक होईल, उरामिक. मला पुरेपूर खात्री आहे त्याची. तू विनाकारणच काळजी करत राहातेस.असा स्वत:चा छळ करायचं थांबव.’

आणि तरीही तुगाक स्वत: शांत नव्हती. कारण शिकारी आणि मित्तिक आणि इसाही परत आले नाहीत तर आपण भुकेनं मरू हे तिला माहित होतं.’

वारा अधिकाधिक जोरानं वाहात होता आणि बर्फाच्या ज्या फाळक्यांवरून ते पुढे पुढे जात होते ते क्षणाक्षणानं अधिकाधिक भयानक बनत होते. ते एकसारखे हालत होते, एकमेकांशी टकरत होते, खूप जोरानं अचानक उलटेसुलटे होत होते. कुत्री मोठमोठ्यानं भुंकत होती. खारट पाणी त्यांच्या केसाळ कातडीला झोपडत होतं आणि त्यांच्या डोळ्यांना झोंबत होतं. पाण्याला प्रतिरोध करणाऱ्या सील माशाच्या कातडीपासून बनवलेल्या त्यांच्या कपड्यांतून मित्तिक आणि इसा अजून कोरडेच होते. पण बर्फाच्या फाळक्यांचा होणारा कणकण आवाज आणि एकत्र झालेल्या बर्फाच्या फाळक्यांना वाऱ्याच्या झोतांमुळे झोडपणाचा आवाज कानात एकसारखा घुमत होता. त्यांनी टाकलेलं पाऊल जर अयोग्य जागी पडलं तर ते त्यांच्या मरणाला कारणीभूत होऊ शकणार होतं.

आणखी काही किलोमीटर अंतरावर इसा आणि मित्तिकना पक्की जमीन दिसली. वस्ती सोडल्यापासून पहिल्यांदाच त्यांचे चेहरे स्मितहास्यानं उजळले. आता ते आनंदानं आपलं मार्गक्रमण चालू ठेवू शकतील. थोड्या वेळानं, त्यांनी घट्ट आणि न हलणाऱ्या बर्फावर पाऊल ठेवलं. ते जमिनीवर सताड पसरले आणि धापा टाकत त्यांच्या कुत्र्यांनीदेखील त्यांचं अनुकरण केलं. आपल्या थकलेल्या स्नायूंमधील वेदना इसा आणि मित्तिकना जाणवायला लागली. इसानं उभं राहायचा प्रयत्न केला, पण तो अडखळला आणि पार सताड पाठीवर पडला. मित्तिकला तर हसूच फुटलं.

‘इतक्या चटदिशी उठून उभा राहू नकोस. तरंगत्या बर्फानं भरलेलं लांबच लांब अंतर काटल्यानंतर काही काळ आपला तोल राखणं शक्य नसतं

हे माहिताहे ना तुला? आता काही काळ विश्रांती घेणं आवश्यक आहे.'

काही वेळानं ते उठले आणि किकिताजोआकच्या दिशेने निघाले. तिथे आपल्याला काही मदत मिळेल अशी त्यांची अपेक्षा होती.

वादळ अधिकाधिक बळावतच चाललं होतं, पण कामिक चालतच आहे. समोर काही पावलांवरचं सोडलं तर त्याला काही स्पष्ट दिसत नाही. पण तरीही वादळात रानटी प्राणी बाहेर पडत नाहीत हे त्याला माहित असल्याने आपल्याला धोका नाही असं त्याला वाटतय.पण वाऱ्यामुळे त्याचा वेग मंदावला आहे आणि प्रत्येक क्षणाला त्याला वाऱ्याशी विलक्षण ताकतीनं चार हात करावे लागताहेत. आपल्यासमोर काय आहे ह्याची जाणीव नसताना, आपली वाट बदलू नये म्हणून त्याला वाऱ्यात मुसंडी मारावी लागत आहे. अधूनमधून तो चेहऱ्यावरचं बर्फ पुसायला म्हणून तो थांबतो. त्यानं पाठीवर बांधलेली मासाची छोटीशी पुडकी त्याला शेकडो सील माशांच्या वजनासारखी जड वाटते आहे. तरीही या क्षणी तरी त्याच्या हातात असलेल्या वस्तूंपैकी तीच सर्वात किमती वस्तू आहे. या खाण्याच्या वस्तूच्या अभावी तो आणखी एक रात्रभरदेखील जिवंत राहू शकणार नाही. भुसभुशीत बर्फ त्याच्या प्रत्येक पावलाला विरोध करते आहे. जर घरी परतायचं असेल तर कामिकला जमेल तितकं, दिवसेन दिवस चालावं लागेल. आईला भेटायला तो भलताच आसुसलेला आहे. हा विचार मनात येताच, कामिकची जीजिविषा जागी होते.

ते दोघेजण आपल्या घसरगाडीच्या बाजूबाजूने चालताचालता अतिशय चिंतेत होते. त्यांचे कुत्रे संथपणे चालले होते, पण तो काही फारसा मोठा प्रश्न नव्हता. किकिताजोआक आता अगदी जवळ येऊन ठेपलं होतं. इसा आणि मित्तिकना तोच एक ध्यास होता: किकिताजोआकला जमेल तितक्या लवकर अणि सुखरूप पोहोचायचं.

'पोहोचलो आपण एकदाचे.'

इसा आणि मित्तिकनी धावायला सुरवात केली. त्यांच्याबरोबरचे कुत्रे त्यांच्यामागोमाग धावायला लागले. गावातला एक माणूस त्याच्या कुत्र्यांना खायला देत होता, त्याला ते पहिल्यांदा दिसले: प्रवाहाकडून येणाऱ्या दोन मानवी बाह्याकृती! काही मिनिटातच, शेकडो गावकरी आपापल्या इग्लूंतून इसा आणि मित्तिकना पाहायला म्हणून बाहेर आले. काही जण त्यांना भेटायला म्हणून पुढे आले. त्यांना येताना पाहून इसा आणि मित्तिक त्यांची वाट पाहात जमिनीवर बसले. आता मदत शोधायला त्यांनी जायची गरज नव्हती. मदत त्यांना शोधत शोधत येणार होती.

'काय झालं तुम्हाला?'

'कोण आहात तुम्ही?'

'कुठून आलात तुम्ही?'

'आम्ही मदत शोधायला म्हणून आलो आहोत. आमचे शिकारी संकटांत सापडले आहेत.'

'चला! प्रथम तुम्ही खाऊन घ्या. मग जे जे काही घडलं ते सांगा.'

तीन दिवसांपासून पहिल्यांदा इसा आणि मित्तिक जेवण जेवले. मग इसानं त्यांच्या वस्तीवर हल्ला करणाऱ्या अस्वलाची कहाणी सांगितली.

'वेड लागलेलं अस्वल?' किकिताजोआकच्या एका रहिवाशाने विचारले. 'खरंय्.असतात अशी अस्वलं.'

'ती भलतीच धोकादायक असतात. म्हणून आपण निघायला हवं. पण आज नाही.'

'आणि तो प्रवाह कसा आहे?'

'भलताच धोकादायक.'

'आणि तुम्ही या वादळाच्या वेळी तो पार केलातना? अगदी विश्वास बसण्या पलिकडचंच आहे.'

‘आमचं नशीब जोरदार होतं. आम्ही निम्मा नाला ओलांडला होता तेव्हा वादळ सुरू झालं.’

‘आम्ही तुमच्या कुत्र्यांना खायला देऊ आणि तुमचे कपडे पण वाळवू. तुम्ही आता थोडी विश्रांती घेतली पाहिजे.’

कामिक जमिनीवर कोसळतो आणि अगदी उठायचादेखील प्रयत्न करत नाही. त्याच्या छातीत जळजळतय्. भराभर त्याच्या भोवती बर्फ गोळा होतं. जर तो तसाच निस्तब्ध राहिला तर बर्फाखाली पुरला जाईल.मोठ्या कष्टांनी कामिक उठून उभा राहतो. रात्रीसाठी एक छोटं इग्लू बांधायला हवं. तो एक चांगली जागा शोधून काढतो आणि काही मिनिटातच, तो मोठ्या कष्टांनी बर्फाचे ठोकळे एकावर एक रचतो आहे. प्रत्येक नवा ठोकळा त्याला पहिल्यापेक्षा अधिक जड वाटतो. कामिक संथपणे काम करतो आहे, त्याच्या चेहऱ्यावर बर्फाचे तडाखे बसताहेत. पण त्याचा त्याला त्रास होत नाही. तो तर घामाघूम झाला आहे. वारा थांबलाय. अंधारातच कामिक सील माशाच्या गोठलेल्या मासाचा एक तुकडा चावून चावून खातो. किती छान लागतो तो. मग तो सील माशाचीच एक छोटी कातडी जमिनीवर पसरतो आणि झोपण्यासाठी तिच्यावर आडवा होतो.

अचानक ‘कामिक, कामिक’ अशा हाका त्याला ऐकायला येतात.तो ताडकन उडी मारून उभा राहातो. पण ते तर केवळ एक स्वप्न असतं. कामिकच्या साऱ्या अंगावर थंड घाम भरून येतो. तो आवाज किती खराखरा वाटत होता. मृत माणसांचे आत्मे का त्याला हाका मारत होते? भीतिने डोळे तराळलेले, तो तसाच पडून राहातो.

न कळताच कामिकला झोप लागते.तो जेव्हा डोळे उघडतो तेव्हा इग्लूत स्वच्छ प्रकाश भरलेला असतो. कामिक उठतो आणि बाहेर येतो. वारा अजूनहि जोरजोरात वाहतो आहे, पण वादळ संपलं आहे. कामिक बर्फाच्या एका ढिगाऱ्यावर चढून आसपासच्या प्रदेशाचे निरीक्षण करतो. दूरवर, किमान तीन दिवस प्रवासाच्या अंतरावर, त्याला पर्वत दिसतात. तो तिकडे जायचा

निर्णय घेतो. पण आपण बर्फावरच राहिलं पाहिजे. या मुलुखात समुद्रापेक्षा जमीन जास्त धोकादायक असते. जमीन म्हणजे लांडगे आणि कस्तुरीच्या वासाच्या बैलांचं साम्राज्य असते. आपलं पोट भरण्यासाठी ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत ते बैल ती जमीन पादाक्रांत करत राहातात. झोपलेला नसेल तर लांडगा माणसावर हल्ला करत नाही, पण ते बैल मात्र त्याला सहज मारू शकतात. कामिक बर्फाच्या ढिगावरून खाली उतरतो आणि थोडंसं मास खाण्यासाठी म्हणून इग्लूत जातो. चटदिशी तो आपला रस्ता पकडतो. त्याचं मन शांत नाहीये. आजचा दिवस त्याचा शेवटचा दिवस असेल तर? उद्याचा सूर्य पाहायचं त्याच्या नशीबात नसेल तर?

मित्तिक किती वेळ झोपला होता? त्याच त्यालाच माहित नव्हतं. जेव्हा त्याने डोळे उघडले तेव्हा इतर लोक कधीच जेवायला लागले होते. एक शब्दही न उच्चारता तो उठला.

'सगळे तयार होताहेत्.' तो इग्लूत परत येत इसाला म्हणाला.'चल, आटप, नाही तर तुला इथंच सोडून जावं लागेल आम्हाला. अर्थात तुलादेखील इथे राहावंसं वाटू शकेलही. किकिताजोआकला खूप बायका आहेत...'

'मलाही इथे राहायला आवडेल, हे नक्कीच.पण मी इथनं गेलेलंच बरं. नाही तर माझी बायको भाला घेऊन पार जगाच्या अंतापर्यंत माझा पाठलाग करत येईल. पण ते जाऊ दे... मला हे सांग, आपल्याबरोबर किती लोक येताहेत?'

'एकवीस. आणि १५० कुत्रे !'

'काय? हे म्हणजे आपल्या वस्तीइतके लोक झाले आणि आपल्यापेक्षा त्यांच्याकडे जास्त कुत्रे आहेत.'

सूर्य उगवला तेव्हा ते सारे तयार झाले होते. जायचा इशारा होताच त्यांनी नाल्याकडे आणि त्याच्या अगणित धोक्यांकडे कूच केली. त्यांच्याबरोबर एक मुलगी होती. 'ही काय करतेय इथे?' मित्तिक स्वत:शीच म्हणाला. काही

तासांनी ते नाल्यापाशी येऊन थडकले.वारा शांत झाला होता आणि जमिनीला झाकणारं बर्फ फारसं हलत नव्हतं, पण त्याच्याखाली अजून कितीतरी धोके लपून होते. एकामागून एक, सारे घोळके बर्फाच्या फिरणाऱ्या फाळक्यांवर चढले. भयानक प्रवासाला सुरवात झाली होती.

कामिक पार थकून गेला आहे पण तो आराम करायला धजत नाहीये कारण आपण टाकलेलं प्रत्येक पाऊल जीवावर बेतलेल्या या संकटांवर मात करण्याची एकेक संधी आहे हे त्याला माहित होतं. तो घामानं निथळतो आहे आणि त्याच्या पाठीवरची छोटी पिशवी त्याला शंभर फोक माश्यांच्या वजनाइतकी जड वाटते आहे. त्याच्या हातातला चाकू तर त्याला इतका जड झाला आहे की त्याच्या वजनानं आपण पडू की काय अशी त्याला भीतिच वाटतेय. प्रत्येक पावलागणिक आपले पाय हलायला तयार नाहीत हे त्याला जाणवतंय्. त्याच्या छातीत जळजळतंय, सील माशाची कातडी चढवलेला एखादा ढोलच असावा तसं काळीज जोरजोरानं धडधडतंय! तरीही कामिक आपल्या शरीराला पुढे चालायला भाग पाडतोच आहे. सूर्य अस्ताला जाईस्तोवर तो पुढेपुढे जातच राहिल. देह आपल्याला वाहून न्यायला नकार देईस्तोवर!

ते एव्हाना नाल्याच्या मधोमध येऊन पोहोचले होते. आत्तापर्यंत त्यांचा प्रवास काही गडबड न होता झाला होता. तरीही प्रत्येक पावलावर संकट आपल्यावर नजर रोखून आहे हे प्रत्येकाला माहित होतं. आत्तापर्यंत नशीबानं त्यांना साथ दिली होती. ती ते कुठपर्यंत तशी देईल? आंगुतिक आणि त्याची मुलगी पुतुक्की या मोहिमेचं नेतृत्त्व करीत होते. इसा आणि मित्तिक लगोलगच त्यांच्या मागे होते. पुतुक्कीला मोठ्या चपळपणे बर्फाच्या एका फाळक्यावरून दुसऱ्यावर उड्या मारताना पाहून इसाला कौतुकानं हसू यायचं. इतरांकडे पाहायला म्हणून त्याने मान वळवली. ‘हे लोक इथल्या मुलुखाचे राजे आहेत. त्यांच्याबरोबर आणि त्यांच्या कुत्र्यांच्या सहायाने आपल्याला आपले शिकारी सापडतीलच आणि आपण त्या अस्वलाला ठार मारू!’

या रात्री ते झोपणार नाहीत. पुढे तसंच चालत राहाणं त्यांना भाग होतं आणि ते काही सोपं नव्हतं. दिवसा, उजेडात सुदैवानं ते तरंगत्या बर्फाच्या फाळके काही धोका-नुकसान न होता पार करू शकत होते. पण संध्याकाळी ... रात्र पडायला सुरवातदेखील झाली होती. आणि त्याचबरोबर धोका शतपट वाढला होता.

अंधार पडला आहे. कामिक अजून चालतोच आहे. थांबावं, आराम करावा असं त्याला किती वाटतंय. पण सूर्य पार बुडेस्तोवर आपण चालतच राहिलं पाहिजे असं तो आपल्याशी वारंवार घोकतो आहे. आत्तापर्यंत तो नशिबवान ठरलाय. एक पुरा दिवस संपलाय आणि तो अजूनही जिवंत आहे. लवकरच तो थांबेल आणि रात्रीसाठी एक इग्लू बनवेल.

एकदाचा पुरेपूर अंधार पडला.पुढे जाणं कामिकला अशक्य होते. तो स्वत:ला बर्फावर झोकून देतो, त्याचे स्नायू ढीले होतात. तसंच आडवं पसरून राहायला त्याला आवडेल. तरीही आपल्या इग्लूसाठी एक चांगली जागा शोधायला तो स्वत:ला भाग पाडतो. लवकरच मोठ्या कष्टांनी बर्फाचे ठोकळे एकमेकांवर रचतो. खूप खूप वेळानं आपला इग्लू तयार झाला असं त्याला वाटतं. कामिक त्यात स्थानापन्न होतो, आपल्या पिशवीतून मासाचा एक लहानसा तुकडा काढतो आणि हपापल्यासारखा तो बकाबका खातो. ते गोठलेलं मास आपल्या पोटात जाताना त्याला जाणवतं. तरीही आपल्याजवळचा अन्नाचा सगळा साठा याच क्षणी संपवायच्या मोहावर तो मात करतो. हे मासच काय ते त्याच्या दृष्टीनं भवितव्याची एकमेव आशा आहे. ते त्याने आत्ताच खाऊन संपवलं तर तो भूकेनं मरेल. त्याच्या शेजारीच त्याचा भालाही पडला आहे. त्याच्या मृत्यू आणि जीवनाचे हत्त्यार! छोटासाच तरीही इतका ताकतवान !

कामिक मास परत पिशवीत ठेवतो. मग तो थोडंसं बर्फ आपल्या तोंडात विरघळवतो. हात धुवायला म्हणून तो ते थुंकतो आणि उरलेलं पितो. सील माशाच्या कातडीच्या पँटीला हात पुसतो आणि आडवा होतो. झोपायला म्हणून तो डोळे मिटतो पण त्याला झोपच येत नाही. आता कामिक काहीच करू शकत नाही. पुढची पहाट कधी होईल याचीच वाट पाहाणं त्याला भाग

आहे.

कितीतरी तास उलटल्यावर त्यांना जमीन दिसली. लवकरच ते सुरक्षित जागी पोहोचतील. नशीबवान होते ते: रात्री प्रवास करताना त्यांना दुर्दैवाचं भक्ष्य व्हावं लागलं नव्हतं. एकेक करून सगळ्या घोळक्यांनी स्थिर बर्फावर पाय ठेवला. हुश्श्य करत त्यांनी स्वत:ला जमिनीवर झोकून दिलं. यानंतर त्यांना काहीही रोकू शकणार नाही. इसा आणि मित्तिकच्या वस्तीपर्यंत ते जातील.आता आपण सुरक्षित आहोत असं त्यांना वाटत होतं. ते जेवणार होते, आराम करणार होते. मग ते आपला रस्ता पकडणार होते. पुतुक्की शिकाऱ्यांसाठी जेवण करत होती तेव्हा तिला कुणाची तरी चाहूल लागली. रात्रीच्या काळोखात कुणातरी पुरूषाची बाह्याकृती जाणवत होती.

'कोणाय ते?' - तिनं विचारलं.

'मी ! इसा. तू कशी आहेस?'

'थोडी दमलेय, पण ते ठीकाय.'

'असल्या मोहीमेत बायकांना जागा नसते.'

'इतरांसारखीच मीही खूपशा धोक्यांना सामोरी गेलीय.'

'हा प्रवास करू शकतील अशा बायका विरळाच आहेत.'

'तुला काय वाटतं? आपण शिकाऱ्यांना शोधून काढू?'

'अर्थातच! पण ते जिवंत असतील की मेलेले? हे कुणालाच माहित नाही.'

'ते मेले असतील असं वाटतंय तुला?'

'इथं सगळ्यात वाईट गोष्टीला तयार असलं पाहिजे.'

'माहिताय मला ते.पण तो विचार मनात आला की घाबरायला होतं.

त्या मोहिमेवर गेलेल्यात तुझे काही नातेवाईक आहेत?'

'माझा भाऊ, नूलाक आणि माझा मित्र, कामिक. तो सोळा वर्षांचाच तर आहे. मला तर मोहिमेवर गेलेला प्रत्येक माणूस माहिताय्. आणि ते सगळे उत्कृष्ट शिकारी आहेत. पण मला तुझ्याबद्दलही सांग ना.'

'काही फारसं सांगण्यासारखं नाही. माझं नाव पुतुक्ती आहे, हे तुला माहितच आहे. मी आंगुतिकची मुलगी आहे.आंगुतिक किकिताजोआकचा मुखिया आहे. मी लहान असतानाच माझी आई वारली. मला एक भाऊ आणि एक बहीण आहे आणि मी सगळ्यात लहान आहे. अगदी लहान असल्यापासून मी कधीच एका जागी स्थिर राहायची नाही. मला बायकांच्यापेक्षा पुरूषांचीच कामं आवडायची. मी माझ्या वडिलांबरोबर फिरत राहिले आणि मला पुरूषांबद्दल आणि त्यांच्या कामाबद्दल खूप खूप काही कळलं. मी नेहमीच अशीच भटकत राहीन असं मला वाटतं. मी एकाच जागी स्थिर होईन असं मला नाही वाटत. मला नाविन्याची चटकच आहे.'

'तुला लग्न नाही करायचं?'

'अं हं. निदान आत्ता तरी नाही.. .कोण जाणेः..'

'तू खूप छान दिसतेस, पुतुक्ती. माझं जर लग्न झालं नसतं तर मी तुझ्या वडिलांकडे तुला मागणी घातली असती.'

'नेत्झियाकनं हे ऐकलं तर तो भलताच संतापेल.'

'नेत्झियाक कोण आहे?'

'तो आमच्या मोहिमेत आहे. तो भलताच मत्सरी आहे आणि भयानक संतापीदेखील. त्याला माझ्याशी लग्न करायचं होतं, पण बाबांनी त्याच्या मागणीला नकार दिला. सुदैवानं मला तो आवडत नाही.'

'ठीकाय तर. यानंतर मी थोडी जास्त काळजी घेईन. मला उगाच भांडणं नाही लावायची.'

'मी शिकाऱ्यांना बोलावते. जेवण तयार झालंय्.'

पुतुक्तीनं हाक मारल्यावर सगळ्या शिकाऱ्यांनी ते करत होते ते काम तसंच टाकलं आणि जेवणावर ताव मारला. किकिताजोआक सोडल्यापासून त्यांचं हे पहिलंच जेवण होतं. इसानं मासाचा एक तुकडा घेतला आणि तो बर्फाच्या एका ठोकळ्यावर जाऊन बसला. मासाचा एक मोठा तुकडा हातात घेतलेला, एक उंचापुरा माणूस त्याच्याजवळ बसायला आला.

'नमस्कार.' इसा म्हणाला.

'माझ्या पुतुक्तीशी बोलताना तुला पाहिलं मी.' तो राक्षस मासाच्या तुकड्यात दात रोपत म्हणाला.

'तिचं लग्न झालंय हे नव्हतं मला माहित.'

'ती अजून माझी बायको नाही झालीय, पण एक दिवस ती होईलच.'

'तिच्या वडिलांनी तुझ्या मागणीला मान दिला, किती सुदैवाची गोष्ट आहे नाही?'

'तिच्या वडिलांनी अजून काही म्हटलं नाहीये. पण ते होकार देतीलच. आणखी एक गोष्ट सांगायची आहे तुला, परदेशी माणसा! माझ्या पुतुक्तीपासून थोडा दूरच राहा, नाही तर तुझी माझ्याशी गाठ आहे.'

'तुझी पुतुक्ती?' नेत्सियाकच्या डोळ्यात डोळे घालून पाहात इसा म्हणाला.' ती अजून तुझी बायको झाली नाहीये आणि मी तिच्याशी मला हवं तितक्या वेळा बोलू शकतो. उगाच बढाई मारतोयस खरा, पण एखाद्या अस्वलासमोर तू काय करशील ते पाहायला मला आवडेल. तिथेच तुझी खरी ताकत समजेल.'

'मी तुला नुसती एक समजावणी दिली, परदेशी माणसा.' नजरेत कठोरपणा आणत नेत्सियाक म्हणाला. 'तू जर तिच्याजवळ गेलास तर माझ्या भाल्याचं टोक तुझ्या गळ्याशी गुदगुल्या करताना तुला जाणवेल.'

'समजावणी दिल्याबद्दल धन्यवाद. मला नसती डोकेदुखी नकोय, पण मीही तुझ्यावर नजर ठेवून आहे. आणि माझ्याजवळही भाला आहे हे तूही

लक्षात ठेव. आणि दुसरी गोष्ट: कुणालाही कुणाशीही बोलायची परवानगी आहे.'

'असेल, पण माझ्या पुतुक्तीबरोबर नाही.'

'पुतुक्तीबरोबरही. तुला काय वाटेल ते म्हण, कुणाच्याही स्वातंत्र्यावर तू गदा आणू शकणार नाहीस. मला तुझी भीति वाटत नाही.'

'ते दिसेलच.'

'नंतर बघू या, प्राण्या.'

इसा तिथून निघून गेला. त्याच्या चेहऱ्यावर स्मित होतं.

सारी रात्रभर ते चालत राहिले. सूर्य आकाशात वर यायच्याआधीच ते वस्तीपाशी येऊन पोहोचले. तिथेच तर त्यांची खरी शिकार सुरू होणार होती .

कामिकसाठी एक नवा दिवस सुरू झाला. परत एकदा तो सजग झाला. आदल्या दिवसाच्या चालण्यानं त्याचे स्नायू अजून ठणठणताहेत, पण तो विचार मनात येऊ देणं तो टाळतो आहे. वेदना कुठूनही येवो, तिच्याशी त्याने दोन हात केलेच पाहिजेत. घरी परतायचं असेल तर त्याला ही किंमत द्यावीच लागेल.जोरदार वारा वाहात असतानादेखील, चालताना त्याचं शरीर घामानं निथळत होतं. आपल्याला थंडी वाजावी असं कामिकला खूप वाटतंय् .त्यामुळे तो अधिक सहजतेनं चालत राहिल. तो थोडंसं बर्फ आपल्या चेहऱ्यावर घासतो. त्याच्या जळजळणाऱ्या गालांचा स्पर्श होताच ते ताबडतोब विरघळतं. खूप खूप वेळानं कामिक खडबडीत बर्फावर येऊन पोहोचतो. सपाट बर्फापेक्षा आता त्याचा वेग फारच कमी होतो आणि कारिबूच्या कातडीपासून बनवलेले त्याचे जोडे लवकरच जमिनीवरच्या धारदार टोकांनी फाटतात. पण कामिकपुढे दुसरा पर्यायच नाही. ह्या खरबरीत मैदानाला फेरी मारून जाण्यासाठी आवश्यक तेवढा किमती वेळ तो वाया घालवणार नव्हता. ते धारदार बर्फ लवकरच त्याच्या बुटांच्या चिंध्या चिंध्या

करून टाकेल आणि तो अनवाणीच आपल्या घरी परतेल. जेव्हा त्याच्या बुटांचे तळवे फाटून जातील, तेव्हा त्याच्या पायांना भेगा पडायचा धोका असेल. बर्फाचा तो भयानक चावरेपणा कसा असतो हे कामिकला माहित आहे. पण तिथपर्यंत पोहोचेपर्यंत त्याला आणखी कितीतरी धोक्यांबद्दल जागरूक असायला लागणार आहे. आतापासून प्रत्येक पावलावर धोका त्याच्यावर नजर ठेवून आहे.

'पाणी करायला बर्फ शोधायला जाते मी, तुगाक.' उरामिक म्हणाली.

'सांभाळूनच जा.सूनाबाबानं काय सांगितलं ते लक्षात ठेव.'

'त्यांचे शब्द मी कधीच विसरणार नाही. उगीच काळजी करू नकोस. मी डोळे उघडे ठेवीन.'

इग्लूतून बाहेर येतायेताच उरामिकला दचकायला झालं.

'आले ते!' तुगाककडे वळत ती जोरानं ओरडली. 'ते आले.'

'कोण?' आपले जोडे पायात चढवत तिच्या मैत्रिणीनं विचारलं.' कोण आलंय्?'

'किकिताजोआकची माणसं.'

उरामिकने ती बातमी इतरांनाही ऐकवली. लवकरच वस्तीतले सारे लोक मित्तिक, इसा, आणि किकिताजोआकच्या रहिवाशांचं स्वागत करायला गोळा झाले. मित्तिक आणि इसाच्या बायकांनी आनंदाचे अश्रू ढाळत आपल्या नवऱ्यांना मिठी मारली. मोठ्या उल्हासानं लोकांनी एकमेकांना अभिवादन केलं. थोड्या वेळानं, आता यानंतर काय करायचं याबद्दल ठरवायला ते पुन्हा गोळा झाले.

'माझं नाव आंगुतिक आणि मी या मोहिमेचा प्रमुख आहे. आम्ही रात्र इथं घालवू कारण पुढे कूच करायला आता फार उशीर झाला. पहाट फुटता फुटता आपण इथून निघून जाऊ. मी आता तुम्हाला शिकाऱ्यांबद्दल प्रश्न विचारू इच्छितो आणि तुम्ही मला व्यवस्थित उत्तरं द्याल अशी मला अपेक्षा

आहे कारण मी जी माहिती तुम्हाला विचारणार आहे ती त्यांना शोधायला अत्यंत महत्त्वाची आहे. त्यांना जाऊन किती दिवस झाले?

'सतरा दिवस उलटले,' सूना म्हणाला.

'त्यांनी किती दिवसांची शिदोरी बरोबर नेली होती?'

'पाच-सहा दिवस पुरेल एवढी.'

'पाच सहा दिवस पुरेल एवढीच? त्यानंतर त्यांना काही शिकार मिळाली नसेल तर ते भूकेनं कुळकुळले असतील. आम्ही आमच्या बरोबर भरपूर सीलचं मास, कारीबू आणि मासे घेऊन जाऊ. कोणत्या दिशेने गेले होते ते?''

'ऐविक बेटाच्या दिशेने.'

'आपण कधीपर्यंत परत येऊ असं त्यांचं म्हणणं होतं?'

'जोपर्यंत ते अस्वल आपल्याला भेटत नाही आणि आपण त्याचा वध करत नाही तोपर्यंत...'

'मग ते अजूनही त्याच्या शोधात असण्याची आणि त्यांच्यावर काही अरिष्ट कोसळलं नसण्याची शक्यता आहे. यातून निष्कर्ष दोनच: एकतर कदाचित त्यांची खूपशी कुत्री भूकेनं मेली असतील आणि त्यामुळे त्यांचा वेग कमी झाला असेल. किंवा ते कोणत्याही क्षणी या इथे येऊन उभे राहतील. बरं, ते जाऊ दे: ते शोधत असलेलं ते अस्वल कसं होतं?'

'ते भ्रमिष्ट होतं. पार वेड लागलं होतं त्याला.' सूना जोरानं म्हणाला.'तसं पाहिलं तर कुत्र्यांवर इतक्या त्वेषानं हल्ला केल्यावर अस्वलं त्यांना खाल्ल्याशिवाय राहात नाहीत. केवळ त्यांच्याशी चार हात करायचे म्हणून ते वस्तीत शिरत नाहीत.'

'माझा निष्कर्ष चुकीचा ठरो!' आंगुतिकनं आपले विचार मांडायला सुरवात केली. 'पण तुम्ही सांगता त्यावरून मला तरी असं वाटतं की या अस्वलाला वेड लागलं असावं. ते जर खरं असेल तर ते जबरदस्त खतरनाक

आहे.'

'आणि प्राण्यांना वेड कसं लागतं?'

'त्याची सुरवात कशी होते ते नाही मला माहित. पण खूपशा प्राण्यांना वेड लागू शकतं एवढं मात्र मला माहित आहे. खास करून कोल्ह्यांना. इतकंच नव्हे तर कुत्र्यांनासुद्धा. वेड लागलेल्या प्राण्यानं चावल्यावर माणसंदेखील काही दिवसांतच मरतात हे मी अनुभवानं सांगतो. तुमच्या कुत्र्यांपैकी एखाद्या कुत्र्याला वेड लागलेलं नाही ना? बरं ते जाऊ दे : तुमच्यापैकी ज्या कुणाला या मोहिमेत सामील व्हायचं असेल त्याचं स्वागतच आहे. आपल्या मित्रांना आणि नातेवाईकांना भेटायला तुम्ही उतावीळ झाला असाल.'

'मी मोहिमेत सामील होणारच.' उरामिक म्हणाली. 'माझा नवरा आणि मुलगा त्यात भाग घेत आहेत.'

'आणि मीही!' तुगाक म्हणाली. 'एकटी झोपायचा मला कंटाळा आलाय. माझ्या नवऱ्याला भेटायला मी फारच उत्सुक आहे. खास करून रात्री मला त्याची फारच...'

सगळे जण जोरजोरात हसायला लागले.

'ठीक आहे.' आंगुतिक म्हणाला. 'आपण पहाटेच निघायचंय्.'

धारदार टोकांनी भरलेल्या तुकड्यांच्या त्या खडबडीत बर्फावर कामिक खूप वेळ चालला आहे. त्याच्या बुटांचे तळवे कधीच फाटायला लागले आहेत. आता त्याला पर्वत स्पष्ट दिसायला लागले आहेत. तरीही ते अजून दोन दिवसाच्या अंतरावर आहेत. वाटेवर एकही अस्वल भेटू नये एवढीच त्याची इच्छा आहे. त्याला भूक लागली आहे पण आपल्याजवळची मोजकी शिदोरी उघडायला त्याचा धीर होत नाही. त्याची थैली जवळजवळ रिकामी झाली आहे.आपल्याजवळचे मासाचे चार घास आपण सूर्यास्ताच्या वेळीच खाऊ असा तो निर्णय घेतो. आलू शोधायला थांबायला त्याचा धीर होत नाही. त्यात त्याचा खूपच वेळ जाईल. अचानक, त्याच्या पायातून एक कमालीची

तीव्र कळ जाते. बर्फाच्या एका धारदार तुकड्यावर त्यानं पाऊल ठेवलं होतं. त्याला वेदना होताहेत खऱ्या पण 'निदान माझ्या पायांना उब मिळते आहे' असा विचार त्याच्या मनात येतो. तो थांबायचा अवकाश, गारठा त्याला पार रक्त निघेस्तोवर त्याच्या अंगात भिनेल. तो अतिशय दमला आहे. आपण मेलो तर किती छान होईल असं त्याला वाटतं. पण नाही, असल्या इतर मार्गांचा विचार करून चालणार नाही. जगायचं असेल तर वेदना सहन केल्याच पाहिजेत. हळूहळू मृत्यूला सामोरं जायचं हा तर सर्वात साधा मार्ग आहे. पण जगायचं असेल तर... पार शेवटापर्यंत झगडण्याचा कामिकचा निश्चय आहे. आत्तापर्यंत त्यानं कितीतरी वेळा मृत्यूशी झुंज दिली होती. प्रत्येक वेळी तो त्याला हव्या त्या मार्गानेच पुढे गेला होता. आता त्याला आपल्या घरी परतायचं होतं. कामिक आपल्या विचारात इतका हरवून गेला आहे की समोरच असलेल्या बर्फाच्या एका मोठ्याशा ढिगाऱ्याकडे त्याचं लक्ष जात नाही. तो त्याच्यावर अडखळतो आणि पार सपाट आडवा पडतो. पार थकून गेल्यानं तो जमिनीवर पडून राहातो, त्याचा चेहरा अश्रूंनी थबथबून गेला आहे. तो तिथे निपचित पडून राहातो.मग त्याला त्याचा भाला आपल्याशेजारी पडलेला दिसतो. तो भाला हातात घेतो .त्याच्याकडे खूप वेळ पाहात राहातो. मग, तो उठतो, बर्फात गुडघे टेकून बसतो, आणि भाल्याचं तीक्ष्ण टोक आपल्या गळ्यावर टेकवतो. एक लहानशी, वेगानं केलेली हालचाल, कृती पुरेल आणि त्याचं वेदना सोसणं थांबेल. पण नाही. कामिक आपला भाला बाजूला टाकतो, आणि रडत-आक्रंदत तो परत बर्फात लोळण घेतो. त्याचं सारं शरीर हुंदक्यांनी गदगदत आहे.

नंतर तो उठतो आणि विषण्ण नजरेनं विस्तीर्ण आकाश न्याहाळतो. 'का संपवू मी आयुष्य'? त्याच्या मनात विचार आला. 'कुणीही चांगला शिकारी इतक्या सहजासहजी आपली हार मानत नाही. मी माझ्या भ्रमावर ताबा मिळवला पाहिजे.' आपण आत्महत्त्या केली तर आपल्या आईला किती दु:ख होईल याचा विचार त्याच्या मनात येतो. तो परत जमिनीवर कोसळतो आणि आणखीन रडतो.

जवळजवळ रात्र झाली आहे. कामिक आता पुढे जाऊ शकत नाही. स्वत:साठी त्यानं एक इग्लू बनवायला सुरवात केलीच तेवढ्यात त्याच्या

मनात एक विचार वीजेसारखा येऊन गेला : 'मी रात्री प्रवास केला तर?...' तो स्वत:शीच म्हणाला. 'जनावरांपासून मी वाचण्याची शक्यता अधिक आहे.' त्याला प्राणी दिसणार नाहीत, ...पण प्राण्यांनाही तो दिसणार नाही.हो...पण प्राण्यांना अंधारात आपल्या शिकारीचा वास येतो आणि कामिकला ते शक्य नाही. नसलं तर काय झालं? तो धोका स्वीकारायला कामिक तयार होतो. तो रात्री मार्गक्रमण करायचं ठरवतो. अतिशय चांगली कल्पना आहे ती. पण त्याचा अर्थ हा की त्याला आत्ता अजिबात झोप मिळणार नाही, किंवा फारच थोडी झोप मिळेल...ते काही असलं तरी कामिक नशीब जोखायचं ठरवतोच. बर्फाचे ठोकळे कापताना तो थांबतो, आपल्याजवळचा मासाचा तुकडा तो बाहेर काढतो आणि तो दाताखाली चावायला लागतो. पोट भरण्यासाठी त्याच्याकडे तेवढंच काय ते शिल्लक आहे. पण तो ते सगळं मास खातो. यानंतर तो भुकेनं मरण्याचा धोकाही निर्माण झाला आहे. यातून त्याला वाचायचं असेल तर त्यानं नीट विचार केला पाहिजे आणि विचारपूर्वक वागलं पाहिजे.

आपल्याला शिकार करावी लागणार आहे हे कामिकला लक्षात येतं. त्यामुळे त्याचा चालायचा वेग कमी होईल...पण त्याच्यापुढे पर्याय तरी काय आहे? खायला काही नाही मिळालं तर तो भुकेला बळी पडेल. तो दिवसा शिकार करेल आणि अगदी थोडावेळ झोपेल.त्याला कुठलीही शिकार मिळाली तर घरी पोहोचण्यासाठी तो रात्रभर चालत राहील. जमिनीजवळ पोहोचताच तो शिकार करेल. जर समुद्रानं त्याला अन्न दिलं नाही तर तो जमिनीवर कस्तुरीच्या वासाच्या बैलांची, कोल्ह्यांची, लागोपेड पक्ष्यांची कशाचीही शिकार करेल. अगदी लेमिंग उंदराचीही! पर्वतांजवळ पोहोचल्यावर तो तिथे शिकार करील. जर पोटात ढकलायला काहीच मिळालं नाही, तरच आपण आत्महत्त्या करायची. काय करायचं याची आता स्पष्ट कल्पना आपल्यासमोर व्यवस्थित असल्यानं कामिकने रात्रीत पुढे पाऊल टाकलं.

कुत्री भुंकत होती, किंचाळत होती, सारी वस्ती अंधारात बुडून गेली होती. कारण लवकरच निघायला लागणार आहे हे त्या सगळ्यांना जाणवत

होतं. एकेक करून इग्लूतून माणसांच्या बाह्याकृती बाहेर पडायला लागल्या. प्रत्येकजण निघायच्या तयारीत होता. क्षितिजावर पहाटेचे पहिले किरण उगवले.आजचा दिवस स्वच्छ आणि लख्ख प्रकाशाचा असणार आहे हे त्यावरून जाणवत होतं. माणसांना हवा तसाच, ढगाचा कुठेही लवलेश नसलेला! पूर्वेकडील निम्याहून अधिक आकाशभर सूर्याचे किरण फैलावले गेले असतानाच मोहिमेत सामील झालेल्या लोकांनी गाव सोडलं. आंगुतिक आणि पुतुक्तीबरोबर उरामिक चालली होती. दुसऱ्या एका घसरगाडीवर इसा आणि मित्तिकबरोबर तुगाक चालली होती. ते दोघे तरूण या मोहिमेत सामील व्हावेत असा या मोहिमेच्या मुखियाचा आग्रह होता कारण ज्या मुलुखातून त्यांना जायचं होतं ते मुलुख त्या दोघांना चांगले माहित होते आणि ते त्यांना मार्गदर्शक म्हणून उपयोगी ठरले असते. वस्तीत मागे राहिलेल्या लोकांच्या संरक्षणासाठी, किकिताजोआकच्या दोन माणसांनी त्यांची जागा घेतली होती.

ते सगळे लोक प्रथम एविक बेटाच्या दिशेने निघाले. तिथूनच सुरवात करणं भाग होतं. आपल्या घसरगाडीवर, बसल्याबसल्या उरामिकला विषण्णता आतल्या आत जडावल्यासारखी जाणवत होतं. सगळीकडे पसरलेली शांतता केवळ कुत्र्यांच्या पंजांनी बर्फावर केलेल्या आवाजानं आणि घसरगाडीच्या कुरकुरण्याच्या आवाजानंच भग्न होत होती. एविक बेटानंतर ते कुठे जाणार होते? ते कुणालाच माहित नव्हतं. कुत्र्यांचे आणि घसरगाड्यांचे जमिनीवरचे ठसे आढळतील, त्यांच्या मागोमाग आपण शिकाऱ्यांपर्यंत पोचू अशी त्यांची अपेक्षा होती. छान उबदार हवा पडली होती, दूरवर लांबपर्यंत स्वच्छ दिसत होतं. विश्रांती घ्यायला किंवा जेवायला न थांबता ते जवळजवळ पुरा दिवसभर पुढे पुढे जात राहिले. आजच शिकाऱ्यांची चिन्हं आपल्याला आढळतील असं त्यांना वाटत नव्हतं. पण उद्या मात्र ते घडावं अशी त्यांची अपेक्षा होती...पण कदाचित नशीब फळफळलं तर ...?

सारा दिवसभरच काय रात्रीचा काही काळही ते वाट चालत राहिले. जेव्हा खरोखरच अंधार पडला, जेव्हा त्यांना पार दिसेनासंच झालं तेव्हा त्यांनी त्या अफाट पठारावर तंबू टाकला. दिवस संपला होता, उद्याचा दिवस लवकरच समोर उभा ठाकणार होता. रात्र घालवण्यासाठी त्यांनी सहा इग्लू उभारले. मग त्यांनी कुत्र्यांना खायला घातलं, मग ते आपापल्या इग्लूत गेले

आणि कारिबू आणि लागोपॅड पक्ष्यांचं गोठलेलं मास आणि मासे खायला लागले. आंगुतिक आणि पुतूक्तिच्या इग्लूतच उरामिक आणि तुगाक राहात होत्या. त्या शांतपणे खात असतानाच अचानक उरामिकने शांततेचा भंग केला:

'त्यांना शोधायला किती वेळ लागेल?'

'कोण जाणे!' आंगुतिक म्हणाला. 'त्याला कदाचित खूप दिवस लागतील, कदाचित ते आपल्याला उद्यालाही सापडतील. कितीही वेळ लागला तरीही आपण त्यांना शोधून काढूच !'

'तुला तिथून जाऊन खूप दिवस उलटले तर तुझ्या घरच्यांना आणि तुझ्या गावच्या लोकांना तुझी काळजी वाटणार नाही का? त्यांच्या जेवणाखाणाकडे कोण लक्ष देईल?'

'किकिताजोआक खूप मोठं गाव आहे. कुणालाही एकटं वाटणार नाही त्यामुळे. खाण्याचीही काळजी करावी लागणार नाही. कुणीही भुकेनं मरणार नाही. माझ्या घरच्यांबद्दल म्हटलं तर माझी वाट पाहेल असं किकिताजोआला कुणीच नाही. पुतुक्ती माझ्याबरोबर आहे. माझ्या इतर मुलांची लग्नं झाली आहेत. त्यांना आपापले संसार आहेत. पण तुम्ही या इथे या वस्तीत का राहाता? तुम्हीही किकिताजोआकला राहायला या की? आसपासच्या भागात खुपसे प्राणी आहेत. शिकार करून त्यांचं पोट भरता येईल.'

'आमची वस्ती आणि किकिताजोआकमधला जो प्रवाह आहे तो गोठून कधीच बर्फ बनत नाही आणि म्हणून तो पार करून जायला कुणीही धजत नाही.' उरामिक म्हणाला. 'कितीतरी बायका-मुलांचा जीव जाईल त्यात.'

'आलं लक्षात.' आंगुतिक म्हणाला. 'ते काही असलं तरी तुम्ही लोकांनी जर किकिताजोआकला येऊन राहायचं ठरवलंत तर ही संधी चांगली आहे. अर्थात कुणी काही घाई करायला सांगत नाहीये.तुमचे शिकारी गांवबंधू सापडले की आपण त्यांच्याबरोबर परत एकदा याबद्दल बोलू.'

ते परत एकदा गप्प झाले. नंतर एकेक करून सगळेजण कारिबूच्या

कातडीवर ते आडवे झाले आणि झोपेच्या आधीन झाले.

कामिक डोळे उघडतो तेव्हा सगळीकडे अंधारच अंधार आहे. तो खूपच वेळ झोपला होता आणि रात्र पडली आहे. कारिबूची तोकडी कातडी थंडीपासून त्याचा बचाव करायला फारशी समर्थ नाही. तो हळूहळू उठतो आणि हातपाय ताणतो. सारं शरीर दुखतंय त्याचं.पण वाट धरणं आवश्यकच आहे. अजून एक रात्र चाललं की तो पर्वतावर पोचून जाईल. पोट भरण्यासाठी त्याला तिथे शिकार करता येईल.

एक बाह्याकृति संथ पावलांनी पुढेपुढे येत आहे. आपल्यासमोर काय आहे याची काडीमात्र जाणीव नसताना, कामिक अंधारात पुढेपुढे जात आहे. टणक झालेला बर्फ त्याच्या पावलांना टोचतो आहे आणि बुटांच्या फाटलेल्या तळव्यांतून गारवा त्यांना झोंबतो आहे. अगदी अंधारातही कामिकला दूरवर पर्वत स्पष्टपणे दिसत आहेत. आजच अन्न शोधून काढणं त्याला भाग आहे, नाही तर भुकेनं तो आणखीनच अशक्त होऊन जाईल. जिवंत राहाण्यासाठी त्याला आपल्या साऱ्या शक्तीची गरज आहे. शिकार केल्याशिवाय न झोपण्याचा तो निश्चय करतो.तो दिवसा शिकार करणार होता आणि रात्री झोपू शकणार होता. रस्ता कापायची आजची ही रात्र शेवटची! या विचारानं तो सुखावला होता. एकदा का आपल्या गंतव्यस्थानी तो येऊन पोहोचला की खायला काही तरी मिळेस्तोवर तो शिकार तरी करणार होता किंवा भुकेने मरणार होता.

पहाटेच्या पहिल्या प्रकाशाने आकाश उजळतं. कामिक खूपच दमला आहे. तो सारी रात्रभर चालत होता पण आता त्याच्या कष्टांचं चीज होत होतं. पोहोचायचं आहे ते ठिकाण आता अगदी जवळ येऊन ठेपलं होतं. इथून पुढे तो वाटेवर आलू लागताहेत का याचा शोध घेईल. खूप वेळानं, त्याला एक आलू सापडतो. गोठलेल्या बर्फाचा स्पर्श सहन होईल तोपर्यंत कामिक सहनशीलपणे चालत राहातो. नंतर आपल्याला उबदार वाटावं म्हणून तो इकडे तिकडे चालत राहातो. मग तो आलूजवळ पुन्हा एकदा दबा धरून बसतो.संध्याकाळ जवळजवळ पडली आहेच आणि अजूनही

एकही सीलमासा वर आला नाही. आपण अतिशय अशक्त झालो आहोत असं कामिकला जाणवतं. फार चालणं झालं, नीट जेवण नाही. तो पार थकून गेलाय्. भुकेनं त्याचं पोट पार कुळकुळलं आहे. आता रात्र पडली आहे. कामिक एक इग्लू बांधतो. खायला काही तरी सापडेपर्यंत आणि परत वाट चालण्याइतपत ताकत येईस्तोपर्यंत किंवा मृत्यू येईस्तोवर हा इग्लूच त्याला आसरा देईल. इग्लू बांधून झाल्यावर कामिकत्यांत बसतो. आत अंधार आणि गारठा आहे. कामिकजवळ आहे तरी काय? त्याचा भाला, माशाच्या दाताचा चाकू, एक दोरी आणि सील माशाच्या कातडीपासून बनवलेली एक झोळी...

सील माशाच्या कातडीपासून बनवलेली एक झोळी?

सील माशाच्या कातडीपासून बनवलेली झोळी म्हणजे खाद्यपदार्थच आहे की! इतका सारा वेळ, कामिक ती झोळी आपल्या पाठीवर वाहात होता आणि पोट भरायला तिचा उपयोग होऊ शकेल याचा त्याला पार विसर पडला होता. ती झोळी कोरडी आहे खरं, पण तरीही ती खाता येऊ शकेल. कामिकच्या मनात त्याच्या वडिलांचा विचार आला: ते मला एकदा म्हणाले होते की प्राण्यापासून केलेली कोणतीही वस्तू गरज पडली तर आपल्याला पोट भरायच्या कामी येऊ शकते. माझी झोळी, माझी दोरी, माझे कपडे, कारीबूच्या कातडीपासून बनवलेलं माझं पांघरूण! हे सगळं मी खाऊ शकतो. कामिक आपला चाकू काढतो. आज रात्रीचं जेवण म्हणून तो त्याची दोरी वापरेल. त्यातून जे काही उरेल ते उद्याला उपयोगी पडेल. आणि जेव्हा दोरी संपेल तेव्हा तो त्याची झोळी खायला वापरेल. अशा रीतीनं, कोणतीही शिकार करायला जमेस्तोवर जिवंत राहायची एक क्षीणशी संधी त्याच्या हाती सतत राहील. सारी ताकत पणाला लावून कामिक दोरी चावत राहातो. ती बेचव आहे खरं, पण त्याचं पोट भरायला ती उपयोगी पडणार आहे. ती त्याच्या पोटाची आग तर शमवत आहे .

अचानक कामिकचा चेहरा उजाळतो.

त्याची झोळी आणि त्याचं पांघरूण कारिबूच्या कातडीपासून बनवलेलं आहेत. आपलं पांघरूण कापून तो आपल्या जोड्यांचे तळवे बनवू शकतो. आपल्या दोरीचा वापर करून तो ती कातडी आपल्या पायांभोवती बांधू

शकतो. कामिकच्या चेहऱ्यावर स्मित उमटतं. त्याचे कपडेदेखील त्याचं पोट भरण्याच्या कामी थोडेफार उपयोगी पडू शकतील.

कामिक त्याच्या छोट्याशा इग्लूतून बाहेर येतो आणि सभोवताली नजर टाकतो तेव्हा निरभ्र आकाशात सूर्य तळपत असतो. वारा वाहणं जवळजवळ थांबलंच आहे. सील माशाची शिकार करण्यासाठी अगदी योग्य दिवस! कामिक आपल्या इग्लूत परततो आणि आपल्या दोरीचे अगदी लहानलहान तुकडे करतो आणि मोठ्या चवीनं ते चावतो. मग भाला आणि चाकू हातात घेऊन तो परत बाहेर येतो. कड्याचं शिखर तो नीट न्याहाळतो. या बाजूनं पर्वत एकदमच ताठच्या ताठ आहे. त्याच्यावर चढून जायला कामिकला त्याला फेरा घालून गेलं पाहिजे. त्याचा आपण नंतर विचार करू. या क्षणी त्याला गोठलेल्या समुद्रावर सील माशाची शिकार करायची आहे. जर काहीच हाती लागलं नाही तर तो जमिनीवरच्या एखाद्या प्राण्याची शिकार करायचा प्रयत्न करेल.थोड्या वेळानं त्याला एक आलू लागतो, तिथे काहीतरी हाती लागेल अशी चिन्हं होती. कामिक वाट पाहात राहातो. आयुष्यात धीर धरून राहाणं आवश्यक असतं हे कामिकला खूपच चांगलं माहिती आहे.

आता रात्र झाली आहे. कामिक सारा दिवस आलूजवळ बसून आहे पण एकही सील मासा श्वासोच्छ्वास घ्यायला बर्फाच्या पृष्ठभागाशी आला नव्हता.कामिक दमला आहे, त्याला भूक लागली आहे. आज संध्याकाळीही सीलमाशाच्या कातडीपासून बनवलेली दोरी खाणं त्याला भाग आहे. उद्या तो जमिनीवर शिकार करायला जाईल. शिणलेल्या अवस्थेत तो आपल्या इग्लूकडे परत जातो.

कामिक जेव्हा आपल्या इग्लूतून बाहेर येतो तेव्हा सूर्याचे पहिले किरण आकाशात झळाळत असतात. कामिकला थंडी वाजतेय् , त्याला भूक लागली आहे पण निदान त्याला चांगली झोप तरी लागली होती. टेकडीची जी बाजू सरळसोट नाही तिच्या दिशेनं तो निघतो. त्या टेकडीवर चढून जायला खूप परिश्रम करावे लागणार आहेत हे कामिकला माहित आहे. आणि तो तर खूप दमला आहे.पण त्याच्यासमोर काही पर्यायही नाही. त्या टेकडीवर चढून जाणं त्याला भागच आहे. जमिनीवरची शिकार हाच त्याच्या आशेचा किरण आहे.

टेकडीच्या खडकाळ कडेनं त्याच्या पायाची सालटी निघतात, पण कामिक चालतच राहातो. पहाटेपासून आपण किती चाललो हे जाणून घेण्यासाठी तो वारंवार खाली पाहातो. तो आता खूपच वर चढून आला आहे. जर तो घसरून पडला तर तो गडगडत खाली जाईल आणि परिणामत: हात पाय मोडून घेईल. टेकडीच्या पायथ्याशी येऊन पोचेस्तोवर तो नक्कीच मेलाही असेल.

कामिक सरते शेवटी जेव्हा शिखरावर येऊन पोहोचतो तेव्हा सूर्य आकाशात कधीचा वर येऊन ठेपलेला असतो. कामिक घामाघूम झाला आहे, त्याला धाप लागली आहे. तो काही वेळ पडतो. तो तोंड पुसतो आणि लगेचच त्याला बरं वाटतं. तो सावकाश उठतो, पण अचानक ... लांडग्यांचं ओरडणं त्याला ऐकायला येतं. ते खूपच जवळ आहेत. आपल्या खंबीर हातात भाला धरून कामिक एका खडकामागे लपतो. आपल्या लपायच्या जागेतूनच कामिकला तीन लांडगे चार कस्तुरीचा वास येणाऱ्या बैलांवर हल्ला करताना दिसतात. जोरजोरात चीत्कार करत, ते तीन लांडगे आपल्या प्रचंड भक्ष्याच्या दिशेनं पुढे होतात. आपल्या बछड्याचा बचाव करण्यासाठी म्हणून त्या बैलांनी एक वर्तुळसारखं केलं आहे. अचानक त्या बैलांपैकी एकजण आपलं वर्तुळ सोडून बाहेर पडतो आणि एका लांडग्यावर हल्ला चढवतो. पण तो लांडगा त्याला चुकवतो. कस्तुरीच्या वासाचे ते सुगंधी बैल लांडग्यांसमोर हतबल असतात हे कामिकला माहित आहे. लांडग्यांना जनावरांची भीति वाटत नाही. त्यांना केवळ माणसांचीच भीति वाटते.

'ते केवळ माणसांनाच भितात,' कामिक स्वत:शीच म्हणतो. आपण लपलो आहोत त्या खडकापर्यंतचा त्याने काटलेला रस्ता पाहण्यासाठी तो मागे वळतो. त्याच्या मनात एक डाव रचतो. त्यात धोका आहे पण कामिकने आजपर्यंत कितीतरी धोक्यांचा सामना केला आहे. एक उडी मारून तो त्या बैलांच्या आणि लांडग्यांच्या समोर उभा राहतो. ओरडून आणि हात हालवत तो त्यांच्या दिशेने पुढे जातो. लांडग्यांची नजर त्याच्याकडे वळते: 'माणूस आला?' ते पार सुसाट पळत सुटतात. सुगंधी बैल हालचाल न करता, गोलाकारातच स्तब्ध राहातात. त्यांच्या दिशेने पुढे जात कामिक जोरजोरात ओरडतो. आत्ता नाही तर थोड्यावेळानं त्यांच्यापैकी एकजण आपल्यावर नक्कीच हल्ला करेल हे कामिकला माहित आहे. त्याची त्याला खात्री आहे आणि

त्याला तसं हवंच आहे. तो आता त्यांच्या इतका जवळ येऊन पोहोचला आहे की ते आता त्याच्या भाल्याच्या आवाक्यात आले आहेत. त्या प्रचंड प्राण्यांना तो भाल्याच्या एका वाराने मारू शकणार नाही हे कामिकला माहित आहे, तरीही तो नेम धरतो, आणि सारी ताकत एकवटून तो आपला भाला फेकतो. एका सुगंधी बैलाच्या बगलेत त्याचा भाला घुसतोच. तो आता हल्ला चढवील याची कामिकला खात्री आहे. तसंच घडतं! तो बैल त्याच्यावर चालून येतो. कामिक कड्याच्या दिशेने धावायला लागतो.

त्या बैलानं त्याला गाठलं तर त्याचे दिवसच संपतील.

कड्याच्या अगदी जवळ येऊन पोहोचल्यावर, कामिक मान वळवतो आणि मागे पाहतो. सुगंधी बैल साऱ्या ताकतीनं त्याच्या दिशेनं धावत येतो आहे. त्याच्या वजनानंच त्याला पुढे पुढे ढकललं जात होतं. तो बैल त्याच्यापासून काही पावलं अंतरावरच येऊन ठेपल्यावर कामिक बाजूला बर्फात उडी मारतो. तो बैल स्वत:ला थांबवू शकत नाही. त्याच्या अंगात तो भाला तसाच घुसलेला आहे. समोर ती खोल दरी पाहून तो स्वत:ला थांबवण्याचा प्रयत्न करतो पण त्याला आता खूपच उशीर झाला आहे. त्याचा वेगच त्याला पुढे ढकलतो. तो त्या कड्यावरून खाली पडतो. त्या बैलाचा मृत्यू आता अटळ आहे. कामिकचा उद्देश सफल झाला. आता टेकडीवरून खाली उतरायचं आणि शिकार केलेल्या बैलाचे तुकडे करायचे... आणि ते खायचे एवढंच बाकी आहे. ते काही असलं तरी परतीचा रस्ता काही सोपा नाही. प्रत्येक पावलावर, घसरून पडायचा आणि मान मोडून घ्यायचा धोका कामिकला आहे. पण खाली पोहोचल्यावर एक चमचमीत जेवण आपली वाट पाहात आहे ह्या विचारानं प्रेरित होऊन सगळ्या धोक्यांकडे काणा डोळा करून कामिक मोठ्या धाष्ट्र्यानं पुढे पुढे जातच राहातो. टेकडीच्या पायथ्याशी पोहोचल्यावर कामिक वेळ वाया न घालवता त्या जनावराच्या प्रेताचे तुकडे करतो आणि खायला सुरवात करतो. रक्तानं माखलेली बोटं चाखत तो खूप हपापल्यासारखा खातो. काय मस्त मजा आली ! आता त्याच्यासमोर अन्नाची तादात नसल्यानं तो पार पोटाला तड लागेस्तोवर खातो. आता खूप दिवसपर्यंत त्याला अन्नाची कमतरता भासणार नाही.

कदाचित घरी परतणंदेखील शक्य होईल.

अंधार पडायला लागतो तसा कामिक इग्लूत परततो. परतताना तो आपल्या खांद्यावर मासाचा एक भला मोठा तुकडा घेऊन जातो. इग्लूत तो ते किमती खाद्य नीट व्यवस्थित लावतो आणि निजतो. तो थोडासा अस्वस्थच आहे आणि त्या अस्वस्थ वाटण्याचं कारणही त्याला माहित आहे. इतके दिवस भुकेचा सामना केल्यानंतर, आज त्यानं यथेष्ट खाल्लं आहे... उद्याला त्याची तब्येत ना बिघडली म्हणजे मिळवलं .

'या पहा पावलांच्या खुणा दिसताहेत,' आंगुतिक म्हणाला.

मोहीमेतील सगळेजण, कुत्र्यांनी आणि घसरगाड्यांनी बर्फात बनवलेल्या खाचांच्या खुणा पाहाण्यासाठी त्याच्या भोवती गोळा झाले.

'आता आपल्याला ते नक्कीच सापडतील,' आंगुतिक पुढे म्हणाला.

सारा दिवस त्यांनी त्या खुणांच्या मागे मागे जाण्यात घालवला. अंधार पडायला यायच्या वेळी त्यांच्यासमोर एक भयानक दृश्य साकार व्हायला लागले.

'ते इथे झोपले होते. हे पहा.अस्वलाच्या आणि रक्ताच्या खुणा! त्यांची वाट आणि त्या श्वापदाची वाट एकमेकांना काटून गेली.'

'इकडे या पाहायला.' आणखी दूरवरून येणाराएक आवाज म्हणाला. 'या इथे आणखी काही खुणा दिसताहेत. आणि त्या या बेटाच्या शिखराच्या दिशेने जात आहेत.'

'ते इतक्या वरती कशासाठी गेले असतील?' मित्तिकनं विचारलं.

'त्याचं उत्तर पाहिजे असेल तर एकच मार्ग आहे. त्या पावलांच्या मागोमाग आपण गेलं पाहिजे.'

ते जेव्हा शिखरावर येऊन पोहोचले तेव्हा त्यांनी एक थडगं पाहिलं

आणि काय घडलं होतं हे त्यांच्या लक्षात आलं.

उरामिक त्या थडग्याच्या दिशेनं धावत गेली आणि तिनं त्यावर पार लोटांगण घातलं. तिचं सारं शरीर हुंदक्यांनी थरथरत होतं. इसानं हलकेच तिचा हात पकडला आणि तिथून दूर नेलं.

'हे थडगं उकरून पाहिलं पाहिजे तिथं कुणाला पुरलं आहे ते पाहायला.' आंगुतिक म्हणाली.

बाकीचे लोक थडगं खोदत असताना, इसानं उरामिकला घट्ट मिठी मारून धरून ठेवलं होतं. मानवी देहाचे अवशेष त्या थडग्यातून बाहेर आले.

'हा तर सुलुक आहे.' उरामिककडे वळत मित्तिक म्हणाला..

उरामिकने इसाच्या हातातून आपली सुटका करून घ्यायचा प्रयत्न केला खरा, पण इसानं तिला आपल्या दमदार हातानं धरून ठेवलं होतं.

'तू तिथं न गेलेलीच बरं! जर त्याला या अवस्थेत पाहिलंस तर ती आठवण पार जगाच्या अंतापर्यंत तुझा पिच्छा सोडणार नाही.' तो म्हणाला.

इतरांनी त्या अवशेषांवर परत बर्फ पसरलं आणि ते आपापल्या घसरगाड्यांकडे परत आले. त्या तिथेच त्यांनी ती रात्र घालवली. दुसऱ्या दिवशी सकाळी ते परत त्याच खुणांच्या मागोमाग गेले. सूर्यास्त झाला तेव्हा त्यांना आणखी एक इग्लू आढळला. शिकारी लोक त्यात झोपले होते.

'आपण योग्य त्या मार्गावरच चाललो आहोत.' आंगुतिक म्हणाला. 'आपल्याला ते सापडतीलच. आज नाही तर उद्या !'

'अस्वलाच्या पावलांचे ठसे पाहा!' कुणीतरी एकदम ओरडलं.

'आणि इथं कुत्र्यांचे ठसे आहेत.' इसानं त्यात भर घातली. 'हे दिसताहेत त्यावरून त्यांनी त्या अस्वलाचा पाठलाग केला असावा असं दिसतंय.'

'पण मला घसरगाड्यांचे ठसे दिसत नाहीयेत.' आंगुतिक म्हणाला. 'जणू काही अस्वलाचा पाठलाग करताना कुत्र्यांच्या गळ्यात पट्टेच नसावेत.

याला काहीच अर्थ नाही.'

'इकडे पाहा काय दिसतंय ते! पावलांचे ठसे !'

'हे काहीतरी भलतंच दिसतंय!' आंगुतिक म्हणाली. 'ते ठसे कुत्र्यांच्या आणि अस्वलाच्या ठशांच्या विरूद्ध दिशेनं चालले आहेत.'

ते काही वेळ शिकाऱ्याच्या पावलांच्या ठशांच्या मागोमाग जात राहिले.

'मी काढलेले निष्कर्ष चुकीचे ठरोत एवढीच माझी इच्छा आहे. पण या चिन्हांवरून तरी असं वाटतंय की शिकाऱ्यांनी कुत्री गमावली आहेत आणि त्यांनी परतीचा रस्ता पकडला आहे.'

'तुझा निष्कर्ष योग्यच आहे.' मित्तिक म्हणाला. 'इथल्या सगळ्या ठशांचा विचार केला असता असं दिसतं आहे की त्यांची कुत्री अस्वलाचा पाठलाग करायला गेली असताना, शिकारी इथून पायी पायी जायला निघाले होते.'

'ते पायी पायी जात असल्यानं ते फारसे दूर गेले नसावेत. आपल्याला ते लवकरच सापडायला हवेत.'

ते आपापल्या घसरगाड्यांकडे परत आले आणि त्यांनी एक बेत आखला.

'या क्षणी तरी मी छाती ठोकून काही सांगू शकणार नाही,' आंगुतिक मोठ्याने म्हणाला. 'पण माझ्या मते शिकारी कुत्र्यांशिवायच आपल्या घरांच्या दिशेनं जायला लागले आहेत.तसं असेल तर ते अगदी नाजूक परिस्थितीतच आहेत. त्यांना अस्वलांच्या हल्ल्यांचं जसं भय आहे तसंच घरापर्यंतच मोठं अंतरही भयास्पदच आहे. त्यांना लवकरात लवकर शोधून काढलं पाहिजे. आणि हे तुम्हा सगळ्यांनाही माहित आहे. कुत्री नसतील तर एकटा माणूस अस्वलाविरूद्ध काहीच करू शकत नाही. अधिक वेळ गमवू या नको. शिकारी लोक भेटेस्तोवर आपण एक क्षणभरही आराम करू या नको.'

वेळ न दवडता ते चालायला लागले आणि सारी रात्रभर ते चालतच

राहिले. काहीजण कुत्र्यांच्या पुढे त्या पावलांच्या ठशांच्या मागोमागे चालत होते. एकदोनदा त्यांचा तो मागोवा सुटला आणि त्यांना सगळी वाट मागे परतून येऊन दुसरा रस्ता पकडायला लागलं. दुसऱ्या दिवशी एक वेगळंच भयानक दृश्य त्यांच्या पुढे उभं राहाणार होतं. कुत्र्यांनी हुंगायला सुरवात केली मग भुंकत भुंकत ती पुढे झेपावली.मोहिमेतील सगळे लोक बिचकून त्यांच्या मागोमाग जात राहिले.अचानक कुत्री थबकली. त्यांच्याभोवतालचं बर्फ रक्तानं लाल झालं होतं. ती परत हुंगत राहिली, आणि मग त्यांनी खणायला सुरवात केली. एका कुत्र्याला काहीतरी सापडलं.ते काय आहे हे इसाला पहिल्यांदा दिसलं: कुणा माणसाचा पाय.

'अरे दैवा!' तो ओरडला.

सगळे लोक त्याच्या दिशेने वळले. कुणातरी माणसाचा पाय? तुगाक तर बेशुद्धच पडली.

'सगळेजण मागे व्हा. खणण्यासाठी मला काही पुरूषांची गरज आहे.' आंगुतिक म्हणाला.

आणि तो इसाच्या दिशेने पुढे झाला.

'सॉरी हं, पण ते प्रेत कुणाचं आहे हे ओळखण्याचं काम मी तुझ्यावरच सोपवणार आहे.'

लगोलग तीन माणसं बर्फ खोदायला लागली. खूपशी प्रेतं तिथं पुरलेली आहेत हे लक्षात येताच त्यांना भेदरायलाच झालं. थोड्या वेळानंतर इसानं त्यांची ओळख लावायला सुरवात केली.

'यात एकच जण दिसत नाही.' तो आंगुतिकला म्हणाला.

'कोण ते?'

'कामिक. कदाचित तो अजून जिवंत आहे, कदाचित तो इतर कुठेतरी मेला असेल.'

असं त्यांचं बोलणं चाललं असताना त्यांना अस्वलाची कातडी दिसली.

'आता आलं लक्षात.' आंगुतिक उद्गारला.' त्यांनी इथेच त्या अस्वलाला मारलं, पण ते सगळे शिकारी लोक त्या झगड्यात मारले गेले. त्यांच्यापैकी एकच जण आत्ता हयात आहे.'

'बहुतेक तसंच असावं.' मित्तिक खिन्नपणे म्हणाला. 'कदाचित तो हयातही नसेल.'

'बरोबर आहे.' आंगुतिकने त्याच्या सुरात सूर मिसळला.' या मधल्या काळात कामिकचं आयुष्य संपलंही असेल. त्याचं प्रेत या प्रेतांत नाही याचा अर्थ त्याला या शिकाऱ्यांनीच मूठमाती दिली असेल असाही असेल. आणि अस्वलदेखील मारलं गेलं आहे याचा अर्थ हा की कामिक या झगड्यातून सहीसलामत बाहेर पडला असेल. तो जर अजून जिवंत असेल तर आपल्याला तो भेटलाच पाहिजे.'

'पण आपण सुरवात कुठून करायची?' मित्तिक म्हणाला.

'सगळ्यात जवळच्या रस्त्यानं लवकरात लवकर घरी परतण्याशिवाय त्या वेळी कामिकसमोर काही पर्याय नव्हता. म्हणून आपण गावाकडे जाणाऱ्या दिशेनं त्याच्या पावलांच्या खुणा दिसताहेत का याचा मागोवा घेतला पाहिजे.'

'जा त्याच्या मागावर.' उरामिक म्हणाली. तिचा चेहरा आसूंनी डबडबला होता. 'तोच तो काय मला एकटा उरला आहे. तो मरता कामा नये.'

'आम्हाला जे जे काही करणं शक्य आहे ते आम्ही करूच.' आंगुतिक म्हणाला. 'तू एकटी नाहीस हे लक्षात ठेव, एवढंच मी तुला वारंवार सांगतो आहे. आम्ही सगळे तुझे भाऊ-बहिणी आहोत. आपण सारे एकाच कुटुंबाचेच घटक आहोत.'

मग आंगुतिक मोहिमेत सहभागी झालेल्या लोकांकडे वळला.

'पहिल्याप्रथम आपण कामिकच्या पावलांच्या खुणा शोधून काढल्या पाहिजेत. ते काम काही सोपं नाही, कारण कधीकधी बर्फ खरबरीत असतं. आपण आता वेगवेगळे होऊन काम करणार आहोत आणि आपल्यापैकी

कुणाला तरी त्याच्या खुणा सापडतील अशी आशा बाळगू या. निसरड्या बर्फावर आपण जरा जास्तच काळजी घेतली पाहिजे: तिथेच खास करून खुणा जास्त स्पष्ट दिसतील, अगदी वादळ होऊन गेल्यावर देखील.'

त्या ओबडधोबड खड्ड्यांत त्यांनी शिकाऱ्यांची ती प्रेतं पुरली आणि ते दोघं-दोघांची टोळी करून कामिकच्या शोधात निघाले. कुणालाही काही ओळखीची खूण सापडली की त्या दोघांपैकी एकजण इतरांना ते सांगायला जाणार होता आणि दुसरा त्या ठिकाणी तो माग निसटू नये म्हणून त्या तिथेच थांबणार होता. संध्याकाळ झाली आणि आता कामिकचा शोध घेणं थांबवणं भाग होतं. प्रत्येक जोडी जिथे जिथे होती तिथेच थांबली. पहाटे त्यांनी परत शोधायच्या कामाला सुरवात केली. दुपार अगदी संपायला आली असताना नेक्लिक आणि आशूनाकना मानवी अस्तित्त्वाच्या काही खुणा आढळल्या.

'तो इथून पुढे गेलेला असणार,' नेक्लिकने निष्कर्ष काढला. 'आपल्याला काही खुणा आढळल्या आहेत असं सांग जा इतरांना.'

आशूनाकने वाट पकडली.

सूर्यास्ताच्या सुमाराला मोहिमेतील इतर साऱ्या लोकांना घेऊन तो परत आला. मागे पुढे न पाहाता ते ज्या दिशेने कामिक गेला होता त्या दिशेने चालायला लागले.

थोड्या वेळानं आंगुतिकनं 'आपण इथेच तळ टाकू या' असं घोषित केलं.

'अजून थोडं पुढे जाता नाही का येणार?' उरामिकनं विचारलं.

'अशक्य आहे'. आंगुतिकनं उत्तर दिलं. 'आपल्या मुलाला भेटायला तू उतावीळ झाली आहेस हे मला माहित आहे, पण त्याचा माग पुन्हा एकदा सुटलेला आपल्याला परवडणार नाही. आणि आपण जर अंधारात पुढेपुढे जात राहिलो तर तेच भोगावं लागेल. खरोखरच माझा नाईलाज आहे पण आपण पहाटेची वाट पाहाणंच भाग आहे.'

'तो आपल्याला सापडेल असं तुला खरोखर वाटतं?'

'नक्कीच. पण तो जिवंत असेल की मेलेला हे नाही मला माहित.'

हुंदके देत उरामिक जमिनीवर कोसळली.

'काळजी नको करूस.' आंगुतिक म्हणाला. 'या खुणा एवढं तर नक्कीच दाखवतात की तो इथपर्यंत जिवंत होता. तो धट्टाकट्टा गडी आहे. आपल्याला तो जिवंत अवस्थेतच सापडेल अशी आशा करू या.'

उरामिकच्या विरुद्ध दिशेला वळत आंगुतिक स्वतःशीच पुटपुटला : 'माझा असा अपेक्षाभंग नको करूस, महान आत्म्या! माझ्या पदरी अपयश नको घालूस. त्या तरूण पोराकडे घेऊन चल.'

कामिक सारा दिवस न थांबता, चालत होता. त्याने खूप अंतर काटलं होतं असं नाही, पण निदान कोणत्याही संकटाला तोंड न देता दिवस तर गेला होता. आता कामिक दमला आहे आणि तो त्याच्या छोट्याशा इग्लूत लोटला आहे. दिवस खूपच शिणवट्याचा झाला होता. घर सोडल्यापासूनचा हा सगळ्यात कठिण दिवस असू शकेल. आपल्या खांद्यावर वाहून नेत असलेल्या मासाचं वजन कामिकला भारी वाटतंय. त्याला उकडायला लागलं, तो चालत असताना थोडासा तरी गारवा देणारी एकही बारिकशी वाऱ्याची झुळूकही आली नव्हती. सूर्यास्त इतर दिवसांपेक्षा लवकर आल्याचं कामिकला वाटतंय. जरी त्याची पार दमछाक झाली असली तरी अजून थोडं अधिक चालायला त्याला आवडलं असतं. तो जितका जास्त चालेल तितका तो त्याच्या घराच्या जवळ जाईल. कधीपासून झोप त्याच्यापासून दूरावली आहे. न थकता, कामिक कान टवकारून राहिला आहे .'पण काय ऐकायला म्हणून?' कामिक स्वतःलाच विचारतो. कुत्र्यांचा आणि माणसांचा आवाज ऐकायला तर तो कान टवकारत नाहीये ना? की जमिनीवर अस्वलाच्या पावलांचा थपथप आवाजाकडे त्याचं लक्ष आहे?

अचानक त्याला घाबरायला होतं. खूप वेळ त्याची झोप उडाली आहे.

शेवटी त्याला झोप लागते तेव्हा त्याला त्याचा मित्र मारला गेला ते स्वप्न पडतं. तरूण सूनाबरोबर आपण अस्वलाबरोबर चार हात करत असल्याचं त्याला दिसतं. अचानक तो किंचाळत जागा होतो. त्याचं सारं अंग घामानं थबथबलं आहे. आपण केवळ एक स्वप्नच पाहात होतो हे कामिकच्या लक्षात येतं. तो कान टवकारतो. तो येणाऱ्या आवाजांकडे लक्ष देतो. त्याच्याभोवती चारही दिशांना केवळ शांतताच आहे. कामिक अंथरूणातच पडून राहातो. पण त्याचे डोळे भीतिनं वटारलेले राहातात. आणि झोप त्याच्यापासून अजूनही दूर पळून गेली आहे.

दिवस उजाडला. किकिताजोआकचे लोक तयार झाले आहेत. कुत्री बांधलेल्या घसरगाड्यांच्या पुढे जाऊन बर्फात आढळणाऱ्या कामिकच्या मागानुसार चालायची आंगुतिकने पुरूषांना आज्ञा केली.

'मला वाटतंय की तो या पर्वतांच्या दिशेने गेला असावा.' तो म्हणाला.'मला माझ्या आडाख्यांत बदल केला पाहिजे.'

त्याने मोहिमेतील लोकांना थांबवलं आणि त्यांना आपला बेत समजावून सांगितला.

सगळे लोक जमा झाले तेव्हा तो त्यांना म्हणाला : 'आपण योग्य त्या दिशेनेच जातो आहोत. पण आपण फारच सावकाश जातो आहोत. तुमच्यापैकी निम्मे लोक आपण आत्तापर्यंत पकडलेल्या दिशेनंच चालत राहातील. उरलेले लोकं माझ्याबरोबर पर्वतांपर्यंत जातील. या खुणांच्या आधारावरून असं दिसतंय की कामिक पर्वतांच्या दिशेनं गेला होता. आपल्याला जर पर्वतांच्या दिशेनं जाता जाता तेथील अस्तित्वाच्या कामिकच्या काही खुणा आढळल्या तर आम्ही कुणाला तरी तुम्हाला ती बातमी कळवण्यासाठी पाठवू. नाही तर आम्ही परत येऊन तुमच्या घोळक्यात समाविष्ट होऊ.'

आंगुतिक आणि मोहिमेतील निम्म्याहून अधिक लोक निघून गेले. पर्वतापर्यंत यायला त्यांना बराच वेळ लागला, पण त्यांना तिथे अतिशय महत्त्वाची खूण सापडली. त्यांच्या जनावरांच्या खास, तीक्ष्ण सुगंध शोधून

काढण्याच्या क्षमतेने त्यांना मार्गदर्शनाचं काम केलं. कुत्र्यांनी भुंकायला सुरवात केली. डावीकडे उजवीकडे हुंगायला सुरवात केली. मग ते धावत सुटले आणि अचानक थांबले. हाडांवरून त्यांच्यात गुरका-गुरकी झाली. सगळेजण त्यांच्या दिशेनं धावले आणि एकदम थबकले: कस्तुरीचा गंध येणाऱ्या बैलाची हाडं आणि त्याची कातडी !

'कामिकच्या धाडसी प्रवृत्तीचं आणखी हे एक उदाहरण!' आंगुतिक म्हणाला. 'तो या इथे होता आणि त्यानं आपल्या उदरभरणासाठी एक बैल मारला. त्या बैलाची हाडं तुटली आहेत याचा अर्थ हाच की तो या कड्यावरून पडला. नक्कीच कामिकनं त्याला तसं करायला भाग पाडलं असणार. म्हणजे त्याला आता भूकेचा प्रश्न नाही. तो अजूनही जिवंत असावा असं मानायला आता भरपूर वाव आहे.'

'तो इथे अगदी नुकताच राहून गेलाय हेही खुणा दाखवतात' इसानं निष्कर्ष काढत म्हटलं. 'आणि तो पायीपायीच जात असल्यानं तो फारसा दूर असणार नाही.'

'लवकरच संध्याकाळ होणार आहे.' उरामिक म्हणाली.

'आत्ता मात्र मी तुला निराश करणार नाही.' आंगुतिक म्हणाला. 'या वेळी आपण रात्रीदेखील चालत राहू. कामिकच्या पावलांच्या खुणा ताज्या आहेत, कुत्री त्याच्या मागावर वास घेत घेत जाऊ शकतील. आणि आपल्याला जरी त्यांचा माग धरता आला नाही तरी कुठून परत आपला रस्ता धरावा लागेल हे आपल्याला समजणं कठिण नाही.'

आशेनं ओथंबून ते कामिकच्या मागावर जात राहिले. सारी रात्रभर ते चालतच राहिले, त्यांचे कुत्रे त्यांना वाट दाखवत होते. त्यांना जमिनीवरच्या खुणांचा वास घेताना पाहून आंगुतिकला आपण योग्य मार्गावर आहोत असं खात्रीपूर्वक वाटत होतं. शेवटी ते एका छोट्याशा इग्लूपाशी येऊन पोहोचले.

कामिक इथे झोपला होता. 'आंगुतिक म्हणाला.' चलू या पुढे आपण. आपण अगदी योग्य मार्गावर आहोत.'

ते कामिकचा मागोवा घेत आणखी पुढे जात होते तेव्हाच दिवसही उजाडला.

'या खुणांवरून असं वाटतंय की कामिक आपल्यापेक्षा केवळ एकच दिवस अगोदर इथून गेला आहे. त्याला आपण नक्कीच जिवंत शोधून काढू.'

आपल्या पाठीवरच्या ओझ्यामुळे कामिकला विश्रांती घ्यायला थांबणं भाग पडतंय्. तो आपली थैली खाली ठेवतो आणि बर्फावर खाली बसतो. पण तो आता आडवा होणार तेव्हा एक गुरकावणं ऐकून तो थरारतो: अस्वल! कामिक उडी मारून उभा राहातो, आपला भाला हातात घेतो आणि बर्फाच्या एका ढिगाऱ्यावर धावत जातो. गरज पडली तर प्राण जाईस्तोवर तो त्या अस्वलाशी झगडणार आहे. पण ते अस्वल त्याचा पाठलाग करत येत नाहीये. कामिकने मागे ठेवलेलं मास खाण्यात ते मग्न होतं. घाबरलेल्या नजरेनं कामिक त्याच्याकडे पाहात राहिला. मास खाऊन होताच अस्वल आपल्याकडे वळेल आणि आपल्यावर हल्ला करेल हे त्याला माहित आहे. अस्वल वेगानं मास खाऊन टाकतं आणि कामिककडे वळतं. ज्याची भिती वाटत होती तो क्षण समोर ठाकला आहे. तो पशू संथपणे कामिकच्या दिशेने चाल करतो, आणि अचानक थांबतो. कामिकवर हल्ला करायला तो योग्य क्षणाची वाट पाहात राहातो. त्याची भूक पुरी भागलेली नाही. हातात भाला धरून कामिकही वाट पाहात आहे. अस्वल पुन्हा कामिकच्या दिशेने यायला लागतं. कामिक आपला भाला अस्वल आणि स्वत:मध्ये धरतो. तो इतक्या उंच ढिगावर उभा आहे की त्याच्यापर्यंत पोहोचायला त्या जनावराला आपल्या मागच्या पायांवर उभं राहावं लागणार आहे.

अचानक अस्वल एक भयानक डरकाळी फोडतं. ते कामिकवर चाल करून जातं आणि त्याला पंजानं एक थप्पड मारतं, पण कामिक जमिनीवर कोसळत नाही आणि त्याच्या भाल्याच्या तीक्ष्ण टोकानं अस्वलाचा पंजा कापला जातो. वेदनेनं किंचाळत अस्वल धाडकन जमिनीवर कोसळतं.त्याच्या जखमेतून रक्त वाहाताना

कामिकला दिसतं पण केवळ एखादी जखम झाली म्हणून कोणतंही अस्वल मरत नाही हे त्याला माहित आहे. त्याच्यावर हल्ला करायला म्हणून अस्वल पुन्हा उठून आपल्या मागच्या पायांवर उभं राहतं. कामिकही आपले दोन्ही पाय बर्फात रोपून उभा आहे. अस्वल उडी मारतं आणि भाला त्याच्या खांद्याला भोसकतो. त्याच्या केसाळ कातडीवर रक्त वाहायला लागतं.

कामिक आता घामाघूम झाला आहे. आपल्याला दमायला झालं आहे हे त्याला जाणवतं. शतश: ठिकऱ्या व्हाव्यात अशा रीतीनं त्याचं डोकं ठणकतं आहे. आपल्याला दमवून खाली पाडायचा अस्वलाचा बेत आहे हे कामिकला माहित आहे. आपण त्याला लवकरात लवकर मारलं नाही तर ह्या अस्वलापासून बचाव करायला आपल्यात ताकत उरणार नाही, आणि अस्वल आपल्याला जिवंत खाईल हे त्याला माहित आहे. पण भाल्याशिवाय इतर काहीही हत्त्यार नसताना अस्वलाची दमछाक कशी करायची? बेडरपणे अस्वल कामिकवर धाड घालतं आणि भाला त्याला कपाळाला जखम करून जातं. सगळीकडे रक्तच रक्त होतं. आपली आशा पुनर्जीवित होते आहे असं कामिकला वाटतं. नशीब असेल तर जमिनीवर थकून कोसळण्याच्या आधीच तो अस्वलाचे प्राण घेऊ शकेल! आणखी एकदा अस्वल त्याच्यावर झडप घालतं. कामिक ताठ उभा राहातो आणि आपल्या हातात भाला घट्ट धरतो. अस्वल उडी मारतं आणि कामिक आपलं हत्त्यार त्याच्या घशात खोलवर घुसवतो आणि ते सोडत नाही. आपला किंमती भाला गमवायचा नाही असा त्याचा निश्चय आहे. पण अस्वल एकदम फिरतं आणि कामिकला एका बाजूला मारतं आणि त्याला जमिनीवर पाडतं. ज्या ढिगावर कामिक उभा होता त्यावरून तो धडामकरून खाली, सताड पाठीवर पडतो. तो उठून उभा राहातो ना राहातो तोच त्याला अस्वल मागे फिरून त्याच्यावर चाल करून येताना दिसतं. कामिककडे आता स्वसंरक्षणाला काहीच शिल्लक नाही.

अस्वलाच्या गळ्यात घुसलेला त्याचा भाला आता त्याच्यापासून दूर आहे आणि कामिकने आपला चाकू माशाजवळ सोडला आहे. चाकू घेण्यासाठी कामिक त्याच्या दिशेने झडप घालतो आणि परत फिरतो. अस्वल त्याच्या दिशेनं हळूहळू येतं आहे, कामिक जमिनीवर आडवा पडला आहे,

त्याचा तो लहानसा चाकूच त्याच्या हातात आहे. आपला अंत जवळ आला हे कामिकला जाणवतं. अस्वल त्याच्या अधिकाधिक जवळ येतं आहे. त्याला घाई म्हणून नाही. कामिक मागे मागे सरकतो. त्याने आपले हात आपल्यासमोर धरले आहेत. अंतिम श्वास असेस्तोवर तो झगडणार आहे.

अचानक, एक प्रचंड कोलाहल ऐकू येतो.

कामिक आणि अस्वल दोघेही एकदमच त्या गलक्याच्या दिशेनं मान वळवतात. कुत्री आणि माणसं धावत पळत त्यांच्या दिशेनं येताहेत. माणसांच्या हातात भाले आहेत, कुत्री जोरजोरात भुंकताहेत. सरतेशेवटी, त्यांनी कामिकला शोधून काढलं होतं.

आता आपल्या हातात काही नाही हे अस्वलाच्या लक्षात आलं. त्यानं पळून जायचा, कुत्री आणि भाल्यांपासून स्वत:ला वाचवायचा प्रयत्न केला. पण आता फार उशीर झाला होता. शेकडो कुत्र्यांनी त्याच्यावर हल्ला केला. ती त्याच्यावर धावत गेली, कोसळली, जोरजोरात भुंकत ती त्याला चावली. त्यांच्यामागे माणसांचा घोळकाच्या घोळका होता. अस्वलाला कसं मारायचं हे त्यांना माहित होतं. त्यांचे भाले हवेतून झेपावले आणि त्यांनी त्या अस्वलाला मारलं. तो प्राणी जमिनीवर कोसळला .

श्वास रोधून कामिक जमिनीवर कोसळला. उरामिक आनंदाचे अश्रू ढाळत त्याच्या दिशेनं धावत होती. कामिक उठला, त्यानं आपल्या आईला घट्ट मिठी मारली. कितीतरी वेळ ते तसेच एकमेकांना बिलगून राहिले. आनंदाचे अश्रू त्यांच्या गालांवरून वाहात होते. कुणीही काही बोलत नव्हतं. शेवटी कामिकनं आपली मिठी सैल केली आणि आपल्या चारही बाजूला त्यानं नजर टाकली. त्याला खूपसे अनोळखी चेहरे आढळले आणि त्यांच्यातच त्याला इसा, मित्तिक आणि तुगाक दिसले.

'हे सगळे किकिताजोआकचे लोक आहेत. इसा आणि मित्तिक त्यांच्याकडे मदत मागायला गेले होते.'

'धन्यवाद.' कामिक म्हणाला.'तुम्ही मला वाचवलंत.'

आंगुतिक एक पाऊल पुढे झाला.

'माझं नाव आंगुतिक आणि मी किकिताजाओकचा मुखिया आहे. ही माझी मुलगी, पुतुक्ती. तू जिवंत आहेस हे पाहून आम्हाला खूप आनंद झाला. मोठा धाडसी आहेस तू!'

'मी खरोखरच खूप नशीबवाला आहे. माझ्यासारखंच इतरांनाही नशीब मिळालं असतं तर मला बरं वाटलं असतं. त्यांचं काय झालं ते माहित आहे का तुम्हाला?'

'हो.' आंगुतिक म्हणाला.' त्यांना मदत करायला आम्ही तिथे खूप उशीरा पोहोचलो याचा मला खेद होतो आहे.'

'तुला भूक लागली असेल.' उरामिक म्हणाली. 'आणि तू खूप थकला असशील. चल, जेवू या.'

'आपण इथेच रात्र घालवू या.' आंगुतिकनं घोषणा केली.

'आपल्या कुत्र्यांना विश्रांतीची गरज आहे. आणि इतर लोक इथे येऊन पोहोचतील याची वाट पाहाणंही आपल्याला आवश्यक आहे. आशूनाक, तू जाऊन त्यांना शोधून काढ आणि सांग की आम्ही इथं आहोत.'

आशुनाक लगेचच तिथून निघाला.

त्या दिवशी संध्याकाळी कामिकने त्यांना जे जे काही घडलं होतं ते सविस्तर सांगितलं. आपल्या अश्रूंवर ताबा ठेवत, त्याने त्याच्या वडिलांचा मृत्यू कसा झाला, अस्वलानं त्यांच्यावर कसा हल्ला केला ते सांगितलं. तो एकटाच त्यातून वाचला होता. आपल्या मित्रांच्या शरीरांच्या चिंध्या होताना त्यानं पाहिलं होतं. आणि नंतर हिमवादळ आणि भुकेशी चार हात करायला तो एकटाच उरला होता. कामिकनं त्याची आई, पुतुक्ती आणि तुगाककडे नजर टाकली. तिघीजणी रडत होत्या.

'हे सारं ऐकून मला फारच वाईट वाटतंय.' कामिकचं बोलणं संपलं

तसा आंगुतिक म्हणाला.'पण आता, तू भविष्याचा विचार करायला हवास.'

'आंगुतिक म्हणतोय की आपण किकिताजोआकला जाऊन राहावं,' उरामिक म्हणाली. 'तुला काय वाटतं?'

'कोण जाणे?... हा निर्णय गावातल्या लोकांनी आणि तूही एकत्र घेतला पाहिजे.'

तो काही न बोलता उठून गेला. त्याच्या मागोमाग जायला म्हणून उरामिकही उठली. पण आंगुतिकच्या दणकट हातांनी तिला थांबवलं.

'त्याला एकटंच राहू दे.' तो म्हणाला.

'असं का करतोय तो?'

'आपल्याला वर्णन करून जे जे काही त्यानं पूर्वी भोगलं होतं त्या सगळ्या अनुभवांतून तो पुन्हा एकदा गेला.'

'मी जाऊन बोलते त्याच्याशी.' पुतुक्ती म्हणाली.

बाहेर आल्यावर तिला दिसलं की कामिक आकाशाकडे नजर लावून होता आणि त्याच्या डोळ्यात खूप आसू होते. तिच्या पावलांचा आवाज ऐकू येताच तो तिच्या दिशेने वळला.

'सॉरी हं, मला काय झालंय कोण जाणे. खरं तर मी जिवंत आहे याचा मला आनंदच वाटायला हवा नाही का?' तो म्हणाला.

'मला समजतंय तुला काय झालंय् ते.' पुतुक्ती म्हणाली.'तू तुझे वडिल आणि मित्र गमावलेस याचा मलाही शोक आहे. पण आयुष्य तर चालूच राहाते.'

'माझ्या वडिलांशिवाय आयुष्य फारच वेगळं आहे.'

'खरंय् तू म्हणतोस ते, पण तुझी आई अजून जिवंत आहे आणि तू तिची काळजी घेतली पाहिजेस. आणि... तुम्ही सगळेजण किकिताजोआकला राहायला याल अशी माझी अपेक्षा आहे.'

कामिकनं पुतुक्तीच्या डोळ्यात डोळे घालून पाहिलं.

'मला भेटलेल्यापैकी तूच पहिली खरी देखणी मुलगी आहेस.' तो म्हणाला.

'थँक्स.' ती म्हणाली. आणि कामिक, तूही मला आवडतोस.'

'खरंच?'

'हो.'

कामिक पुतुक्तीच्या दिशेने पुढे झाला, तिनं त्याच्या दिशेने हात फैलावले. त्याने तिला खूप वेळ आपल्या बाहुपाशात बंद ठेवले.

'माझ्याशी लग्न करशील, पुतुक्ती?'

'हो. मलाही तसंच मनापासून वाटतंय. पण तू त्याबद्दल माझ्या वडिलांशी बोलायला हवंस.'

'हा मी चाललो.'

ते इग्लूत परत आले. कामिक आंगुतिकपाशी गेला.

'मी तुझ्या मुलीला माझी पत्नी म्हणून मागणी घालतो आहे.' तो मोठ्या आवाजात म्हणाला.

सगळ्यांनी त्याच्याकडे अचंब्याने पाहिलं.

'ही मागणी एकदम अचानकच आली आहे.' आंगुतिक म्हणाला. 'मला काही वेळ विचार करायला दे.'

मग नेस्त्याक उठला.

'ज्या स्त्रीबद्दल बोललं जात आहे ती एक दिवस माझी पत्नी होणार आहे.' त्याने घोषणा केली.

कामिकने त्याच्याकडे पाहिलं.

'याचा निर्णय आपण आंगुतिक आणि पुतुक्तीवर सोपवला पाहिजे.' तो म्हणाला.

'असल्या प्रश्नात मी काही ठरवू शकत नाही. मी तो प्रश्न माझ्या मुलीवर सोडून देतो.'

पुतुक्तीनं एकदा कामिककडे पाहिलं, एकदा नेस्त्याककडे.

'मी कामिकची निवड करते.'

नेस्त्याक तिच्या दिशेला वळला.

'तू त्याला एक दिवसापेक्षा जास्त ओळखत नाहीस.' तो चीत्कारला.

'ठाऊक आहे मला.' ती म्हणाली.'मी तुला कधीपासून ओळखते आहे. पण मी तुझ्यावर कधीही प्रेम केलेलं नाही. माफ कर मला, नेस्त्याक, पण मी माझा निर्णय बदलणार नाही.'

नेस्त्याकने कामिकचा खांदा पकडला आणि त्याने त्याला जोराने ढकलले.

'मी इतक्या चटदिशी हार मानीन असं तर तुला वाटत नाही ना?' तो किंचाळला.'मी तुला चॅलेंज देतो. आपण आमरण द्वंद्व करू या. जो जिंकेल त्याला पुतुक्ती मिळेल.'

'मान्य आहे मला.' कामिक म्हणाला.

'असलं काही चालणार नाही.' आंगुतिक म्हणाला. 'मी इथला प्रमुख आहे. आणि इथे व्दंव्दयुद्ध करायला परवानगी नाही.'

'तू आम्हाला जिवंत सापडलास ही किती दुर्दैवाची गोष्ट आहे,' नेस्त्याक कामिकला उद्देशून म्हणाला.

'आणि तू मानवी देह घेऊन जन्माला आलास, कोण्या प्राण्याचा नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे,' कामिकने त्याला प्रत्युत्तर दिलं.

'बास,' आगुंतिक ओरडला.'माझ्या मुलीनं स्पष्ट शब्दांत सांगितलंय की तिची निवड कामिक आहे. आणि तिच्या निर्णयाविरूद्ध कोणालाही आवाज उठवता येणार नाही. मी आप-परभाव करत नाही, पण माझ्या मुलीचं लग्न तिला आवडणाऱ्या माणसाशीच व्हावं असं माझं मत आहे. आता हा प्रश्न सुटला असल्यानं कामिक आणि त्याच्या गावातील लोकांना किकिताजोआकमध्ये येऊन राहावं लागेल.'

'आपल्या समोरही इतर काही पर्याय नाही.' उरामिक म्हणाली. 'शिकारी लोक गेल्यापासून आपल्या गावाला अधिकच धोका निर्माण झाला आहे.'

'हो.' कामिक म्हणाला.'आपण किकिताजोआकला गेलेलंच बरं आहे.'

'आपण नाला कसा पार करायचा आपण?' इसानं विचारलं. 'ते भलतंच धोक्याचं आहे.'

'खरय तू म्हणतोस ते.' कामिक म्हणाला.'पण आपण त्यापेक्षाही मोठ्या धोक्यांचा सामना केला आहे. आपण नाला एकदा पार तर केला आहेच. आपण ते परत एकदा करू. शिवाय ती वेळ अजून यायची आहे. तिथपर्यंत पोहोचायला आपल्याला एक लांबची वाट काटून जायची आहे. चला, झोपायला जाऊ. त्याचीच आपल्याला सगळ्यात जास्त गरज आहे.'

दुसऱ्या दिवशी जेव्हा त्यांनी चालायला सुरवात केली, तेव्हा जोरात वारा वाहात होता, आणि थंडी त्यांच्या चेहऱ्याला चावत होती. कामिकच्या सेवेला एक घसरगाडी आणि कुत्री दिली होती. उरामिक आणि पुतुक्ती त्याच्याबरोबर जात होते. एकदा कामिकची नजर नेस्त्याकच्या नजरेशी भिडली.त्या नजरेत त्याला व्देष दिसला. आता त्यानं सतर्क राहाणं आवश्यक होतं कारण नेस्त्याक त्याला हानि करण्याचा प्रयत्न करणार होता हे नक्की होतं. तीन दिवस उलटल्यांवर ते कामिकच्या गावी येऊन पोहोचले. आपल्या नवऱ्यांच्या मृत्यूवर अश्रू ढाळणाऱ्या विधवा आणि त्यांना बिलगणाऱ्या लहान मुलांना पाहून कामिकचे डोळे अश्रूंनी चरचरायला लागले.

दुसऱ्या दिवशी ते सगळे किकिताजोआकला जायला निघाले. कामिकचं काळीज जडावलं होतं.आपलं गाव परतपरत पाहायला मागे मागे वळून पाहायचा मोह तो टाळू शकत नव्हता.ते गाव आता ओसाड पडलं होतं पण तिथं तो लहानाचा मोठा झाला होता.आता त्याला एका नव्या मुलखात नवं आयुष्य सुरू करायचं होतं. पुतुक्ती त्याची बायको असल्यानं अर्थातच तो त्या मुलखाच्या चालचलवणुकीशी चटकन परिचित होणार होता आणि तो सुखी होणार होता. तथापि त्यांच्यासमोर एक शेवटचं संकट उभं होतं: ते म्हणजे, कधीही न गोठणारा हा प्रवाह .

दोन दिवस चालून गेल्यावर ते त्याच्या किनाऱ्यावर येऊन पोहोचले. आंगुतिकने मोहीमेतील सगळ्या लोकांना एकत्र बोलावलं.

‘चालताना आपण अतिशय काळजी घेतली पाहिजे. ज्यांच्या घसरगाडीत लहान मुलं आहेत ते घोळक्याच्या मधे राहतील, जर काही बरं-वाईट घडलं तर ते त्यांच्या पुढच्यामागच्या लोकांच्या घसरगाड्यांच्या भरवशावर राहू शकतील. बाकीच्या लोकांना मी मार्गदर्शन करीन. कामिक माझ्या मागे राहील. मी उरामिकला माझ्या घसरगाडीवर घेईन, पुतक्ती कामिकच्या बरोबर राहील.’

‘काही अपघात वगैरे झाला तर?’ मित्तिकनं विचारलं.

‘वाहून जायच्या आत, वेगानं हालचाल केली पाहिजे. तुमची गाडी पाण्यात पडली, तर तुम्ही लगेचच जवळच्या घसरघाडीवर चढायचं. पण ते वेगानं झालं पाहिजे. नाहीतर तुमची गाडी आपल्याबरोबर तुम्हालाही पाण्यात घेऊन जाईल.’

‘हा प्रवाह पार करून जायला यापेक्षा इतर कोणतीही अधिक सुरक्षित जागा नाही का?’ उरामिकनं विचारलं.

‘दुर्दैवानं उत्तर नाही असंच आहे’ आंगुतिकनं उत्तर दिलं. ‘हा एकमेव मार्ग आहे.’

‘आणि आम्ही बायकांनी काय करायचं?’ तुगाकनं विचारलं. ‘प्रवाह

पार करायचं काम अधिक सोपं व्हावं म्हणून आम्ही काही करू शकतो का?'

'जर तुम्हाला खरंच शक्य असेल तर घसरगाड्यांवर न बसता त्यांच्या बाजूबाजूनं धावत राहा म्हणजे त्यांच्यावरचा भार कमी होईल. पण आपण कुठं पाऊल ठेवतो आहोत याकडे नीट लक्ष द्या. तुमचं वजन सहन करू शकेल इतकं बर्फ घट्ट आहे ना हे पावलापावलागणिक तपासून घेत राहात. दुसरं म्हणजे समोरचं बर्फ पुरेसं टणक आहे की नाही हे तपासून पाहण्यासाठी पुरूषांच्या हातात त्यांचा भाला सतत असला पाहिजे. त्यांच्या मागेमागे चालणाऱ्यांनी त्यांच्या पावलावर पाऊल टाकायचं.'

ते नाल्याच्या काठावर येऊन पोहोचले होते आणि आता प्रवाहाशी टक्कर द्यायची वेळ आली होती. आंगुतिक घोळक्याच्या सुरवातीला गेला. एकेक करून प्रत्येकानं बर्फावर पाऊल ठेवलं. पुरूष लोक तरंगत्या बर्फाच्या फलकांची जाडी तपासूनच त्यांच्यावर पाऊल ठेवायचं धाष्ट्र्य करायचे. कधीकधी त्यांचे भाले एकाच दणक्यात समोरच्या बर्फाच्या फलकाच्या आरपार जायचे: त्या माणसांचं वजन वाहायला तो फलक अर्थातच असमर्थ असणार. त्याला वेढूनच पुढे जाणं भाग होतं. एवढी थंडी पडली होती पण ते सगळे घामाघूम झाले होते. अचानक दुर्दैवानं त्यांच्यावर झडप घातली.

अतिशय पातळ अशा बर्फातून आपल्या कुत्र्यांना प्रवाहात पडताना आंगुतिकने पाहिले. काही बोलायच्या आतच त्याच्या पायाखालचं बर्फ दुभंगलं. त्यानं उरामिकला घसरगाडीतून बाहेर यायला सांगायच्या आतच उरामिक आपल्या घसरगाडीसकट वाहायला लागली आणि प्रवाहात झपाट्यानं बुडायला लागली. आंगुतिकच्या गळ्यापर्यंत पाणी आलं होतं.

'इथं नको, इथं नको. त्या बाजूनं जा.' तो मोठमोठ्यानं ओरडत होता.

सारं दृश्य कामिकच्या डोळ्यासमोर घडत होतं. उरामिकला पाण्यात बुडताना आणि दिसेनासं होताना त्यानं पाहिलं होतं. आता आंगुलिकदेखील बुडणार होता. पुतुक्की त्याच्या अगदी पाठिशी होती. अचानक कामिकलाही त्याच्या पायाखाली बर्फ भंगताना जाणवलं. त्याच्यापासून दूर होण्यासाठी म्हणून त्यानं चटदिशी मागे उडी मारली. पण आपल्या वडिलांना पाण्यात

बुडताना पाहून पुतुक्कीला स्वत:चा तोल सांभाळता आला नाही. त्या धोकादायक बर्फाच्या फलकावर तिनं पाय ठेवला.

'जपून, जपून. तू पाण्यात पडशील.' कामिक ओरडला.

पण आता फार उशीर झाला होता. पुतुक्कीला थंडगार पाण्याच्या लाटांचा मार बसला होता. तिला पकडायला म्हणून कामिकने पाण्यात उडी घेतली, पुतुक्की कधीच पाण्याखाली गेली होती. आपलीही तीच गत न व्हावी म्हणून कामिकनं बर्फाच्या कडेला धरून ठेवलं होतं. तो जोरजोरात पुतुक्कीला हाका मारत होता. आंगुतिक दिसेनासा झाला होता. त्यांच्यासाठी काही करणं आता कामिकच्या आवाक्याच्या बाहेरचं होतं. मोठ्या कष्टानं तो पाण्यातून बाहेर आला आणि त्याने आपल्याबरोबरच्या इतर लोकांकडे पाहिलं. ते सगळे सुरक्षित होते, चांगल्या अवस्थेत होते. आणि इतकंच नव्हे तर त्याच्या दिशेने ते पुढे यायलाही लागले होते.

इसानं ओरडून म्हटलं : 'कामिक, इकडे ये. नाहीतर तूही वाहून जाशील.'

पण कामिक आपल्या जागेवरून हालत नव्हता. आता त्याला कशाचंच महत्त्व वाटत नव्हतं. अगोदर त्याचे वडिल गेले. आता त्यानं त्याची आई आणि पुतुक्कीही गमावली होती. आपलं आयुष्य जगण्यासारखंच उरलेलं नाही असंच त्याला वाटत होतं. अजून आपण अधिक टणक बर्फाच्या फलकांपर्यंत अजून आपण चालत जाऊ शकू हे कामिकला जाणवत होतं, ते बर्फाचे फलक काही पावलांच्या अंतरावरच होते, पण तो आपल्या जागेवरून हालत नव्हता.

लाटांनी त्याला समुद्राच्या दिशेने नेलं आणि क्षितिजाच्या दिशेनं तो दिसेनासा झाला. आपल्या सहकाऱ्यांच्या नजरेपलिकडे गेल्यावरच त्यानं ते अटळ कृत्य केलं. 'हे जग सोडण्याअगोदर माझ्या वडिलांनी मला सांगितलं होतं की 'केवळ मृत माणसांनाच अनंत शांति प्राप्त होते'. ते स्वत: त्या शांततेकडे गेले होते आणि 'आपण तुझी वाट पाहात असू' असं त्यांनी मला सांगितलं होतं. कामिकने आपल्या हातातील भाल्याकडे नजर टाकली. शांतता प्राप्त करण्याचा, आपल्या कुटुंबियांत, आपल्या प्रिय लोकांत मिसळून जायचा क्षण आता आला होता. कामिकनं बर्फावर गुडघे टेकले, आणि आपला भाला

असा उभा केला की त्याचं धारदार टोक त्याच्या गळ्याशी आलं. एका झटक्यानं तो खाली झुकला. भाल्यानं शेवटची शिकार केली.

■■■



पांढरे अस्वल- रॉबर्ट फ्रेशेत्त



नूनाविक (क्वेबेक) इथे सुगंधी बैलांचा कळप कॅमेऱ्याकडे पाहाताना



नूनाविक इथे लागोपॅड



गोठलेल्या तळ्यावर एक इन्विट माणूस कुत्र्यांनी खेचली जाणारी घसरगाडी चालवत आहे- रॉबर्ट फ्रेशेत्त

# काल-सूचि

ख्रिस्तपूर्व ४५०० वर्ष ते १५वे शतक: उत्तर अमेरिकेतील आर्क्टिक भूभागावरील दोर्सेतिअनचे पूर्वज आणि दोर्सेतिअन लोकांची वस्ती.

दहावे शतक :अलास्काहून आलेल्या तूलेअन जमात उत्तर अमेरिका पार करतात.त्यांच्यापैकी काहीजण आज ज्याला कॅनडा म्हणतात तिथे वस्ती करतात.

तेरावे शतक :ग्रनलँडच्या दक्षिणेला तुलेअन आणि वायकिंग जमातींचा एकमेकांशी संबंध.

सोळावे शतक: कॉड माशांच्या शिकारीसाठी लाब्राडोरच्या किनाऱ्यावर युरोपातून जहाजे आली.त्यांचे इन्विट लोकांशी आलेले संबंध 'फारच थोड्या काळासाठी होते आणि त्या दोघांत वैमनस्य होते.

१६०९:हेन्री हडसनने हडसनचा सागर आणि जेम्सच्या खाडीचा शोध लावला.

१६७०: लंडनमध्ये उत्तर अमेरिकेत प्राण्यांच्या केसाळ कातड्यांच्या व्यापारासाठी हडसनची खाडी कंपनीची स्थापना.

१७१३: ११ एप्रिलला युट्रेस्टच्या तहावर स्वाक्षऱ्या. त्यामुळे स्पेनच्या पारंपारिक राजसत्तेसाठी युद्धाची समाप्ति झाली तशीच हडसनची खाडी कंपनीला नवीन काबीज केलेल्या सर्व जमिनींवर अधिकार सुपूर्त करण्यात आले.

१७६३: पॅरिसला रेविय्यों बंधूंनी प्राण्यांच्या केसाळ कातडींच्या व्यापारासाठी एका कंपनीची स्थापना केली.

१७७१: मोराव धर्मप्रचारकांनी लाब्राडॉरला तळ ठोकला.

१८२९:हडसनची खाडी कंपनीने नूनाविकला आपले देवाणघेवाणीचं पहिले ठाणे स्थापन केलं.

१८७६:आंग्लिकन धर्मप्रचारक हडसन बेच्या काठावर येऊन स्थिरावतात.

(आज ज्याला पतित रिविएर द ला बालेन म्हणतात) त्या लिटिल व्हेल नदीवर तळ ठोकून धर्मोपदेशक एहमंड पेक बायबलचे इनुक्टिटुट लिपित पुनर्लिखाण करायला सुरवात करतात. ही लिपी चाळीस वर्षांपूर्वी जेम्स इवान्स या धर्मप्रचारकांनी ओजिबावेज आणि क्रीस या जमातींसाठी निर्माण केली होती.

१९१२ :उंगावा भाग क्वेबेकच्या भूभागाला जोडण्यात आला.

१९३२ :नूनाविकच्या धर्मप्रचारकांची पहिली शाळा कूजूआक इथे स्थापण्यात आली.

१९४१:इनुक्जुआकला मार्कूझीचा जन्म.

१९४८:मॉंट्रिअलला 'एस्किमोंच्या शिल्पकृतीं'चे पहिले प्रदर्शन कलाविषयक व्यवसायांच्या समूहाच्या इमारतीत भरवण्यात आले.

१९४९:त्या काळातील प्रदेश समूहाने चालवलेल्या पहिल्या शाळांची इनुक्जुआक आणि कूजूआकला स्थापना.

१९५०: मध्यवर्ति सरकारने इन्विट लोकांनी शाळेत जाणे आवश्यक केले.

१९५३: विवादास्पद भूभागावर आपला हक्क आहे हे सिद्ध करण्यासाठी मध्यवर्ति सरकार दहा एक कुटुंबाना नुनाविकमधून आर्क्टिक्टच्या उत्तरेच्या भागात रेझोल्यूट बे मध्ये विस्थापित करते.त्या दहा एक कुटुंबांत मार्कूझीचं कुटुंबही होतं.सरकारी अधिकाऱ्यांनी आश्वासने दिलेली असतानाही त्या कुटंबांना परत त्यांच्या गावात परत येत आले नाही.

१९५४ : प्रखर क्षयाच्या आजारावर उपचार करून घेण्यासाठी मार्कूझींना मॅनिटोबाला पाठवले जाते.

१९६१: पूर्वोत्तर विभागातील सर जॉन द येलोवील येथील कॉलेजातून मार्कूझी पदवी प्राप्त करतात.

१९६३:नूवो–क्वेबेक (नूतन क्वेबेक)निदेशालयाच्या स्थापनेव्दारा क्वेबेकच्या सरकारची नुनाविकमध्ये हस्तक्षेपाला सुरवात.

केहगिकसुजुआक आणि कुजुआकला पहिल्या प्रादेशिक शाळांची स्थापना.

१९६७: मॉरेआलला भरलेल्या वैश्विक प्रदर्शनाव्दारे साऱ्या जगाला इन्विट संस्कृति आणि कलांचा परिचय.

नूतन क्वेबेकच्या सहकारी संस्थांसमूहाची निर्मिती.

१९६८: जॉन आयारूआकचे आत्मचरित्र हे धर्माशी संबंधित नसलेलं इनुक्टिकटुटमधील पहिलं पुस्तक होय.

मार्कूझी पायलटपदाचा परवाना प्राप्त करतात आणि व्यापारी वायुमार्गाचा पहिला इन्विट पायलट बनतात.

१९६९:द हार्पून ऑफ हंटर या मार्कूझींच्या पुस्तकाचे प्रथम इनुक्टिटुटमध्ये, नंतर इंग्रजीमध्ये प्रकाशन(१९७०)

१९७० : जेम्सच्या खाडीत हायड्रो-इलेक्ट्रिक परियोजनांवर अम्मल बजावणीला सुरवात.

१९७२: उत्तर क्वेबेकच्या इन्विट लोकांच्या संघाची स्थापना.

१९७२ आणि १९७३च्या दरम्यान मार्कूझी इंग्रजीत इनुटिटुट या नियतकालिकात कृपेचे पंख या दुसऱ्या कादंबरीचे पाच भाग प्रकाशित करतात.

१९७५ :११ नोवेंबरला,बे-जेम्स आणि उत्तर क्वेबेक या दोघांमध्ये करारनाम्यावर हस्ताक्षरे.

माकिविक समाजाची स्थापना.

१९७७: परिध्रुवीय इन्विट सभेची प्रतिष्ठापना.

१९७८ : काटिविक प्रादेशिक निदेशालयाची स्थापना

१९८० : अवाताक सांस्कृतिक संस्थेची प्रतिस्थापना.

१९८२ : इन्विट ब्रॉडकस्टिंग कोर्पोरेशन टेलेविजन या चॅनेलने प्रक्षेपण

सुरू केले.

१९९०: अवाताक सांस्कृतिक संस्थेमार्फत तुमिवुत या सांस्कृतिक नियतकालिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. त्याचे १२ अंक निघतील.

१९९९. १ एप्रिलला ‘नुनावुत’( आमची धरती)ची स्थापना.

मध्यवर्ति सरकार, क्वेबेकचे सरकार आणि नुनाविक या तिघांनी केलेल्या करारानुसार नुनाविकच्या आयोगाची स्थापना.स्वायत्त सरकार स्थापन करण्याच्या दृष्टीने अहवाल तयार करण्याची जबाबदारी या आयोगावर सोपवण्यात आली आहे.

२००१. नुनाविक आयोगाच्या अहवालाचे प्रकाशन: आमिक्कालूता/ संविभाजन करू या: नुनाविकसाठी सरकार बनवण्यासाठी दिशानिर्देश.

झाखारिआस कुनुक यांचा ‘अतानार्जुवात: वेगवान माणसाची कथा’, हा चित्रपट पडद्यावर झळाळला. त्यावर्षीच्या कान इथल्या चित्रपटमहोत्सवात त्याला सुवर्ण कॅमेराचे पारितोषिक मिळाले.

२००३ :क्वेबेकचे सरकार,मध्यवर्ति सरकार आणि माकिविक समाज यांच्यात स्वायत्त सरकार प्रस्थापित करण्यासाठी एक करारनामा ऊर्फ तडजोडीच्या चौकटीवर सह्या झाल्या.

२००४: क्वेबेकच्या नुनाविक येथील ‘पिंगालुईटच्या राष्ट्रीय पार्का’ची निर्मिती.

२०११ : नुनाविक येथील,प्रादेशिक सरकारबद्दल मतैक्याविषयीची जनमताविषयीची पृच्छा. मतदारांनी ती फेटाळली.

१९६९ में प्रकाशित शिकारी का हार्पून, कनाडा में इनुइट समुदाय के किसी व्यक्ति के द्वारा लिखित पहला उपन्यास एक नए युग की शुरुआत को चिन्हित करता है। यह उपन्यास मौखिक आख्यान है। साहसिक कारनामों से भरा यह जटिल उपन्यास पाठकों को आर्कटिक के हिंसक और प्रतिकूल जगत में ले जाता है जहाँ मारकुसी का नायक अपने करीबी लोगों की मौत की महत्जता के बावजूद इनुक्तितुत भाषा में इसका प्रकाशन पुस्तक के रूप में नहीं हो सका। इस रचना का हिंदी अनुवाद आपके सामने प्रस्तुत है। साथ में मॉन्ट्रियल में केबेक विश्वविद्यालय के प्राध्यापक दानियेल शर्तिये की प्रस्तावना टिपणियां और इनुइट समुदाय सम्बन्धी कालक्रम भी हैं।



*मारकुसी पात्साउक*

www.universitypress.com